

✦ परशुरामीय
वर्ष पन्नासावे
अंक पहिला ऑक्टोबर १९६५
संपादक श्री. र. कावळे

शिक्षण प्रसारक मंडळीचे

## सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे ९

# परशुरामीय नियतकालिक


### संपादक मंडळ

☐ अध्यक्ष — प्राचार्य रा. रा. मालेगावकर

☐ उपाध्यक्ष — उपप्राचार्य डॉ. मा. कृ. परांजपे
उपप्राचार्य रं. ना. गायधनी

☐ संपादक — डॉ. श्री. र. कावळे

☐ सदस्य
प्रा. रा. म. गोखले ● ● सामाजिक शास्त्र
प्रा. य. बा. राजे ● ● विज्ञान
डॉ. सौ. अनुराधा पोतदार ● ● मराठी
प्रा. भीमराव कुलकर्णी
प्रा. चंद्रशेखर बर्वे
प्रा. स. रा. केणी ● ● हिंदी
प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर ● ● संस्कृत
प्रा. भ. ना. कुलकर्णी ● ● इंग्रजी

☐ विद्यार्थी प्रतिनिधी
जयंत देव — तृतीय वर्ष साहित्य
जयश्री कानिटकर — तृतीय वर्ष साहित्य

# परशुरामीय

हें सारस्वताचें गोड। तुम्हींचि लाविलें जी झाड॥
*तरी आतां अवधानामृतें वाड। सिंपोनि कीजे॥ ज्ञानदेवी, ११-१८*


**वर्ष पन्नासावे ● अंक पहिला ● ऑक्टोबर १९६५**
**संपादक ● श्री. र. कावळे**






● **संपादकीय** ● ३।

---

● **मराठी विभाग**

ह्या कथेला अंत नाही ● बालचंद्र वाळके ● ५। भ्रातृमीलनाच्या काठावर ● शरद जोशी ● ७। सात कविता ● अशोक पटवर्धन जयश्री नरगुंदकर सुजाता सुपनेकर अविनाश चाफेकर अनिल किणीकर जयंत देव रवीन्द्र घवी ● ९।

---

● **हिंदी विभाग**

कथनी सी करनी करै, सो नर नारायण होय ● उषा मिश्र ● १३। समय का बैंक ● सुलभा जोशी ● १५। स्वप्नदर्शिन्! ध्येयवादिन्!! ● अशोक निरफराके ● १७। गीत ● केशवसिंह प्रथमवीर ● १९।

● संस्कृत विभाग

सेना च मे शक्तिश्च मे अण्वस्त्राणि च मे ● जयश्री कानिटकर ● २० । सुलभा पटवर्धन ● २२ । विद्या विनये न शोभते – एकं संशोधनम् ● विजया दिवेकर ● २४ । अर्थोहि काव्यं विभवः स्व एव ● भानुमती सातपुते ● २५ । शल्यानि ● अशराफ शेख ● २६ । तक्रं फूत्कृत्यं मानवः पिबति ● जयश्री गुणे ● २७ । पाकक्रिया ● कण्टकार्जुन ● २७ ।

● इंग्रजी विभाग

"Catherine Heathcliff" ● Vidyagauri Malegaonkar ● २८ । To Misery ● Rajanikant Belsare ● ३१ । The Waterfall ● Ashok Chaudhari ● ३१ ।

● सामाजिक शास्त्र विभाग

सत्तावनचे स्वातंत्र्यसमर ● उषा पांडव ● ३२ । भारत आणि अण्वस्त्रे ● विष्णू भालेराव ● ३६ । Economics and Art ● Subhash Thakur ● ३७ ।

● विज्ञान विभाग

The Air We Live In ● Vijaykumar Gosavi ● ३८ ।

● प्रथमश्रेणी व पारितोषिकांचे मानकरी ● ४१ । महाविद्यालयीन वार्ता ● ४३ ।

मुखपृष्ठ व सजावट

विजय कृष्णाजी कारेकर, तृतीय वर्ष साहित्य


काहीतरी नवे करावे, त्याला इतरांचा प्रतिसाद मिळावा ही प्रत्येक माणसाच्या अंतरीची इच्छा असते. सर्वच माणसे या भावनेने भारावलेली असतात असे नाही. पण जी व्यथित असतात तीच ' नवे ' पुढे आणण्याचा प्रयत्न करतात.

आणि म्हणूनच विद्यार्थी आणि ' परशुरामीय'चे संपादक यांनी एकत्र येऊन अंकाच्या आकर्षकतेवर विचार केला. नवीन नवीन कल्पनांचे सहर्ष स्वागत केले. या सर्व कल्पना जरी एकाच अंकात समाविष्ट करणे शक्य नसले तरी त्यांचा विचार करूनच या अंकात काही बदल केले आहेत. हा बंधनापलीकडे जाण्याचा एक अल्प प्रयत्न आहे. त्याची यशस्विता आपल्या आपुलकीवरच अवलंबून आहे.

माणसाच्या प्रत्येक कृतीला मर्यादा असतात. आम्हाला मर्यादा आहेत त्या पृष्ठ-संख्येच्या. तरीही अंक अधिक आकर्षक करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात त्यात श्री. विजय कारेकर यांच्या कल्पना आणि कुंचला यांची आम्हाला मिळालेली साथ विसरून चालणार नाही.

तसेच काही विभागांत विद्यार्थीमित्रांचा उत्साह शिगेला पोचला होता तर काही विभाग सद्यःपरिस्थितीला अनुसरून जवळजवळ रिकामे राहिले. इंग्रजी विभागात ही गोष्ट आपल्याला विशेष जाणवेल.

' परशुरामीय ' मराठी कथास्पर्धेच्या नवीन योजनेस बराच प्रतिसाद मिळाला. परंतु ' आपल्या अनुभवावरून काही गुंफावे ' यापेक्षा प्राथितयश लेखकांच्या अनुकरणाकडे विद्यार्थी-लेखकांचा कल दिसला. श्री. बालचंद्र वाळके यांची ' ह्या कथेला अंत नाही ' ही कथा त्यातल्या त्यात उजवी. हिंदी स्पर्धेतील कु. उषा मिश्र यांचा आणि संस्कृत स्पर्धेतील कु. जयश्री कानिटकर व कु. सुलभा पटवर्धन यांचे यशस्वी निबंध प्रसिद्ध केले आहेत. यशस्वी मित्रांचे मनःपूर्वक अभिनंदन ! प्रा. प्र. रा. भुपटकर, प्रा. दु. रा. भारद्वाज व प्रा. अरविन्द मंगरूळकर यांनी परीक्षक म्हणून काम केले याबद्दल त्यांना धन्यवाद !



*या अंकासाठी जाहिराती देणाऱ्या जाहिरातदारांचे व जाहिराती मिळवून देणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार ! अंकाच्या प्रकाशनाच्या कामी प्राचार्य मालेगावकर, उपप्राचार्य डॉ. परांजपे, उपप्राचार्य प्रा. गायधनी यांचे मार्गदर्शन आणि संपादकमंडळावरलि सदस्यांचे विशेष आपुलकीचे सहकार्य लाभले. आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत. श्री. य. गो. जोशी यांनी मुद्रणाचे काम हौशीने व सुबकपणे करून दिले याबद्दल आम्ही त्यांचेही आभारी आहोत. सप्टेंबर महिन्यातील अस्थिर व तावरणामुळे हा अंक वेळेवर प्रसिद्ध करता आला नाही याबद्दल दिलगीर आहोत.*

*सध्या आपण एका संकटकालातून जात आहोत. आज विद्यार्थीवर्गात कर्तव्याची एक नवी जाणीव निर्माण झाली आहे. राष्ट्राच्या इतिहासातील हा एक कसोटीचा क्षण आहे. अन्याय्य आणि पाशवी आक्रमणाच्या प्रतिकारार्थ आपले शूर जवान सीमेवर आज लढत आहेत. त्यांना सहकार्य देणे हे आपले विद्यार्थ्यांचे आजचे कर्तव्य आहे. नागरी संरक्षणाची व्यवस्था उभारून आपणास ते पार पाडावयाचे आहे. आणि यामुळे आपल्या जवानांनी उचललेले हे पाऊल पुढे पडायला सहकार्य होणार आहे. हे पुढचे पाऊल पुढेच पडेल आणि अंतिम विजय आपल्याच पदरात पडेल याबद्दल आम्हाला विश्वास वाटतो.*

*सर्व क्षेत्रांत निर्धारपूर्वक स्वावलंबन, प्रिय मातृभूमीच्या आणि स्वीकृत जीवननिष्ठांच्या रक्षणासाठी सामर्थ्याची सिद्धता, आणि शांततामय सहजीवनासाठी अखंड प्रयत्न ही आपल्या जीवनाची त्रिसूत्री बनत आहे. तिचे पालन सर्वत्र डोळसपणे नि निर्धाराने करू या.*

**जयंत देव**
**जयश्री कानिटकर**
वि द्या र्थी प्र ति नि धी

**श्री. र. कावळे**
सं पा द क

## मराठी विभाग

▲ बालचन्द्र वाळके प्रथम वर्ष साहित्य

# ▼ ह्या कथेला अंत नाही

[परशुरामीय मराठी कथास्पर्धेसाठी आलेल्या कथांतील उत्कृष्ट कथा. प्रा. प्र. रा. अुपटकर यांनी परीक्षक म्हणून काम केले. यशस्वी स्पर्धक श्री. बालचन्द्र वाळके यांचे हार्दिक अभिनन्दन!]

पुलावरून दिसणारं मनोरम दृश्य. नदीकाठच्या गवताला कुरवाळणारे कोवळे किरण आणि त्यामुळे चमचमणारे हिरवळीचे अंकूर. नदीच्या प्रवाहाची मजेदार हालचाल. संध्याकाळची प्रसन्न वेळ!

त्या दोन आकृत्यांची सावली दूरवर लांबली होती. पलीकडच्या छोट्या छोट्या टुमदार बंगल्यांच्या सावल्यादेखील त्यांना येऊन भिडत होत्या. त्या दोन आकृत्या हळूहळू पुढे पुढे सरकत होत्या.

"बंगले किती सुंदर आहेत नाही?"

"पण आपल्या बंगल्याच्या खालीच."

"तसं नाही म्हणा...पण..."

"आणि ते बंगल्यापलीकडे काय दिसतंय?"

"झोपड्या!"

"म्हणजे?"

"तिथंही माणसं राहतात."

"म्हणजे तिथंही माणसं राहतात! त्या गवताच्या फाटक्या, जुन्या, लक्तरलेल्या टीचभर झोपडीत माणसं राहतात!"

"जाऊ दे रे....भिकारडे--पापी आहेत सगळे! चल आता आपण घरी जाऊ या."

"अंहं! तिथं खरंच माणसं राहतात का हे मल पहायचंय."

....झोपडीच्या दोन वीत लांबीरुंदीच्या जागेत दारिद्र्याचा संसार खुरडत होता. तिथं शांततेला जागा नव्हती. अश्रूंना मुभा होती. छताच्या छिद्रांतून देखील दुःखच ओघळत होतं! आजूबाजूला श्रीमंतांचे इमले उभे होते.

...जगण्याची दुर्दम्य इच्छा नेत्रांत तरळत होती. पण...

...पण भराऱ्या मारू शकणारे शक्तिशाली पंख परिस्थितीने केव्हाच खच्ची केले होते. झोपडीच्या चोहोबाजूला जमले होते करुणेचे आशादायी...रिकामे मेघ! तिथं विजेची गर्जना नव्हती. जगण्याची धडपड नव्हती. प्रत्यक्ष जीवनाच्या स्मशानातील मृतचित्रांची चिन्हं!

त्यानं ते सगळं पाहिलं......पहात होता....

दुसरा तोंड फिरवून मनाशीच हसत होता.

त्याचं हृदय हेलावलं. भावना गोठल्या. डोळे डबडबले आणि तो मटकन खाली बसला. वेड्यासारखा मोठ्याने ओरडला...

" झोपडी...झोपडी....झोपडी ! "

" येथे 'माणसं' राहतात....येथे 'माणसं' राहतात"
आवाज ऐकू येत नव्हता कुणालाच...

त्याच्याच हृदयात तो पुन्हा पुन्हा प्रतिसादीत होत होता...

* * *

कडेला लावलेल्या लोभस, डेरेदार झाडांतून डोकावणारा उंच बंगला. वेगळी शान नि सजावट ! रंगविलेल्या ढंगदार भिंती. आतलं आगळं सौंदर्य !—लांब लांब कोचावर पसरविलेल्या हिरव्यागार चादरी. त्यावर शोभणाऱ्या गुलाबी पाकळ्या. चकचकणाऱ्या खुर्च्या. पुस्तकांनी भरलेलं मेज. खालच्या मखमाली गालीच्यांवर पडणारी उन्हाची एकेरी तिरीप ! सगळं सगळं नवं, पण त्याचत्यापणामुळे जुन्याचा मित्र होऊन आलेलं !! त्यांवर खेळणारं गव्हाळ्या रंगाचं, गुबगुबीत हातापायांचं नि प्रसन्न-हसऱ्या चेहऱ्याचं निरागस बालक—बंगला हेच विश्व व भोवतालचा बगीचा ह्या त्याच्या सीमा ! कृत्रिम हिरवळीवर बागडणारं जीवन !

सौंदर्याच्या सगळ्या सीमा लोपल्या होत्या पैशाच्या क्षितिजाखाली !

सत्कार्याची सगळी धुंदी डुंबत होती पैशाच्या उथळ सरोवरात !

जीवन नाचत होतं पैशाच्या तालावर !

" असं जीवन मी कसं जगू ? कुणासाठी–का जगू ?"
बेचैन हृदयात अनेक कडूगोड सूर उमटत होते... सारंच धूसर ! पण जिद्द जबर होती.

* * *

आज त्याच्या विचारांच्या कक्षा विस्तारल्या होत्या. पंख पालवू लागले होते. गाभाऱ्यातून खोल नाद उमटत होते नि मन धावत होतं क्षितिजापलीकडे......

वत्सल मातेच्या प्रतिभेला हात जोडले गेले. देवतांच्या सगळ्या आराधना तेथे विसावल्या. नवं युग घडवायला निघालं होतं नवं मन !

फक्त स्वतःचाच आधार...

" असा रे कसा तू ? मळके कपडे, उदासीन चेहरा, केविलवाणे डोळे—
जीवन जगण्याची हिंमत नाही तुझ्यात ? "


" ते सगळं खरं पण......... "

" पण पैशासाठी—नव्हे जीवनासाठी कला शीक एखादी. "

" हं ! माझे हे जीवन हीच माझी श्रेष्ठ कला आहे ! प्रत्येक जीवन ही एक आदर्श कलाकृती आहे. "

" पण तुझ्या या कलेची उपेक्षा होते असं नाही तुला वाटत ? "

" कलेची उपेक्षा कला नाही करू शकत. "



" अहो शेतकरी माणसांनो—तुम्हाला सुखी करण्यासाठी मी तुमच्या जीवनात कुठलं काव्य निर्माण करू ? "

पण त्यांना या शब्दांचा अर्थ कुठं उमजला होता ! जणू ते खिन्न चेहेरेच बोलत होते :

" काही नको ! शब्दांच्या लीलेतून निर्माण केलेलं तुमचं साहित्य नाही कळत. आमची सगळी साधना नांगराच्या ह्या मुठीत साठविलेली आहे. हिरवळणाऱ्या शेतांतील पिकांच्या पालवीमध्ये आमचं काव्य निर्माण होतं. त्यांच्या हालचालींत आमचे हसरे शब्द कुजबुजतात. ही भूमी हे आमचं जीवन. त्यातून आम्ही मोत्ये निर्मितो. या सर्वांना तुम्ही मोहून गेल्याने तुमचे साहित्य निर्माण होते. आमच्या साहित्यगंगेचा गाभा रखरखत्या उन्हामध्ये उघड्या शरीरांवरून ओघळणाऱ्या घामाच्या एका थेंबात साठविलेला असतो. निसर्ग देवीची अखंड साधना हेच आमचं जीवनसंगीत ! "

......आणि हे बोल त्याच्या मनाला सादावत होते...

" *अहो भिकारीबुवा मला तुमची कीव येते हो.* "

" जेथे नुसते अश्रू ओघळतात नि मन वेदनांनी विव्हल होतं तेथे जीवन सीमित बनतं. आमच्या दारिद्र्याला तुमच्यासारखे शब्दांच्या दोन ओळी लिहिणारे आणि डोळ्याला पाणी आणणारे कवी नाही हाकलू शकत ! " प्रतिसाद.

" मग ? "

" तेथे उत्तर हवे कृतीचे. तेथे स्पष्टीकरण हवे घाम गाळणाऱ्या जीवनांचे—जीवनं फुलवायला हवीत प्रयोगशीलतेने ! " जणू अंतरात्मा उत्तर देत होता.

घायकुतीला आलेलं मन ! त्याचे सगळे संकल्प कोलमडले !

पाणी तुंबलं होतं, पण वाहायला जागा नव्हती व्यवहाराच्या दिव्यावर तत्त्वे जळत होती !

तडफडणारा पक्षी तसाच पंख फडफडवीत होता पुलाच्या कठड्यावर त्यानं मान टेकविली होती. मनात विचारांचा विरोधाभास निर्माण झाला होता.

' हे असं का ? '

' त्यासाठी मी काय करू शकेन ? '


....आणि त्याच्या जीवनकथेला सुरुवात झाली ! मग एक एक प्रसंग जीवनाला घाट देत होता....त्याच्या एकट्याच्या जीवनाचीच काही ही कथा नव्हती !

*आकाशातील ढगांच्या कडा या वेळी संध्येच्या किर*णांनी लकेरल्या होत्या. पुन्हा नव्याने रंग उमटत होते. निळ्याभोर अनंतात एक श्वेतपक्षी उंच उडाला. दूर दूर जात होता तो आकाशातील अस्तित्वाला भेटायला !

त्याकडे तो वेड्यासारखा टक लावून पाहत बसला.

—आणि कथा तशीच होती......

नुकतीच सुरू झालेली !



△ **शरद जोशी** पदवीपूर्व शास्त्र

## ▽ आत्मीलनाच्या काठावर

--अशीच एक शुचिर्भूत सायंकाळ ! वाऱ्याच्या तरल लहरी ! त्या हुरहुर वाढवत आहेत ! लाटांचं सुरेल संगीत चालू आहे आणि समोरील ते अवर्णनीय सौंदर्य दृष्टीनं, स्पर्शानं आणि कानांनी टिपण्याचा असफल प्रयत्न चालू आहे.

क्षितिजाच्या निळाईचा आणि क्षितिजपार लाल सौंदर्याचा वेध घेणारे डोळे, तिरंगी वाळूत मुडपलेले पाय आणि लाटांचं मंद कूजन ऐकताना रोमांचित होणारी कर्णसंपुटं, सारा आत्माच ते महान सौंदर्य वेचण्याचा प्रयत्न करत होता.

खरंच ! विश्वदर्शन ते याहून वेगळं काय असेल ? सिंधुसागर, गंगासागर आणि हिंदुसागराचं अपूर्व मीलन ते ! एकमेकांवर आपटून फुटणाऱ्या, फेसाळणाऱ्या लाटांवरचा गुरगुरणारा फेस भ्रातृमीलनाचा अपार आनंद लुटत होता.

खडकावरून ओघळणाऱ्या रुपेरी फेसाच्या माळा ! क्वचित मोठ्या लाटांबरोबर उडणारे, दिग्विजयाच्या सप्त-रंगाने माखलेले ते तुषार ! समुद्रात खोलवर शिरणाऱ्या नौकांची शिडं ! आणि मधूनच दूरवर नुसताच नभात विरणाऱ्या कुठल्याशा आगबोटीचा धूर ! प्रत्येक लहरी-बरोबर उसळणारे, ताऱ्याप्रमाणे क्षणार्धात चमकून नष्ट होणारे ते असंख्य खवले ! सारं सारं सांगत होतं-- भरती-ओहटी हाच जीवनाचाही क्रम आहे.

क्षितिज फोडून, फेसाळत, फोफावत, कमान टाकत उडणाऱ्या लाटा, मागे वळूनवळून सूर्याला अर्घ्यदान करीत होत्या, मातृभूमीचे पाय खोडसाळपणानं धुवत होत्या आणि हसत-हसत, किनाऱ्यावर उसळी घेऊन आपटताना, जमलेल्या मानवप्राण्यांना अभूतपूर्व आनंदाचा साक्षात्कार घडवत होत्या !

त्या स्पर्शाबरोबर माझ्या मनात रवीन्द्रनाथांच्या त्या ओळी त्या लाटांच्याच मृदुपणानं घोळू लागल्या—

" In your crystal-clear water,
The sun and the stars behold themselves
And at your swift touch,
My mind awakes, and
I know myself ! "

--आणि या विश्वघडामोडीत मी तरी कोण ? त्या घडामोडींचा एक तुच्छ परिणाम ! स्वातंत्र्यवीर सावर-करांच्या या व्याख्येचा प्रत्यय आता मला आला.

खरंच हा विश्वसाक्षात्कार होता आणि समोरच ब्रह्म-साक्षात्कार उभा होता, दोन खडकांच्या रूपानं !

इथंच स्वामी विवेकानंदांना साक्षात्कार झाला ! हिंदुधर्माची पताका अमेरिकेत झळकवणारं एक दिव्य व्यक्तिमत्त्व इथंच भारावून गेलं होतं ! त्या महान चरणांचा पदक्षेप इथंच झाला होता ! जरा कान देऊन ऐकलं, तर विवेकानंद-आश्रमातले सनईचे स्वर ऐकू येत होते. सर्वांच्या आणि माझ्याही नकळत माझं मस्तक त्या धूलिकणांवर टेकलं गेलं, धन्य वाटलं. आनंदाश्रू आणि तीर्थोदकात भिजलेली ती वाळू चटकन रुमालात बांधून घेऊन मी खडकांच्या रांगेवर पळालो.


पलीकडेच वाळूची एक सुरम्य टेकडी पसरली होती. सर्वजण मावळत्या सूर्याचं ऐश्वर्य न्याहाळत होते, कोणी त्या वाळूच्या टेकडीवरून उतारानं समुद्राकडे धाव घेत होते, कुणी त्या दुधाळ फेसात घोटे बुडवून उभे होते. एक लंबवर्तुळाकृती हळूहळू नजरेआड चालली होती, त्या हृद्य क्षणांचा वियोग साऱ्यांनाच असह्य झाला होता.

लोकांची गडबड थांबली, श्वास रोखले गेले, पापण्या थरारल्या, बाहुल्या शहारल्या, अंगे रोमांचित झाली आणि अखेर पांढऱ्या ढगांनी लाल, बदामी, पिंगट कड सोडून दिली.

आणि त्याच वेळी तिकडे, पिसांच्या संथ समुद्रातून हंसानं डौलदार चाल करावी, त्याप्रमाणे मऊमऊ ढगांची दुलई बाजूस सारून शशिराजाने गगनात वेधक चाल केली, मंद-शीतल किरणांचा वर्षाव करून !

अशा या वातावरणात मन धुंद झालं होतं. समुद्राच्या लाटांबरोबर आणि गुणगुणणाऱ्या वाऱ्याबरोबर एक साद ऐकू आली. कधीही परत न येण्याकरता गेलेल्या प्रिय-कराची वाट पहात शेवटपर्यंत कुमारी राहणाऱ्या कन्या-कुमारीची ती साद....

येई प्रियकरा ।
येई प्रियकरा ।



• सा त

• क वि ता

## अंगार अंगार

अंगार अंगार । अंतरी बाहेरी । अशा धुवाँधार ।
कोसळाव्या सरी ॥ येईल येईल । कधी महापूर ।
सरोनीया व्यथा । निथळेल ऊर ॥

▲ **अशोक पटवर्धन**
तृतीय वर्ष साहित्य ●

## तगमग

दाहक तगमग भेदित जावी ●
शिरशिररूनी अन् कळा उठाव्या ●
खिन्न धुक्याची सुकी लाकडे ●
व्याकुळ त्याचे बसता चटके ●
शून्य मनाची बंद दालने ●
चिरीत जावी पिवळी पाने ●
अशी धडाडत जळून जावी ●
सर्व सावटे ती वितळावी ●

▲ **जयश्री नरगुंदकर**
द्वितीय वर्ष साहित्य ●

## एका क्षीण क्षणी

एका क्षीण क्षणी ● वाऱ्याच्या स्रोतात ● प्रकाशपक्षी काजळी पंख पसरून ● पडतो वातीवर चोच वासून ● आर्ततेच्या निश्वासात नसते मागायचेही त्राण ● जळलेल्या स्नेहाचा थेंब ● उसासून काजळी रेषेची ● काढत राहतो नक्षी ● काजळी वाटेवर त्याच्या रक्ताची ● धार काळी ! ● हेच त्याचे जीवन...मिटणारे ओघळत राहते... थेंबाथेंबाने... तरी विझल्या क्षणी पेटलेली आग ● फुलवित राहते पंचप्राण ● —आणि स्नेहधार ठिबकत राहते ● निरपेक्षतेतून ● अपेक्षापूर्तीची !

▲ कु. सुजाता सुपनेकर
प्रथम वर्ष साहित्य ●

## बोल राहे ओटांवरी

फुलांतील गंध तिथे ● फुलांतच गुदमरे ● तुटलेले पान आणि ●
अर्ध्यावर ठेवी वारे ● चांदण्यांच्या ओठांची अन् ● हालचाल होई जरी ●
शद्ब फुटेना त्यांतून ● बोल राहे ओठांवरी ● सृष्टीसवे बोलायला ●
येई वारा झुळझुळ ● निघोनीया जाईपरी ● मुग्धतेने हळहळ ●
अंतरीचे भाव सारे ● ओठांवर अडतात ● आसुसल्या
नयनांनी तुझ्यासवे बोलतात ●

▲ अविनाश चाफेकर
द्वितीय वर्ष साहित्य ●

## शहाणा

म्हणतात – प्रेमात आणि युद्धात सर्व 'माफ' असते ● म्हणतात – प्रेमात आणि युद्धात एकच चूक सर्वनाश करते ● तेव्हा मी म्हणतो प्रेमात आणि युद्धात शहाण्याने 'पडू' नये ● पडल्यास नंतर तरी शहाणे

▲ अनिल किणीकर
तृतीय वर्ष साहित्य ●

## चिटपाखरू


मनाची चिटपाखरं ● जेव्हा भिरभिरतात ● तेव्हा मी कसनुसतो ● आणि मग ● पिकासोच्या घुबडाचा ● हिरवा धुत्कार ● माझ्या छातीत पिवळी ● कळ आणतो ● मला एकदम डोळ्यां--पुढं दिसू लागतं ते मार्क टोबीनचं 'सर्पंटाइन' आणि काळं कोळ्याचं जाळं आणि त्यात तडफडणारं ● एक सोनेरी चिटपाखरू ● एक लहानसं चिटपाखरू

▲ जयंत देव
तृतीय वर्ष साहित्य ●


## कविते

नको खुणाऊ दूर नभातुन युगे, युगे ही सरून गेली
गहन तमाची वाट चाललो, शक्ती आता मुळी न उरली...
क्षणाक्षणांनी तुटते अंतर कणाकणाने जळते जीवन
विरह व्यथेहुनि दाहक बनते अंतरातले नाजुक बंधन !
दिनरातींची फिरती चक्रे, दूर तरी का ऐशी असशी ?
क्षितिजावर जर तुझे राहणे कशास मजला स्पर्शुन जाशी ?
चैतन्याची लहर सखी तू आकाशीचा निळा नीलिमा
अचेतनाचा शाप मला तू चांदण्यातली स्निग्ध पौर्णिमा
जुई पुष्पांची तनु तुझी ती गंधमयी ही तुझी भूषणे
हिरवी, हळवी नाजुक पर्णे अशी तुझी ग असती वसने
तू शब्दांच्या अतीत राहूनी व्यथेहुनीहि व्याकुळ व्हावे
सायासास्तव थोडे शिणता त्याचेहि तुज ओझे व्हाये
तुझी कांति तर ऐशी नाजुक शब्दांचेहि कोन खुपावे
नाजुक असुनि तशीहि दाहक तुला भेटता जळून जाणे
युगायुगा.चा शापदग्ध मी, ऐसे अमृत कैसे होणे
परिस्थितीचा परीघ असुनी, मनात माझ्या एकच उर्मी
तुला भेटूनी जळत राहणे मनिषा माझी जन्मोजन्मी !


▲ रवींद्र घवी
तृतीय वर्ष साहित्य ●



प्रा. **कृष्ण नारायण पिले**
शिक्षणशास्त्र व तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक
शि. प्र. मंडळीतील अडीच तपांच्या
सेवेनंतर मे १९६५ मध्ये सेवानिवृत्त



नामवंत माजी विद्यार्थी
प्रा. **अशोक अकलूजकर,** एम्. ए.
हार्वर्ड फेलोशिप मिळवून अमेरिकेस



जर्मन विभाग ट्यूटर श्री. **गो. म. दामले**
पीएच्. डी. साठी जर्मनीस प्रयाण



प्रा. अ. अ. **मुतालिक-देसाई**
फुलब्राईट शिष्यवृत्ती मिळवून
अमेरिकेस प्रयाण




प्रा. **म. कृ. केळकर,** एम्. एस्सी.
पुणे विद्यापीठ एम्. एस्सी. परीक्षेत
विद्यापीठात सर्वप्रथम



दि. २७ मार्च १९६५ रोजी डॉ. **जयंत विष्णु नारळीकर**
यांच्या व्याख्यानापूर्वी ग्रंथालयात झालेल्या चहापानप्रसंगी
डॉ. **नारळीकर** व प्राचार्य **मालेगावकर** संभाषण करीत असताना



डॉ. **जयंत विष्णु नारळीकर**
ग्रंथालयातील अभ्यागत - पुस्तकात स्वाक्षरी करीत असताना



उषा मिश्र तृतीय वर्ष साहित्य

# कथनी सी करनी करै, सो नर नारायण होय।

[परशुरामीय हिन्दी निबंध–स्पर्धा का सर्वोत्कृष्ट निबंध। परीक्षण का कार्य प्रा. भारद्वाजजीने किया। कु. उषा मिश्र-जीका हार्दिक अभिनंदन !]

प्रसिद्ध संत तुलसीदास ने लिखा है कि :—

जिनको कथन वदन सब साँचो,और न फोकट बानी।
इन्द्रिय जीति, जीति मन-मनसा, ते परमात्म प्रवानी ॥

इससे स्पष्ट है कि संतों के विचार से सच्ची कथनी द्वारा ही मनुष्य परमात्मा को प्राप्त करता है। यह सत्य है कि कथनानुसार कार्य ही मनुष्य को देवत्व प्रदान करता है। मानव में अच्छे गुणों का समावेश ही देवत्व है। उच्च विचार ही मनुष्य की सबसे बड़ी पूँजी है और यदि वह उन्हें अपने जीवन में कार्यान्वित कर सके तो इसमें कोई संदेह नहीं कि वह नारायण-स्वरूप न बन सके।

इसका जीता-जागता उदाहरण हमारे सामने है। 'प्राण जाहि पर बचन न जाई' का पालन कर ही आज दशरथ व उनके चरण-चिह्नों पर चलकर राम, देवता के रूप में पूजे जाते हैं। मानव क्या से क्या नहीं कर सकता? केवल उसे प्रेरणा चाहिए। हम अपने विचारों द्वारा ही प्रेरणा ग्रहण करते हैं। सर्व-प्रथम विचार कर ही मानव आगे बढ़ने का प्रयत्न करता है किन्तु जब मंजिल की कुछ सीढ़ियों तक कदम रखकर ही वह अपने कथन को भूल अन्य रास्ते पर चल देता है, वहीं वह भटक जाता है।

आज जैसे-जैसे हमारा देश प्रगति कर रहा है वह सिद्धान्त भी विलुप्त होता जा रहा है। इसके पूर्व, प्राचीन समय में, लोग अपने कथन को निभाने के लिए प्राण तक दे देते थे। यही कारण था उस समय के महापुरुष देवताओं को भी अपने वश में कर लेते थे। प्राचीन भारत इसी लिए 'सोने की चिड़िया' कहलाता था। उस समय सभी प्रकार की उन्नति होती थी। लोगों का बाह्य और आन्तरिक विकास होता था। क्योंकि उस समय न तो छल-कपट था, न चोरी, न ही झूठ। मनुष्यों के हृदय शुद्ध थे और विचार उच्च। केवल उनके विचार ही उच्च न थे वरन् उनका पालन भी वे प्राणपण से करते थे। यही कारण है कि इसी भारत में नारायण के गुणों से युक्त महात्मा बुद्ध, तुलसी, गांधी, आदि ने जन्म लिया।

संसार के सभी प्राणियों में मनुष्य एक ऐसा प्राणी है जिसमें विचार करने की शक्ति है। इसी शक्ति ने उसे अमर बना दिया है। अतः मानव का प्रथम कर्तव्य तो यही है कि उसके भावों व कर्म में साम्य हो। मानव के हृदय को खीरे के समान नहीं होना चाहिए। वह तभी जीवन की पूर्णता प्राप्त कर सकेगा तथा मुक्ति के मार्ग पर अग्रसर हो सकेगा यदि उसके कर्म

व कथन में अन्तर न हो। मानव का यह गुण ही उसकी अमरता है। जीवन के वास्तविक सुख व आनन्द का भोग करता हुआ वह देवत्व प्राप्त कर सकेगा।

मनुष्य को उसके लक्ष्य की ओर बढानेवाले तथा लक्ष्य प्राप्ति में सहायक उसके विचार ही हैं। इन विचारों को पूर्ण रूप से कार्यान्वित कर ही मनुष्य जीवन का वास्तविक लक्ष्य प्राप्त करता है। तभी सफलता उसके चरण चूमती है। उदाहरण के लिए हम गौतम बुद्ध को ले सकते हैं। उन्होंने मानव को मोक्ष प्राप्ति के लिए उपदेश दिये और स्वयं भी उस कथन पर अमल करते रहे। उन्होंने औरों को सत्य-अहिंसा का पालन करने की प्रेरणा दी तथा स्वयं भी जीवन पर्यन्त उसका पालन किया। इसी कारण आज वे पूज्य हैं, उन्हें हम भगवान बुद्ध कह कर पुकारते हैं।

किन्तु आधुनिक युग में मनुष्य इस सिद्धांत को भूलकर अज्ञान के पथ पर भटक रहा है। उसके हृदय में कुविचार व जिह्वा में मीठे बोल हैं। जन साधारण की तो बात क्या आजकल के नेता भी ऊपर से 'मियां मिट्ठू' बन कर अन्दर कालिमा छिपाये हैं। चुनाव के समय अनेक तरह के आश्वासन देकर चुने जाने पर केवल अपने ही स्वार्थ को ध्यान में रख कर न केवल वे अपने जीवन को असफल व कलंकित करते हैं, वरन मानव जीवन की उन्नति में बाधक बनते हैं।

इसी उल्टे सिद्धान्त को अपनाने के कारण आज का मानव-मानव से भी बदतर बन गया है। उसमें कोई शान्ति नहीं है। उसका हृदय कुविचारों का कुंड है तथा मुँह में मक्खन का लेप। इसीलिए न तो उसमें कोई शान्ति है न ही मानवता। प्राचीन समय में हम मुनियों के शक्ति, वीर, कौशल्य की अनेक घटनायें सुनते आये हैं। मनुष्य में इतनी शक्ति थी कि वह जैसा चाहता था वही हो जाता था। उसमें शाप व वरदान देने की अपूर्व शक्ति थी। देवत्व यह नहीं तो और क्या है? इस शक्ति का कारण, और कुछ नहीं, उसके कथन व कार्य की समानता थी। उसका आन्तरिक व बाह्य विकास था। इसीलिए वे देवत्व प्राप्त मानव थे, जो अपनी इच्छानुसार मरते थे तथा दूसरों को जिलाने की भी शक्ति रखते थे।

किन्तु आज का मानव इसके उल्टे मार्ग पर चल कर पशुत्व प्राप्त कर रहा है, जो बल व आन्तरिक शक्ति से नहीं वरन् छल से अपने कार्यों को पूर्ण करता है। यही कारण है कि आज देश में किसी प्रकार की उन्नति नहीं हो रही है। मनुष्य पशु के समान एक दूसरे के खून के प्यासे हैं। वे भूख से बिलबिलाते, अनेक दुख, रोग, व्याधि से घिरे पशुसमान जीवन व्यतीत करते हैं।


अब इस विषय में दूसरी ध्यान देने योग्य बात यह है कि केवल कथनी निकम्मी वस्तु है। हिन्दी साहित्य के अन्तर्गत ऐसी अनेक उक्तियाँ हैं जो इसको स्पष्ट करती हैं। हम कहते हैं कि 'थोथा चना बाजे घना' जिसका तात्पर्य यह है कि जिसके भीतर तत्त्व नहीं है वही बढ बढ कर बोलता है। यहाँ पर 'करनी के बिना कथनी महत्त्वहीन है' इसे स्पष्ट किया गया है। इसी प्रकार इसी भाव को स्पष्ट करते हुए कहा जाता है 'जो गरजते हैं वे बरसते नहीं'। इसका संकेत यह है कि जो आवश्यकता से अधिक कहता है वह अपने कहे अनुसार उतना कर नहीं सकता। यह बात एकांगी है अर्थात केवल बढ़-बढ़ कर बातें करना और उसके अनुरूप कार्य न करना, सच्चाई नहीं वरन् झूठेपन का द्योतक है। यह आत्मा की जागरूकताका लक्षण नहीं है। ऐसे मनुष्यों से जड प्रकृति अच्छी, जहाँ कथनी नहीं वरन् करनी ही करनी है। फूल बिना कुछ कहे ही अपनी सुगंध से सारे वातावरण को सुरभित कर देते हैं। समय आता हैं, बाग और उपवन में अनेक प्रकार के फूल खिलते हैं, फल पकते हैं जिन्हें पा कर हमारा हृदय आनंदित हो उठता है किन्तु वे अपनी करनी के सम्बध में कुछ नहीं कहते।

करनी के बिना कथनी जितनी बुरी है उतनी कथनी के अभाव में करनी नहीं। जितना हम करते हैं उसकी पूर्व सूचना यदि हम कथनी द्वारा दे सकें तो यह आत्मा की सच्चाई का द्योतक है, साथ ही यदि हम उसके अनुरूप कार्य करते हैं तो समाज का विश्वास हमारे ऊपर जमता है जिससे हमको भी एक प्रकार का संतोष व प्रसन्नता होती है। यह विशेष गुण व सराहनीय विशेषता मनुष्य की अपनी है इसीलिए कहा जाता है कि अमुक व्यक्ति 'बात का धनी' है। बात धन तभी बन सकती है जब हम उसी के अनुरूप कृत्य करें, अन्यथा बात 'वात' या हवा है, अर्थात उसका कोई महत्व नहीं वह हवा के समान ही उड जाती है।

कथनी के अनुसार कर्म करके नर नारायण किस प्रकार हो सकता है अब यह प्रश्न हमारे सामने उठत

है। इसके उत्तर में कहा जा सकता है कि नारायण की विशेषता हमारी इच्छा की पूर्ति करने में है। नारायण के विभिन्न अवतारों का रहस्य भी यही है कि वे प्रेम के वशीभूत होकर भक्तों को जो वचन देते हैं उसकी पूर्ति करते हैं। यदि यह नहीं तो उनको अवतार लेने की आवश्यकता भी नहीं है क्यों कि वे सर्व शक्तिमान हैं, उनकी इच्छा के बिना पत्ता तक नहीं हिलता। वे वचनबद्ध हो कर अवतार लेते हैं जैसे नारद, मनु सतरूपा आदि को दिये गये वचनों की पूर्ति के लिए, नारायण ने राम और कृष्ण का अवतार धारण किया और ध्रुव, प्रल्हाद, अम्बरीष जैसे भक्तों की इच्छा पूर्ति की।

मानव भी ब्रह्मा की संतान है वह जीवन का नायक व सभी प्राणियों में सर्वश्रेष्ठ है अतः उसे अपना बाह्य और आन्तरिक विकास कर जीवन को पूर्ण बनाना चाहिए। मानव में ही कार्य करने की, संवेदना व विचार करने की शक्ति होती है। वह यदि चाहे तो देवत्व भी प्राप्त कर सकता है। यदि मानव अपनी कथनी के अनुसार कर्म करे तो उस में भी नारायणत्व आ जाता है। अतः उसे अपने हृदय को शुद्ध कर, मानवीय भावों से परिपूरित कर उचित सोचना व उसी अनुरूप करना चाहिए। तभी वह अमरत्व प्राप्त कर सकेगा। इसी तथ्य को स्पष्ट करने के लिए ही यह कहा गया है कि–कथनी सी करनी करै सो नर नारायण होय।



△ सुलभा जोशी तृतीय वर्ष साहित्य

# ▽ समय का बैंक

आज बी. ए. का रिझल्ट था। सभी उत्सुकता से अखबार की राह ताक रहे थे। जब हम किसी की बाट जोहते हैं तब पल पल युग जैसा मालूम होता है, हमारी भी यही हालत थी। आखिर अखबार मिला। मैं उत्तीर्ण तो हो गया था, लेकिन 'सेकंड क्लास' में और आशा रखता था 'फर्स्ट क्लास' की। मेरे और कुछ मित्रों का भी यही हाल था। हम फूले न समा रहे थे। एकाएक मुझे अपने एक मित्र की याद आयी, देखा उसका नम्बर नहीं था। अब हमारा कर्त्तव्य था कि उसे सान्त्वना दें। हम उसके घर पहुँचे। किन्तु प्रथम कौन बोलेगा? किस प्रकार संभाषण आरंभ करें? आखिर किसी तरह से बातचीत आरंभ तो कर दी। उसी सिलसिले में हम में से एक प्रश्न कर बैठा, 'तुम जैसा विद्यार्थी अनुत्तीर्ण कैसे हुआ?' उस ने उत्तर दिया, "क्या कहूँ भैया, पहले तो समय ऐसे वैसे ही उडाया, इम्तहान नजदीक आया था फिर भी 'स्टडी' नहीं किया। मैं चाहता हूँ, अगर कोई वे दो महीने मुझे वापिस दे तो...तो क्या से क्या हो जायगा। लेकिन 'अब पछताए क्या होत है जब चिड़िया चुग गयी खेत'।" हम ने उसे ढाढ़स बँधाया कि दिल छोटा न करो; फिर से प्रयत्न करो, अगली बार तुम अवश्य यश पावोगे।

हम वहाँ से निकले। रास्ते में हमारी वही चर्चा चल रही थी। कोई कह रहा था, अगर मुझे और पाँच मिनट मिलते तो मेरा 'फर्स्ट क्लास' निश्चित था। बीती बातों की याद की गई। कुछ पाँच दस मिनिट की देर होने के कारण किस किस का क्या क्या काम बिगड़ा, यही विषय था। और हरेक व्यक्ति आखिर में कहता था, 'अगर उतना समय मुझे मिलता तो....'। परस्परों को बधाई देकर हम बिदा हुए।

मैं अपने दोस्तों के साथ कहीं घूमने जा रहा था। कुछ दूर जानेपर हमने देखा, एक बड़ा 'क्यू' लगा है। न जाने कहाँ से आरंभ हुआ था। आगे चलकर देखा तो एक नई इमारत नजर आ रही थी। किसकी है, कैसी है कुछ पता न था। लेकिन इसी इमारत के प्रवेश-द्वार से 'क्यू' आरंभ हुआ था। इतना बड़ा 'क्यू' किसलिए होगा यहाँ? आजकल तो सभी जगह 'क्यू' दिखाई देते हैं और इसी कारण अनुमान न

लगा सकें। एक आदमी से पूछा, 'क्या आप बता सकते हैं, कि यह 'क्यू' किसलिए है ? यह इमारत काहेकी है ? यहाँ क्या मिल रहा है ?' जिससे पूछा वह व्यक्ति शायद तुनुकमिजाज था। हमारी नम्रता के बदले में हमें उत्तर मिला—'वहाँ बोर्ड है, जाकर पढ़ो, क्या पढ़ना लिखना जानते नहीं हो ?' बेचारे हम, मुँह छोटा करके आगे चले, बोर्ड देखा—'यहाँ समय मिलेगा'। हम फिर असमंजस में पड़ गए। समय क्या कोई मिलनेवाली चीज़ है ? बहुत माथापच्ची करने के बाद भी अर्थ न समझ सके। हारकर वहाँके एक व्यक्ति से पूछा। यह व्यक्ति तो भला दिखाई दे रहा था, उससे उत्तर पाने का भी सौभाग्य प्राप्त हुआ। वह इमारत एक बैंक की इमारत थी। लेकिन वह बैंक समय का था। और उसमें समय का लेन-देन हो रहा था। जिससे हमें यह जानकारी मिली वह कह रहा था, 'पाँच साल पहले मैं एक 'इंटरव्यू' के लिए गया था, लेकिन मुझे इस मिनट की देर हुई और वह नौकरी मैं पा न सका। आज बैंक में से पाँच साल और दस मिनट वापस लूँगा, और मुझे वह नौकरी मिल जाएगी।'

इतने में पास का दूसरा आदमी बोला। 'हाँ, मैं भी दस साल पहले अपनी शादी ठीक करने जा रहा था, किन्तु दो मिनट की देर हो गयी और मैं उस लड़की से शादी न कर सका। आज अगर मुझे दस साल और दो मिनट मिल जाएँगे तो मेरी चाह पूरी होगी'।

इसी तरह सबों में बातें हो रही थीं। किसी को एक सेकंड की देर होने के कारण वह अपनी माँ से न मिल सका था और उसकी माँ उसे मिले बिना ही स्वर्ग सिधारी थी। किसी को दस सेकंड की देर होने के कारण वह धनवान न बन सका था। किसी की कोई तो किसी की कोई चाह पूरी न हो पायी थी और कारण था केवल 'थोड़ी देर'।

वे सब लोग उतना समय पाकर अपनी अपनी चाह पूरी करना चाहते थे। हम लोग भी 'क्यू' में खड़े रहें। ऐसे सुअवसर से फायदा न उठानेवाला एक केवल मूर्ख ही हो सकता है। हम भी क्यों न बैंक से समय लेकर अपनी चाह पूरी करें ? समय के अभाव में हमारी पढ़ाई नहीं हुई और हम 'फर्स्ट क्लास' न पा सकें तो अब बैंक से समय लेकर हम 'फर्स्ट क्लास' पा सकते हैं। हमारा अनुत्तीर्ण मित्र भी अब उत्तीर्ण हो सकता है। हमने देखा तो वह मित्र भी हमें 'क्यू' में दिखाई दिया। समय का बैंक खोलनेवाले को हम धन्यवाद देने लगे। लोग बैंक में जाते थे और बाहर आते समय बड़े प्रफुल्ल दिखाई देते थे। हम धीरे धीरे बैंक के नज़दीक आ रहे थे। अब हमने देखा कि वहाँ और एक 'क्यू' है। वह 'क्यू' बहुत ही छोटा था। मैं सोच में पड़ गया कि यह छोटा 'क्यू' किसलिए ? पास के आदमी से पूछा तो वह बोला, 'अजी साहब, इन्होंने हमारा बड़ा उपकार किया है, मैं तो उनका हमेशा के लिए कृतज्ञ रहूँगा।'

"उपकार ? कैसा उपकार ?"

"अरे मिस्टर, हम बैंक से समय लेने आये हैं, लेकिन बैंक भी हमें समय कहाँ से देगा ?"

"हाँ। तो मतलब यह कि ये लोग अपना समय बैंक में रखने के लिए आये हैं।"

"बिलकुल ठीक"

"पर, क्या इनके पास इतना ज्यादा समय है ? ऐसे कैसे लोग हैं ये ? हमें तो समय की आवश्यकता जान पड़ती है।"


'हाँ हाँ। लेकिन भाईसाहब, ऐसे भी तो कुछ लोग होते हैं कि जिन्हें फिक्र होती है कि अब समय कैसे बिताएँ। उनके लिए तो अच्छी सुविधा हो गयी। वे भी लोग ऐसा कहते हैं। उनमेंसे एक ने तो कहा, "समय कैसे खर्च करें इस समस्या को हल करने का यह एक अच्छा उपाय मिला। अरे भैया, समय हम तो ऐसा ही आलस्य में, सोकर काटते हैं, अगर बैंक में रख दिया तो कम से कम सूद तो मिलेगी"। ऐसे लोग छोड़ दीजिए। और भी कुछ लोग ऐसे होते हैं, जिन्हें ज़िंदगी एक बोझ-सी मालूम होती है, गम के दिन नहीं कटते हैं, और जो चाहते हैं कि किसी न किसी तरह जीवन से मुक्तता पायें। विरही लोग हैं, जो अपना समय जल्द ही काटना चाहते हैं। इस प्रकार के लोग बैंक में समय रखने आये हैं। और उन्हीं के कारण हम समय प्राप्त कर रहे हैं।

बोलते बोलते हम दरवाज़े के नज़दीक आये और बेल बजने लगा। बैंक बन्द होने का समय आ गया था। केवल दो-चार लोगों को ही 'समय' मिलनेवाला था। लोगोंमें गड़बड़ी मची। हमारे पीछे के लोग हमें

ढकेलने लगे। भला हम कैसे मानते! हम पहले आये थे, हम ही पहले जाएँगे। इतने में किसी ने पूछा, 'क्या आप लोगोंने समय की माँग के लिए अर्जी पेश की थी? कलतक अर्जियाँ पेश करनी थीं, लेकिन बहुत भीड होने के कारण आज भी कई लोगोंने अर्जियाँ दीं और उनका स्वीकार भी हुआ। अभी पंद्रह मिनट पहले अर्जी स्वीकारना बन्द किया गया। मैंने अर्जी पेश की थी, अत: अब 'क्लेम' मेरा है।' हाय रे भाग्य! यहाँ भी हमें पंद्रह मिनट की देर हो गयी। मगर, अब ये पंद्रह मिनट भी माँगेंगे और अपनी आकांक्षा पूरी कर लेंगे।

किन्तु, बैंक बन्द होने का समय अत्यंत समीप आया। फिरसे गड़बड़ी मची, सब लोग चाहते थे कि 'पहले हम जा सकें और समय पा सकें। बहुत शोर मचा, झगडा शुरू हुआ क्योंकि पीछेवाले लोगोंको आगे नहीं जाने देते थे। बेल हो रहा था, बैंक के दरवाज़े बन्द किए जा रहे थे और लोगोंकी भीड अन्दर घुसना चाहती थी। इसी समय किसी ने मुझे इतने ज़ोर से धक्का दिया कि मैं गिर पडा। सर में चोट लगी और, मैं चिल्लाया, 'अरी माँ, मैं मर गया।'

मैंने आँखे खोलकर देखा तो माँ मेरे पास आकर पूछ रही थी,—'क्या हुआ? क्यों चिल्लाया तू' मैं अपना सिर सहला रहा था, शायद नींद में दीवार से टकरा गया होगा। मैं पूरे होश में आ गया, लेकिन माँ को तो कुछ जवाब न दे पाया।



△ **अशोक निरफराके** प्रथम वर्ष साहित्य

# ▽ स्वप्नदर्शिन्! ध्येयवादिन्!!

"आ गये हैं हम यहाँ तो
गीत गाकर ही उठेंगे!"

वाह! कितना आत्मविश्वास! क्या ज़िद! कितनी प्रशंसा करें तुम्हारी इस उदात्त ध्येयगंगा का—जो इन शब्द बुद्बुदों में से गंभीरतासे प्रवाहित हो रही है!

कितना भव्य स्वप्न! तुम अपने ध्येयगीत से सारा सारा अवकाश गूँजित करनेवाले हो।....तुम्हें लग रहा है, तुम्हारे वे स्वर लक्ष-लक्ष अन्तरों में प्रतिगूँजित हो उठेंगे। तुम अपनी दृष्टि में एक चित्र खड़ा किए हो .. कोटि-कोटि हृदयों के श्रवणगात्र तुम्हारे मुख से निकलनेवाला प्रत्येक शब्द सुनने के लिए आतुर हुए होंगे!... एक प्रेषित के समान तुम्हारा भव्य स्वागत होगा।... सब लोग मात्र तुम्हारे लिएही उत्कण्ठा से अभिभूत हुए होंगे।...तुम...तुम उन्हें एक प्रचोदक चुनौती देनेवाले हो।...तुम समझ रहे हो, कि समूर्त पर्युत्सुकता तुम्हारी चुनौतीकी ही प्रतीक्षा कर रही होगी।....और तुम्हारे प्रत्याशित चुनौती देतेही उसे उत्कटतम प्रति दाद मिलेगी—जो अनन्त हृदयागारों में शतगूँजित हुई हो।....मात्र तुम्हारे प्रेरणा गान के स्वरों का निकलना, और निमिषमात्र में—करीब करीब जागृतावस्था हो, और केवल घडीकी किनकिनाती सूचना मिलते ही शय्या के बाहर पडे—उसी तरह, सजीव मनुष्य सहसा उठेंगे और कार्यारम्भ करेंगे। ..

स्वप्न तो कौतुकास्पद हैही। किन्तु....किन्तु आखिर वह एक स्वप्न है।....और कौन कहता है, कि सपनों को तुम देखा न करना? अरे,

'सब इन्हें हैं देखते
अपनी उमर, अपने समय में!'

' किन्तु रुको! क्षणमात्र रुक जाओ! अपने स्वप्नरंजन में से, गूढगूँजन में से केवल कुछ क्षणों के लिए यहाँ भी देखो तो!—सुनो! गौरसे सुनो! किस के हैं ये स्वर? क्या कह रहे हैं वे?

अरे! स्वर तो परिचित लग रहे हैं।

हाँ! ये स्वर हैं तुम्हारे ही जैसे अनेकानेक ध्येय मुग्धों के।—एक उन का भी काल था, जब उन्हों ने भी वही ग्रंथ अपनाया था—स्वप्नाशाओं को, उमंगों

को लगन से हृदयान्तर में समाये हुए। तेजरश्मियों का गीत गाने का अट्टहास करनेवाले एक स्वप्नमूढ हृदय के ये टीसभरे उद्गार !—

" रागिनी मुँहसे धुआँ बनकर निकलती है!
झाँझ, घंटा, शंख सारे बज रहे हैं;
आरतीकी वर्ति किन्तु बलती ही नहीं है !
रागिनी धुआँ बन निकलती है ! "

—' मेरे सारे सारे स्वर केवल मुँह की भाप बन गये। हाँ, मेरे गीतपर चर्चा–विचर्चा, टीका–टिप्पणी, वादविवाद प्रतिवाद–प्रवाद–अपवाद यह सब हुआ अवश्य ! किन्तु बाद में सब ठंडा ! हिमशीत बर्फ ! ज्योति कभी जली ही नहीं। '

उस मॅझिनी के उस चुभनभरे वैकल्य को अपने कानों से सुन सकोगे तो सुनो।—

" I shall have no more joy in Italy !
The country, with its contempt for all ideas, has killed the soul within me ! "

—' सारे जीवनभर अपनी सारी सारी शक्तियों को निचोडकर मैंने संग्राम किया था, अपने राष्ट्रके लिए उदात्त आकांक्षाओं को हृदय में समाये हुए !....किन्तु आनन्द का केवल एक, इतनासा, मात्र एक क्षण ? नहीं ! वह भी नहीं ! प्रत्युत, जिन परम पवित्र और उदात्त ध्येय–ज्योतियों को मैंने जलाये रक्खा था, तबतक जबतक मेरे प्राणों का अन्तिम बिन्दु सजीव हो; उन्हीं को मेरे अपने ही राष्ट्रने तिरस्कृत किया, उनसे घृणा दिखायी; और...और मानो मेरी आत्मा ही विदीर्ण की ! '

मेरे चाँद ! सपने नित नितान्तरम्य होते हैं, सुखद होते हैं...किन्तु यह भी एक वास्तविकता है। इसीलिए कहता हूँ—

' जग के पंथपर यदि
स्वप्न दो तो सत्य दो सौ।
स्वप्नपरही मुग्ध मत हो,
सत्य का भी ज्ञान कर लो ! '

कौन कहे, हो सकता है, तुम्हें भी इसी से पाला पडेगा; तुम्हारे भाग्य में भी यही बदा होगा।...तुम बडे उत्साह से, उल्लास से गाओगे.. किन्तु तुम्हारे स्वर जीवन्त अस्थि-राशियों से ठसाठस भरी हुई उपेक्षा की गहरी गहरी गर्त में पूर्णतया लुप्त हो जायेंगे। न प्रतिध्वनि...न प्रतिगुँजन ! हाँ वे यदि प्रतिगूँजित हो उठेंगेही, तो वह ध्वनि इतनी भयानक, कर्णकटु होगी, कि तुम भी कानों में उँगलियाँ दबा–दबाकर चीख पडोगे, " नहीं नहीं !! "


स्वर गुम जायेंगे...गीत...का कहीं पता न होगा, ध्वनि लुप्त हो जायेगी . अवशिष्ट रहेगा धुआँ, केवल कोहरा ! गूढ, अगम्य, अनाकलनीय, अभेद्य कोहरा ! और उस में तुम–अकेले–दिङ्मूढ !

क्या कहा ? यह सब, सब तुम्हें चलेगा ? तुम इसे हँसते हँसते स्वीकार करोगे ?

' आशा हँसे विमल या बरसे निराशा;
छोडूँ कभी न पथ यह रखूँ सदा–आशा ! ' ?

तो,—

तो तुम्हें वन्दन !
त्रिवार वन्दन !
शतवार प्रणाम !




▲ **केशवसिंह प्रथमवीर** द्वितीय वर्ष साहित्य


## ▼ गीत

दिया स्वयं को बेच, मूल का सूद नहीं चुक पाया।
सत्य मार्ग पर चला, किन्तु ना, हरिश्चन्द्र कहलाया ॥
कब से की थी साध, आश में क्षण-क्षण प्यार संजोया,
जीवन भर रही कराह। आह ले, हिचकी भर-भर रोया।
मैं ने भरी कराह, आह को समझे लोग तराना
वाह, वाह, की ध्वनियाँ निकलीं, 'बड़ा अनोखा गाना।'
मेरी पीर परखते कोई, मैं बाँहें फैलाता,
ताम्र-खण्ड को फेंक चले यों कहते अच्छा गाता।
पर क्यों इतना तूफान उठा है, कोई समझ न पाया।
जो शब्दों में समा सका ना, वह आँसू बन कर आया ॥

खेला हूँ अब तक साँपों से, काले विषधर पाले,
पर शंकर नहिं बन पाया हूँ, पिये गरल के प्याले।
अब, जग चाहे जो कहे, यहाँ तो विष को अमृत माना,
मेरा तो आनन्द रुदनमें, कोई समझे चाहे गाना।
कष्ट-कंटकों में पलकर, मैं मनका सुमन खिलाऊँ,
सौरभ सुगंध जगती को देकर अपना भाग्य सराहूँ।
मेरा दर्द जगत ना जाने अब इस का नहीं परेखा,
आशा है, निर्माण करूँगा, स्वयं भाग्य की रेखा।
जगको हँसना रहे मुबारिक, मुझको अपना रोना,
इन अश्कों में बह जायेगा, जग का कोना कोना।
अब मैं भी क्यों परवाह करूँ जब जग की उलटी माया।
जिस को आँसू बहा सके ना, वह गीत बनाकर गाया ॥





# सेना च मे शक्तिश्च मे अण्वस्त्राणि च मे ।

## निबन्धस्पर्धा

स्पर्धार्थं नियुक्तं विषयमधिकृत्य लिखितौ द्वौ निबन्धौ प्राप्तौ । तयोः कु. जयश्री कानिटकर इत्येतस्याः निबन्धः श्रेयस्त्वेन निर्णीतः परीक्षकैः प्रा. मङ्गरूळकर-महोदयैः । सः पारितोषिकविजेता इति अत्र विभागे प्रथमं निवेशितः। अपरोऽपि कु. सुलभा पटवर्धन इत्येतस्याः निबन्धः अप्रथमोऽपि गुणवान् इति विशेषपारितोषिकार्हत्वेन तैरेव प्रशस्तः । सोऽपि अत्र निवेश्यते । उभयोरपि स्पर्धाल्वोः अभिनन्दनम् । धन्यवादाश्च श्रीमद्भयः परीक्षक-महोदयेभ्यः ।

### १

▲ **जयश्री कानिटकर** तृतीय वर्ष साहित्य

उद्घोषयन्ति सर्वे एकघोषेण, एकस्वरेण । प्रेक्षकाः श्रोतारश्च आश्चर्यान्विताः । ते न जानन्ति 'यज्ञोऽयम्' इति । आधुनिकोऽयं यज्ञः सामूहिकः । यज्ञेन पवित्रीकृता भूः मुम्बापुर्याः । यज्ञपरिसरः 'ट्रॉम्बे' इति । 'अप्सराः' इति यज्ञस्थानम् ।

परम् अस्य अज्ञानादेव एकः श्रोता मामवदत्, "भवति, किमिदम् ? अमेरिकां प्रति 'भिक्षां देहि' इति अण्वस्त्राणां याचना इयम् इति मे मतिः ।"

"धिक् मूर्खे ! न इदं भिक्षाटनम् ।"

"तत् किं सत्याग्रहेण अस्माकं शासकानां 'हृदय-परिवर्तनम्' अण्वस्त्रनिर्मित्याः विषये ?"

"उदारः तर्कः !" अहमब्रवम्; "किं तु नेयं प्रार्थना शासकानाम् ।"

"तेन हि, कं याचन्ते एते सत्पुरुषाः सेनां शक्तिम् अण्वस्त्राणि च ? चीनसंकटनिवारणे एव अयमुपायः चिन्तितः ननु ?"

"युक्तमेतत् ! यदि ते जिज्ञासा, तर्हि कथयामि सर्वं वृत्तान्तम् । सावधानेन चित्तेन शृणोतु भवान् । यदा नीचैः चीनैः आक्रान्तोऽयं देशः, तदा वयम् आश्चर्यौघेन

# साहित्य विभाग : प्रथमश्रेणी व पारितोषिकांचे मानकरी

## बी. ए. परीक्षा एप्रिल १९६५




कु. सुधा जोगळेकर
( गणित )




कु. पद्‌मजा गोडबोले
( गणित )




कु. आशा भट
( गणित )



श्री. शिवाजी देशमुख
( भूगोल )



श्री. टी. आर्. सी. शर्मा
स्वातंत्र्यवीर सावरकर पारितोषिक




श्री. विजय देशमुख
( संख्याशास्त्र )

## पदवीपूर्व व प्रथम वर्ष साहित्य परीक्षा एप्रिल १९६५




बसलेले : कु. **सुशीला कुलकर्णी**, हुतात्मा दाते पारितोषिक; प्राचार्य **रा. रा. मालेगावकर**,
कु. **जयश्री गुणे**, लो. टिळक संस्कृत शिष्यवृत्ती; कु. **पद्मा मेढेकर**,
उभे : श्री. **अशोक निरफराके**, हिंदी पारितोषिक; श्री. **राम हिंवले**, माने संस्कृत पारितोषिक व नगरकर शिष्यवृत्ती

## बी. एस्‌सी. परीक्षा एप्रिल १९६५ : प्रथमश्रेणीचे मानकरी



श्री. एस्. के. सवदी
( रसायन )




श्री. व्ही. व्ही. पेंडसे
( रसायन )




कु. प्रतिभा शाह
( वनस्पतीशास्त्र )



कु. श्यामला जाईल
( रसायन )




श्री. एम्. ए. कुलकर्णी
( रसायन )




श्री. व्ही. एस्. जोशी
( पदार्थविज्ञान )



सौ नीलिमा जाईल
( रसायन )



श्री. सी. एन्. नावलेकर
( पदार्थविज्ञान )



कु. हेमलता पेंढारकर
( वनस्पतीशास्त्र )

संप्लाविताः । किंतु न कैवलैः आक्रमणैः प्रशान्ता तेषां युद्धलालसा । तैश्चीनैः अण्वस्त्राण्यपि निर्मितानि । तेषां महता पापभारेण कम्पिता इयं भूः । भीता सा, भयभीताः सर्वाः भारतीयाः प्रजाः च विष्णुं प्रति गताः । सुखशय्यायां निद्राधीनः आसीत् ईश्वरः । पृथ्वी अवदत्, ' भगवन्, त्वयैवोक्तम् —

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥**
**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**' शान्ति 'संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥**

अयं ते वचसः सत्यतायाः परीक्षासमयः । अन्यथा ते पाप्मानः नास्तिकाः साम्यवादिनः नास्त्येव त्वम् इति कण्ठरवं कुर्युः । तर्हि अवतरतु भवान् रक्षणाय अस्माकम् । '

" पृथिव्याः आक्रोशेन किञ्चित् प्रबुद्धः अर्धोन्मीलितनेत्रः ईश्वरः, प्रजाभ्यः इव मन्त्री, सन्देशं प्रायच्छत् – ' वत्से, किमेवं भीताऽसि ? मा भैषीः । न मे 'सुदर्शनम्' अधुना पर्याप्तं चीनदेशनिषूदनार्थम् । तस्मात् त्वमेव प्रयतस्व । यज्ञं कुरु । यागीयायाः देवतायाः प्रसादादेव संकटमुक्ता भविष्यसि । ' इति महता कष्टेन उक्त्वा पुनः सुषुप्तिं प्राविशत् भगवान् । "

" हम् ! जानाम्यधुना यज्ञोऽयमिति । " सः श्रोता अवदत् । " परम् ... यज्ञीया सामग्री नात्र दृश्यते । किं नामधेयमस्य यज्ञस्य ? कः मन्त्रः प्रयुज्यते अत्र ? के होतारः ? के च अध्वर्यवः ? के उद्गातारः ? के ब्रह्माणः ? कुत्र वा यजमानः, यजमानपत्नी च ? अत्र तु सर्वे मिलित्वैव उद्घोषं कुर्वन्ति, ' सेना च मे शक्तिश्च मे अण्वस्त्राणि च मे ' इति । "

" नूतनोऽयं यज्ञप्रकारः । अत्र स्वातन्त्र्यदेवता एव सर्वाणि यज्ञीयकर्माणि परिवीक्षते ब्रह्मा इव वाजपेयादिषु । ' प्रयत्नः ' इति यज्ञीया सामग्री । सामूहिकी यज्ञपद्धतिः इयम् । अत्र बहवः यज्ञाः कृताः, परं ते नासन् फलदायिनः । विष्णुना तु न कथितम् – यज्ञे किं भावयेत् ? केन भावयेत् ? कथं भावयेत् ? इति । तस्मात् निराशान्विताः सर्वे अचिन्तयन्, ' किमधुना करणीयम् ' इति । अत्रान्तरे केनापि सिद्धेन ऋषिणा आगत्य कथितोऽयं मन्त्रः, **' सेना च मे शक्तिश्च मे अण्वस्त्राणि च मे '** इति, सामूहिकी च यज्ञपद्धतिः । तामेव अनुसृत्य आरब्धोऽयं यज्ञः । "

" अत्र तावत् एवम् । किंतु —

**' अविदित्व ऋषिं छन्दो दैवतं योगमेव च ।**
**योऽध्यापयेत् जपेद्वापि पापीयान् जायते तु सः ॥ '**

इति हि स्मर्यते । तस्मात् प्रष्टुमिच्छामि, कोऽत्र मन्त्रद्रष्टा ? किं छन्दः ? का च देवता ? कुत्र वा विनियोगोऽस्य कर्तव्यः ? "

" तव प्रश्नेन सन्तुष्टाऽस्मि । अस्य मन्त्रस्य द्रष्टा ' होमीयः भाभाभः ' ( होमी भाभा ) अस्ति । तस्य महतः तपसः भीतेन इन्द्रेण प्रेषिता अप्सराः एका । तदा तेन ऋषिणा शापिता सा सुन्दरी, ' शिलामयी भूत्वा ' अप्सराः ' इति नाम्ना अत्रैव तिष्ठ ' इति । तदा तेन ऋषिणा शापिता सा अप्सराः क्षमायाचनाम् अकरोत्, ' ऋषे, परवान् अयं जनः । अनिच्छन्त्यपि स्वामिनः आज्ञया तपोभङ्गमकरवम् । तस्मात् शापमुक्तिं ब्रूहि । ' इति । तदा परमकारुणिकः सः ऋषिः अवदत्, ' वत्से, शापोऽयं नान्यथा भवितुमर्हति । कतिपयैः वर्षैः अत्र महायज्ञः भवेत्, तदा ' स्व 'रूपं धृत्वा यज्ञफलं देहि जनेभ्यः । तावत्कालपर्यन्तं हृदये संतप्यमाना शिलामयी भूत्वा अत्रैव तिष्ठ । ' इत्युक्त्वा अगच्छत् स ऋषिः तपश्चरणाय ।

" स तपोऽतप्यत । गते संवत्सरे आर्षं ज्योतिः तस्य पुरतः प्रादुरभूत् । तेन च दृष्टोऽयं मन्त्रः । जगदुद्धारार्थं दत्तः तेन अस्मभ्यं मन्त्रः अयम् ।

" अधुना छन्दः । ' जगत्प्रसरः ' छन्दः । अस्मिन् जगतीतले निमेषार्धे एव अस्य मन्त्रस्य पठनम् अभवत् । तस्मात् मन्त्रस्य शीघ्रप्रसरत्वात् इदं छन्दः ' जगत्प्रसरः ' ।

" अथ देवता । देवता ' रणरुद्रः ' । अस्य मन्त्रस्य प्रभावस्तु महान् एव । एकत्वेन उच्चारिते हि मन्त्रे, आवाहनकाले एव रणरुद्रस्य गणाः अदृश्यरूपेण सञ्चरन्ति इतस्ततः । आगतेषु तेषु प्रतिवेशिराष्ट्राणि अनाक्रमणसमयभङ्गं कुर्वन्ति । शान्तिदूतानाम् अस्माकं निषेधाः न तत्र फलन्ति । विनियोगः च अस्य ' युद्धेष्ट्यां ' भवति । "

" सत्यमिदम् । परम् अस्याः उक्तेः अर्थज्ञानं कथं भवति ? "

" किमत्र कठिनम् ? यदेव लोके तदेव शास्त्रे । ' लोके येषु अर्थेषु प्रसिद्धानि पदानि तानि सति संभवे तदर्थान्येव ग्राह्याणि । '

“तत्रादौ **सेना** । सेना इति संज्ञा अनेकविधैः अर्थैः प्रयुज्यते । सेनायाः त्रयः प्रकाराः वर्तन्ते । सर्वप्रसिद्धा सेना इति प्रथमः अर्थः । तत्र त्रीणि अङ्गानि वर्तन्ते सेनायाः — भूदलं नौदलम् आकाशयानदलं च । अधुना तु चतुर्थमपि दलमपेक्ष्यते, अग्निबाणदलमिति यदत्र अभिप्रेतम् । अपरः सेनायाः प्रकारः ‘ अपशब्दसेना ’ इति । ‘ वार्ताहरसेना ’ इति सेनायाः तृतीयः प्रकारः ।

“ अधुना **शक्तिः** । पुरातनं शक्तित्रयं जानासि एव, प्रभुशक्तिः मन्त्रशक्तिः उत्साहशक्तिः इति । परम् अयमर्थः नात्र लक्षितः । आधुनिकं शक्तित्रयम् एवं भवति — एकात्मता शक्तिः, अपशब्दजननी मुख्या ( = मुखे भवा ) शक्तिः, वृत्तपत्रशक्तिश्च ।

“ अथ **अण्वस्त्राणि** । प्राचीनानि अण्वस्त्राणि ब्रह्मास्त्रं नारायणास्त्रम् इत्यादीनि । आधुनिकानि अण्वस्त्राणि प्रख्यातानि एव । वृत्तपत्रविषये ‘ वार्ता ’ इति महदण्वस्त्रम् । तृतीयम् अण्वस्त्रं वाग्वज्रमिति विविच्यते पण्डितैः । ”

“ पृच्छामि किञ्चिद्, ” अब्रवीत् श्रोता । “ एते पाठकाः वदन्ति – सेना च मे शक्तिश्च मे अण्वस्त्राणि च मे इति । अस्य मन्त्रस्य फलं सेना वा शक्तिः वा अण्वस्त्राणि वा इति भिन्नम् ? अथवा सेना, शक्तिः, अण्वस्त्राणि च इति एकं फलम् ? ”

“ नहि नहि । एते त्रयः मन्त्रघटकाः परस्परावलम्बिनः । एते त्रयः समुदिताः, न तु व्यस्ताः । कथम् ? यदा परराष्ट्राणामाक्रमणं भवति, तदा **सेना** चतुरङ्गधारिणी **एकात्मताशक्तेः** साहाय्येन **अण्वस्त्र**योजने प्रयोजिता भवति ।

“ द्वितीया वृत्तपत्र**शक्तिः** वार्ताहर**सेना**साहाय्येन वार्ताहरपरिषत्समये गुप्तवार्तायाः **स्फोटेन** मन्त्रिषु उपयोक्तव्या ।

“तृतीयस्याः अपशब्द**सेना**याः अपशब्दजनन्या मुख्य**शक्त्या** सह गृहसमराङ्गणे **वागण्वस्त्रस्य** उपयोगेन प्रतिवेशिषु उपयोगः कर्तव्यः ।

“ तदेवम् इयं प्रार्थना रणरुद्रस्य; न भारतीयशासककृता अण्वस्त्रनिर्मितिविषये । ”

“ तथापि मन्ये संहारकारी मन्त्रः अयं नादर्तव्यः । अपि च किंफलकः अयं प्रयासः ? शृणोतु च भगवती —

**शक्तिर्मे सेना मे ह्यण्वस्त्राणि च भवन्तु मे नित्यम् ।**
**इति मे मे कुर्वाणं कालवृको हन्ति पुरुषाजम् ॥**

तस्मात् यथा श्येनयागः त्याज्यः, तथैव युद्धयागोऽपि त्याज्यः । ”

“ न इदं युक्तम् । आधुनिक्याः श्रुतेः खलु आज्ञा इयम् । अनेन यागेन ‘ अपूर्व ’फलप्राप्तिः । तच्च जगतः ‘ मोक्षाय ’ प्रभवति । ”

इत्येवं प्रचलति प्रेक्षकयोः संवादे कश्चित् महत्तरः जयशब्दकल्लोलः समभवत् । यज्ञसमाप्तिश्च अभवत् । तस्मिन् एव समये यज्ञस्थानात् सुन्दरी काचिदप्सराः आविर्भूता । सा अवदत्, “ शापमुक्ता अहं प्रदास्यामि वः वरम् । सेना च ते शक्तिश्च ते अण्वस्त्राणि च ते भवन्त्विति । ”

तस्याः वरप्रदानात् तस्मात् अप्सरसः (अणुभट्ट्याः) स्थानात् जातानि अण्वस्त्राणि । अपश्यन् जनाः सुसज्जां सेनाम्, एकात्मतायाः शक्तिम्, अप्सरसः जातानि अण्वस्त्राणि च । पूरितमनोरथाः सर्वे शत्रून् अण्वस्त्रसाहाय्येन अजयन्, महान्तं च जयशब्दम् अकुर्वन् । तैः सह अहमपि जयघोषमकरवम्, ‘ राष्ट्रं च मे विजयश्च मे समृद्धिश्च मे ’ इति ।

अत्रान्तरे — “ उत्तिष्ठोत्तिष्ठ । किमेवं भणसि ? ” अकस्मात् मम कनीयान् भ्राता माम् अवदत् । “ स्वप्नः किमयम् ? शृणु विजयवार्ताम् । अस्माकं सैनिकैः कश्मीरेषु महान् विजयः सम्पादितः । ”

सस्मितवदनया गृहीतं मया वृत्तपत्रम् ।

## २

△ **सुलभा पटवर्धन** तृतीय वर्ष साहित्य

दीपावलिः आगता । मया गृहद्वारे दीपानामावलिः रचिता । परं .... किमिदमाश्चर्यम् ? न जाने, पूर्वजन्मनि कतमं पुण्यं कर्म कृतं मया । दीपानां प्रकाशकिरणान् हस्ते गृहीत्वा परमेश्वरः मम पुरतः आगत्य अवदत्, ‘ प्रसन्नोऽस्मि । वत्से वरं ब्रूहि । ’ इति । अहं विचारजाले सम्भ्रान्ता ।

ऋग्वेदे ऋषिः इन्द्रं प्रार्थयते – 'गोधनं च मे धनं च मे ' इति । ब्राह्मणः याचते – 'भोजनं च मे दक्षिणा च मे ' इति । मोरारजीकृतेन नियमेन पीडितः वदति – 'व्हिस्की च मे ब्रॅण्डी च मे शुद्धं सुवर्णं च मे ' इति । माता इच्छति – ' सदैव हसन्तः आज्ञाधारकाः पुत्राः च मे ' इति । आधुनिकी भार्या चिन्तयति — ' प्रथमे एव आवाहने स्नानाय उत्थितः पतिः च मे ' इति । तरुणी इच्छति – ' वैजयन्तीमालायाः इव शाटिका च मे नैलानवस्त्राणि च मे ' इति ।

...परं किमहं ब्रवीमि ? .... आम् ! एका रमणीया (= रमण्याः इयम्) कल्पना स्फुरिता । तत्क्षणे एव उत्साहपूर्णेन स्वरेण मया उक्तम् – ' हे परमेश्वर ! सेना च मे शक्तिश्च मे अण्वस्त्राणि च मे ' इति । परमेश्वरः अस्मयत । किं कारणं भवेत् ? किमपि वा भवतु ! तेन मह्यम् एका यष्टिः दत्ता । आदिष्टं च, ' अनया त्वं सेनायाः अण्वस्त्राणां च उत्पादनं कर्तुं समर्था भविष्यसि ' इति । अहं यष्टिं निरीक्षितुमारब्धवती, यावत् परमेश्वरः दीपप्रकाशे लुप्तः ।

अधुना अहं सर्वसामर्थ्यशालिनी । किं तावत् करिष्यामि ? सेनाबलेन चीनसैनिकानां प्राणानामपहरणं करिष्यामि ? तेन अहं मम पूज्यस्थानं, महाकविकालिदासस्य च स्फूर्तिस्थानं नगाधिराजं मोचयिष्यामि । शिवहाससहोदरः शुभ्रः हिमालयः अधुना पीतवर्णैः सैनिकैः व्याप्तः । तेषां साम्यतत्त्वस्य प्रतिनिधिभूतेन वर्णेन हिमालयः रञ्जितः ।

परमेश्वरेण अल्लादीनदीपः एव मे प्रदत्तः । मनोमन्दिरे उद्भूतामिच्छां मन्त्रशक्त्या सफलां करोमि । ' अबला ' इति उपहासेन सम्बोधयन्ति स्त्रीजातिम् । अहं तु मम सामर्थ्येन पुरुषाणां बलम् अतिक्रमिष्यामि । ' वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ' हि स्त्रीणां चेतांसि । पुरुषः तु अहमेव शक्तिमान् इति वृथागर्वं वहति । अहो पुरुषजातेः अन्यायित्वम् ! सामर्थ्येन गर्वितः मम अग्रजः बन्धुः मय्येव तत् सफलोपयोगं मन्यते । अधुना अहमेव शक्तियुता । स्त्रीणामेव सेनां निर्माय शत्रोः प्राणानां, वित्तस्य, प्रदेशस्य च अपहरणं करिष्यामि । अहल्याबाई-होळकर-महोदयां दृष्ट्वा यथा रघुनाथः पलायितः, तथैव मम स्त्रीसेनां दृष्ट्वा शत्रुः भारतप्रदेशात् विनिर्गच्छेत् । मम स्त्रीसैनिकानां कण्ठात् निःसृतानि मधुरगीतानि श्रुत्वा शत्रुसैनिकाः मन्त्रमुग्धाः भविष्यन्ति, शस्त्राणि च त्यक्ष्यन्ति ।

... परं चीनानां शक्तिः निरवधिका । मम तु सेनासामर्थ्यं शक्तिसामर्थ्यं च सावधिकम् । तस्मात् अण्वस्त्राणामेव उपयोजनमावश्यकं चीनपाकिस्तानीयानां विषये । केचन पुरुषाः अण्वस्त्राणामुपयोजनमनर्थकारकं भवेत् इति वदन्ति । परमहो ! भारतेन प्रथमं सामोपचारस्यैवावलम्बनं कृतम् इति जानन्ति सर्वे । चीनपाकिस्तानीयानाम् आक्रमणानां निषेधः, तीव्रनिषेधः च कृतः भारतीयैः । अधुना दण्डोपायः एव सर्वश्रेष्ठः उपायः । अहो युष्माकं सामर्थ्यम् । युद्धमिति शब्दः अपि भयमुत्पादयति युष्माकं मनसि ! इत्थं प्रतीकाराभावे चीनपाकिस्तानीयानामाक्रमेण, तेषां साम्यवादेन, दाण्डिक्यवादेन, तेषामन्याय्यवर्तनेन च भारतीयानां का अवस्था भवेत् इति विचारः कर्तव्यः । द्विधा खलु साम्यं संभवति – यदि सर्वेऽपि सुखिनः, यदि च सर्वेऽपि दुःखिनः । अनयोः पर्याययोः साम्यवादस्य द्वितीयः एव अर्थः अवलम्बितः चीनदेशीयैः । यत्र दारिद्र्यस्यैव निवासः, अन्यायस्यैव राज्यं, तत्र सर्वे साम्यावस्थाः एव अर्थात् दुःखिताः । किम् ईदृशं साम्यं भारते प्रतितिष्ठतु ?

' चीनैः मानवतादितत्त्वानि अपसार्य आक्रमणं कृतं, तस्मात् भारतमपि अण्वस्त्रं निर्माय युद्धाय प्रवृत्तं भवेत्, इति अन्धानुकरणमेतत् ' – इति चेत् न । जगन्नाशाय उद्युक्ते पुरुषे राष्ट्रे वा कथमाचरेत् इति उपदिष्टमेव स्वयं भगवता गीतासु । महाभारतेऽपि एतदेव निर्घोषितम् । ' स्त्रीवधे नास्ति पातकम् ' इत्येव उपदिष्टं विश्वामित्रेण ताडकावधप्रसङ्गे । आदर्शनियमाः व्यवहारे समर्यादम् एव ग्राह्याः । शान्तिप्रापणाय एव भारतेन युद्धमुद्घोषयितव्यम् । क्यूबाप्रदेशे अमेरिकाराष्ट्रेण सैन्यबलेनैव विजयश्रीः प्राप्ता । तृतीयमहायुद्धस्य भयेन भारतवर्षीयाः पराभवशल्यं सोढुं कदापि न शक्नुवन्ति । ' शठे शाठ्यमेव समाचरेत् । '

यदि कश्चिद् ब्रूयात् – ' शास्त्रज्ञानां शोधाः सुखार्थं विद्यन्ते । हिरोशिमा, नागासकी इति द्वे नगरे अण्वस्त्रस्फोटेन भस्मीकृते । अण्वस्त्राणां दुरुपयोगः कृतः अत्र । इत्थम् अणुशक्तेः उपयोगं जगद्विनाशाय न कुर्यात् ' इति । तं प्रति ब्रूयात् – अण्वस्त्राणामुपयोगं जगद्रक्षणाय एव कर्तुमुद्युक्ता अहम् । चीनपाकिस्तानीयाः जगद्विनाशाय उद्युक्ताः । तेषां विनाशेन जगत्संहारस्य भयं नष्टं भवेत् । अमेरिकाराष्ट्रेणापि एतेनैव विचारेण

हिरोशिमा, नागासकी च उद्ध्वंसिते । तदा जपानं युद्धं कर्तुम् असमर्थम् अभवत्। यस्मात् चीनैः भारतीयानां पवित्रां भूमिमाक्रम्य तेषां धर्मभावनानां भस्मीकरणं कृतं, तस्मात् चीनराष्ट्रस्य भस्मीकरणे नास्ति दोषः। पाकिस्तानीयाः च भारतीयानां कनीयांसः भ्रातरः। 'कनीयसः भ्रातुः स्खलने ज्येष्ठः भ्राता तस्य कर्णम् उत्पाटयेत्' इति कौटिल्यः।

अत्र अपरे प्रत्यवतिष्ठन्ते – भारतं हि नाम दारिद्र्यान्धकारेण लिप्तः देशः। शरीरच्छादनपर्याप्तमपि वस्त्रं जठरपिठरीपूरणपर्याप्तं च अन्नं सुखेन लब्धुं न शक्नुवन्ति भारतीयाः; का कथा नूतनसुन्दरवस्त्राणां रुचिरान्नानां वा! अण्वस्त्रनिर्माणेन अन्नवस्त्रप्रश्नः अधिकमेव पीडयेत्। तस्मात् भारतेन प्रथमम् अर्थोत्पादनाय यत्नः कर्तव्यः इति। अत्रोच्यते – एतेषां महाभागानां मतिः अर्थोत्पादनयत्ने एव निमग्ना सती द्वारप्रदेशे उपस्थितं शत्रुमपि उपेक्षते। अर्थोत्पादने निमग्नानां भारतीयानाम् एकेनैव अण्वस्त्रस्फोटेन भस्मीकरणं कुर्वीरन् चीनदेशीयाः! कः शिष्येत अर्थोत्पादनं कर्तुम्?


जातः निश्चयः। अहम् अण्वस्त्रं निर्मातुम् उद्युक्ता। अण्वस्त्रेण प्रथमं चीनप्रदेशं उद्ध्वंसितुम् उद्युक्ता अहम्। हुं फट्! अत्र मम पुरतः वर्तते अण्वस्त्रम्।

धुडुम्!!!

.... हा!... अण्वस्त्रेण सर्वं जगत् उद्ध्वस्तं केवलं चीनप्रदेशः वा?... परम्... अहम् अत्र कथं सम्प्राप्ता? हिमालयस्य उत्तुङ्गे शिखरे विचरन्त्याः का मम एषा अवस्था?

... हन्त जानामि! दीपावल्यां बालकैः क्रीडास्फोटकानां स्फोटः कृतः। तेनैव सम्भ्रान्तावस्थाम् उज्झित्वा वर्तमानं पुनः प्रविष्टा अहम्!

हा हन्त! नाहं तर्हि अण्वस्त्रशक्तिमती!! किम् एषः एव परमेश्वरस्य स्मितस्य अर्थः?



△ **विजया दिवेकर** तृतीय वर्ष साहित्य

# ▽ विद्या विनये न शोभते– एकं संशोधनम्

**अहम्**—रे, रे, वाचक! शिक्षकायसे किम्? स्फूर्तिमात्रद्वितीयायाः मम एतत् लिखन्त्याः 'विद्या विनये न शोभते' इति शीर्षकवाचनानन्तरमेव उपहससि किम्? – यथा परीक्षकाः अस्माकं स्वाध्यायपठनानन्तरम्।

**वाचकः**—अयि मूढे, आत्मश्लाघिनि, पण्डितमानिनि लेखिके, न एतत् वचनम् इत्थं वर्तते। जानामि, अप्रकाशितं भ्रातुः लेखं तदागमनभीत्या अन्धकारे एव लिखसि। तेन अज्ञानात् च स्खलनम् एतत् कृतं त्वया। चौर्यमपि सावधानतया कर्तव्यम्। 'विजयते चौरोपमः सत्कविः!' पूर्वसूरिभिः न इत्थं कथितम्। पूर्वसूरिभिः कथितम्, 'विद्या विनयेन शोभते।' कथमिति चेत् — त्वमेव अत्र प्रथमं निदर्शनम्। 'स्फूर्तिमात्रद्वितीया, परिणतप्रज्ञा' इति आत्मश्लाघिनी त्वं हास्यविषयं गतासि अस्माकम्। यदि तस्मिन् वचसि स्वल्पोऽपि अर्थः, तर्हि स्वस्तुतिवचनात् अनादरणीयतां गतासि।

**अहम्**—हे दुराराध्य वाचक, 'यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः'. इति यदुक्तं तत्सत्यमेव। नाहं भ्रातृलेखम् अनुलिखामि। स्खलनमपि न कृतं मया। सत्यमेव कथयामि, 'विद्या विनये न शोभते' इति। अस्य वचसः यथार्थभूते अर्थे धूर्तैः अतिसंहिताः वयम्।

**वाचकः**—कथमिदं नाम?


**अहम्**—अथ किम्? प्रथममेव रहस्यमेतत् कथयामि यत् एतस्य सुभाषितस्य कर्त्रा मनसि न कृतः रूढः अर्थः अस्य वचनस्य। कुतः? यस्मात् पण्डितः सन्नपि (यदि अपण्डितः, कथम् एवं वक्तुं प्रभवेत्?) स्वमुखेन

सः वदति ' विद्या विनयेन शोभते ' इति । अत्र एव सः स्वपाण्डित्यं प्रच्छन्नतया कथयति । ' मम पाण्डित्यं विनयकारणात् न जनाः जानन्ति ' इति विलोक्य एव उच्चारितम् एतत् वचनं विनयभङ्गं कुर्वता एव तेन । अतः अलीकमेतत् – ' विद्या विनयेन शोभते ' इति ।

**वाचकः**—अपूर्वं किलैतत् भवत्याः संशोधनम् !

**अहम्**—अयि मुग्ध ! शृणु ! नैतत् मम संशोधनम्। मम सख्याः किल एतत् । पण्डिता हि सा वर्तते । किन्तु विनयभारनता ' कथं स्वसंशोधनं स्वयमेव प्रकटनीयम ' इति विचार्य न प्रकटयति । अत एव न जानन्ति जनाः एतत् वचनं तस्याः इति । यतश्च मया ज्ञातम् एतत् ( वेद्मि अहम्, अत एव सा मम विद्या ! ), निवेदयामि सर्वेभ्यः । ( अध्यापकेभ्यः अपि कथयामि । अत एव ते मम पाण्डित्यं ज्ञास्यन्ति ! ) एतावता किं फलितम् ? —

**रे रे वाचक सावधानमनसा मित्र क्षणं श्रूयताम् —**
**विद्वांसो बहवो वसन्ति भुवने सर्वेऽपि नैतादृशाः ।**
**सत्यं ज्ञानविभूषिताः कतिपये, गर्जन्ति केचिद् वृथा,**
**यं यं पश्यसि तस्य तस्य पुरतो मा ब्रूहि तीक्ष्णं वचः ॥**



△ **भानुमती सातपुते** प्रथम वर्ष साहित्य

# ▽ अर्थो हि काव्यं विभवः स्व एव

कदाचित् अहं सुदैववशात् काव्यं प्रणेतुं प्रेरिताभवम् । नैकवारं मया आधुनिकानां कवीनाम् आधुनिकानि काव्यानि पठितापि आसन् । मया दृष्टम् – ' अनिर्बन्धाः तेषां विषयाः । न च तानि च्छन्दोबद्धानि । अपि च केषु अपि मासिकेषु तेषां प्रसिद्धिः सुलभा । तदा आधुनिकी काव्यकृतिः सुलभा इति विचिन्त्य मयापि निश्चितम् – अहमपि आधुनिकी कवयित्री भविष्यामि । '

तस्मिन् दिने काव्यशक्तिः मयि संचरिता । किन्तु कठिना समस्या आसीत् मम पुरतः – ' को विषयः *भवेन्मम काव्यस्य ? किं १८५७-मध्येभवाः क्रान्ति*-कारिणः ? अशक्यम् । सम्प्रति जनाः शान्तिपाठान् पठन्ति । अवमंस्यन्ते ते इमं संदेशम् । ततः किम्? पानशेतप्लवः विषयः भवेत् ? किन्तु अस्य अप्रियस्य विषयस्य स्मरणमात्रेणापि दुःखजर्जराणि भवेयुः तेषां मनांसि । न योग्यः अयमपि विषयः । ' एवं बहवः विषयाः समुत्पन्नाः मम मनसि । किन्तु मया ते अनादृताः। श्रान्तं भ्रान्तं च मम मस्तकं तद्विचारेण । अपि च आसीत् सः शनिवासरः । ' अकर्तुः शनिवासरः ' इति महाराष्ट्रभाषायाम् आभाणकः वर्तते । अतः न इदं दिनमपि युक्तं प्रारम्भाय । अस्मिन् दिने सृष्टं काव्यं सम्पादकाः न स्वीकुर्वन्ति । अनेन विचारेण अन्तर्हिता मम काव्यशक्तिः ।

अथान्यस्मिन् दिने सा पुनरपि संचरिता । काव्यस्य विषयोऽपि मया प्राप्तः । कस्मिंश्चित् मासिके चलच्चित्र-पटविश्वे विख्यातायाः तारकायाः विषये प्रणीतं काव्यं मया पठितम् आसीत् । तद् बहुजनप्रियमपि अभवत् । तस्य स्तुत्यभिप्रायैः एव तत् मासिकं सम्पन्नमासीत् । तदा मम मनसि विचार उत्थितः -- यदि तस्याः विषये प्रणीतं काव्यं *प्रसिद्धिं गच्छति, तर्हि तस्याः अनुकरणशीलानां विषये* कृतं काव्यम् अवश्यं सर्वप्रियं भवेत् । नात्र काठिन्यम् । दृश्यन्ते च काश्चित् तत्सदृश्यः ममापि महाविद्यालये ।

एवं विचार्य मया चलच्चित्रपटस्य तारकायाः अनु-कारिणीं कांचित् महाविद्यालयकामिनीम् अधिकृत्य कृता कविता । प्रेषिता सा महता उत्साहेन कस्यचित् मासिकस्य कार्यालयाय । किन्तु मान्यवरेण सम्पादकेन सा मह्यं झटिति प्रतिप्रेषिता ।

अनन्तरं मया अपरस्मै कार्यालयाय सा एव कविता प्रेषिता । अथ गतेषु केषुचित् दिनेषु तेनापि सम्पादक-

महोदयेन मह्यं सा प्रतिप्रेषिता । लिखितं च — " भोः, क्षमस्व ! असमर्थाः वयं भवत्याः काव्यं स्वीकर्तुम् । भवत्या केवलं तस्याः कामिन्याः पादयोरेव वर्णनं कृतम् । न च तस्याः मुखकमलस्य सौन्दर्यान्तरस्य वा । जनेभ्यः न रोचिष्यते इदं काव्यम् । तत् भवती यदि तस्याः मुख-सौन्दर्यस्य वर्णनं कुर्यात्, तर्हि तत् वयं स्वीकरिष्यामः ।"

मया तत् पठितम् । किन्तु मम प्रतिभा अतीव दुर्बला वर्तते । असमर्था अहमभवम् । मया तस्मै उत्तरं प्रेषितम् —

" भोः भोः ! सम्पादकमहोदय !

**नाहं जानामि केयूरे, नाहं जानामि कुण्डले ।**
**चरणौ त्वेव जानामि नूतनोपानहौ सदा ॥"**

अनन्तरं मया अपरस्मै कार्यालयाय प्रेषितं तत् काव्यम् । प्रतीक्षितं च बहूनि दिनानि प्रत्यागमनम् । किन्तु तेन भद्रसम्पादकेन न चापि मह्यम् उत्तरं प्रेषितम्, न च स्वमासिके तस्मै स्थानं दत्तम् । अथ गतेषु केषुचित् मासेषु मयैव तस्मै सम्पादकाय पत्रं प्रेषितम् — " भोः सम्पादक ! न भवता मम कविता प्रसिद्धिं नीता, न चापि मह्यं प्रेषिता । भवतु ! न नूनं तव अविदितं यत् विधाता हंसस्य अम्भोजिनीवनविलासनिवासं हरेत्, किन्तु असमर्थः सः तस्य दुग्धजलभेदविधौ प्रसिद्धां कीर्तिमपहर्तुम् । एवं यद्यपि त्वया मम सा कविता हृता, तथापि मम समीपे तस्याः या प्रतिकृतिः वर्तते तां हर्तुं त्वं न शक्नोषि ।"

अथ व्यतीतेषु केषुचित् मासेषु मया प्रेषिता सा कविता महाविद्यालयनियतकालिके प्रसिद्ध्यै । किन्तु मान्य-वरसम्पादकेन मह्यं कथितम् — " भवति ! उत्कृष्टा सा कविता भवत्याः । किन्तु असमर्थाः वयं स्थानाभावात्, कालाभावात्, पात्रत्वाभावात् च तस्याः प्रसिद्ध्यै ।" तेन ' पात्रत्वाभावात् ' इति अयमेव शब्दः महता स्वनेन उच्चारितः ।

तत् श्रुत्वा अवाङ्मुखी भूता अहम् । मनसि क्रोधः जागृतः, स्वाभिमानोऽपि । मयापि मनसि निश्चितम् — अतः परं सा कविता ममैव समीपे तिष्ठतु । कुतः —

**ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां**
**जानन्तु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ।**
**उत्पत्स्यतेऽस्ति मम कापि समानधर्मा**
**कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥**

# शल्यानि

**महाकविर्दशा हीनः**
**गुणहीनः सुदर्शनः ।**
**विद्यावान् धनहीनश्च --**
**शल्यानि हृदये मम ॥**

कल्पना : **अशराफ शेख**
प्रथम वर्ष साहित्य

▲ जयश्री गुणे द्वितीय वर्ष साहित्य

# ▼ तक्रं फूत्कृत्य मानवः पिबति

किं करिष्यति मानवः यदि तक्रं न फूत्कृत्य पिबति, पीडितोऽपि जिह्वायां तप्तदुग्धेन ? सर्वथा स्वाभाविकमेव एतत् मनुष्यस्वभावस्य ! न केवलं मानुषमनसः, अपि तु यः कोऽपि प्राणी यदि अविचार्य एव किमपि कर्म करोति, अयशोभागी च भवति, तर्हि पुनः तत्कर्मकरण-समये आत्यन्तिकया सावधानतया एव करोति, "तक्रं फूत्कृत्यैव पिबति" इत्यर्थः। अत एव – तप्तदुग्धेन पीडित-जिह्वः मानवः तक्रमपि फूत्कृत्य पिबतीति आभाणकः प्रसिद्धः।

सार्वकालीनः सार्वजनीनश्च अयम् अनुभवः। मम अनुजस्यैव उदाहरणं गृह्यताम्। एकदा असावधानम् एव स्थितं कश्चित् सारमेयहतकः तमदशत्। 'सर्वथा अनपराद्धोऽस्मि, तथापि शुनानेन दष्टः' इति मत्वा तद्दिनादारभ्य शुनः बिभेति। तस्य निकटे कोऽपि सारमेयः आगच्छतु, भीतभीतः सः 'यः पलायते स जीवति' इति मत्वा जङ्घाबलाश्रयमेव करोति। बहुवारं च 'अयं स्वभावेन अनतितीक्ष्णः, पतितदंष्ट्रः, सुप्तो वा श्वा अस्ति, न पुनः किमपि ते कुर्यात्' इति अन्यैः पुनः पुनः आश्वास्यमानोऽपि न भयत्यागं करोति।

मानवस्यैतदुदाहरणम्। प्राणिष्वपि वृत्तिः एतादृशी दृश्यते। व्याधेन केनापि पीडितः पशुः मानवं पीडाकारिणं मत्वा सामान्यम् उपद्रवरहितमपि पान्थं पीडयति।

किं वा एतस्मिन्नयुक्तं तक्रस्यापि फूत्कृत्य पाने ? कदाचित् हास्यास्पदं भवेदेतत्। तथापि यदि नाय-मुत्तमोपायः, तर्हि नापायकरः अपि इति स्मरणीयं सर्वैः।

# पाकक्रिया

## पाका वयम्!

कश्मीरा यदि सन्तु वादविषयो मा सन्तु वान्योऽस्तु वा;
मित्राण्यस्त्रसहायतां ददतु नः श्वेतानि पीतानि वा।
युद्धं वा यदि वास्तु युद्धविरतिः, यूनोऽस्तु फूनोऽस्तु वा;–
न स्वप्नेष्वपि भारतेन कलहं मुञ्चेम, पाका वयम्! ॥

## गालिकोविदः

'भू-भू-भूत' इति स्वयं सुविदितः; स्वप्नेऽपि 'भूः, भूः' इति
कश्मीरान् अभिको भषन् विवृणुते दंष्ट्राश्च दंशाय यः।
सोऽस्मानाह 'शुनः' पुरः परिषदः! – रे ब्रूहि! किं तु स्मर
गालिर्गालिद! ते शिरः शततमी भङ्क्ता; वयं गोलिदाः!॥

# ENGLISH

Miss Vidyagauri Malegaonkar, Third Year B. A.

## " Catherine Heathcliff "

To try to describe Catherine Heathcliff is a thing beyond one's power. And when one dares to do that attempt of describing a character so passionate in temperament, burning with such an unhuman vivacity, the thing that comes out, is merely a faint echo of the force and tumult of the original. I think it is but natural; because the heroine of " Wuthering Heights " possesses a soul of the rushing north wind, and the whirling stormy weather, within which the " Wuthering Heights " is situated. Her soul is vigorous, almost fierce in its passions, with that pagan adoration for life.

The story takes place on the background of " Wuthering Heights "—a storm-tossed station on the top of a hill. It is a background matching the tones and moods of the hero and heroine. It has a share in making up their characters in that peculiar way. It is in this " Wuthering "—the atmospheric tumult—that Catherine Earnshaw is born and bred. Her first appearance in the novel is horrifying, wild, melancholy. It is the most unnatural, and unearthly appearance, because she appears in the form of a ghost; and after that she haunts us like a ghost till the end of the story. Her appearance assures us that we have to deal with a character strange and aweful.

A guest has been lodged in her room in " Wuthering Heights ". He is troubled by a sound made by a firbough and wishes to silence it.


" I muttered, knocking my knuckles through the glass, and stretching hand to seize the importunate branch; instead of which my hands closed on the finger of a little ice-cold hand ! The intense horror of night-mare came over me. I tried to draw back my arm; but the hand clung to it, and a most melancholy voice sobbed, " Let me in-let me in ! " " Who are you ? " I asked, struggling meanwhile to disengage myself. " Catherine Linton " it replied shiveringly. I discerned obscurely, a child's face looking through the window. Terror made me cruel, I pulled its wrist on the broken pane and rubbed it to and fro still it wailed, ' Let me in. It is twenty years, I have been a waif for twenty years.' "

The guest disengages himself after some time; but we do not know what is going to happen afterwards. Mr. Heathcliff's tortured anguish when he entreats the fiend to come in still puzzles us. The whole incident is full of horror, pain, anguish and torture; and


# बी. एस्सी. परीक्षा एप्रिल १९६५ : प्रथमश्रेणीचे मानकरी



सौ. प्रज्ञा शहा
( रसायन )




श्री. व्ही. एन्. पेंडसे
( रसायन )



श्री. एस्. व्ही. पराडकर
( रसायन )



सौ. रजनी सोमण ( पंडित )
( रसायन )




श्री. व्ही. ए. अवचट
( रसायन )




कु. पुष्पा मोहोनी
( रसायन )




कु. नीलकांती पेंढरकर
( वनस्पतीशास्त्र )




श्री. आर्. एन्. वर्मा
( रसायन )




श्री. यू. एम्. गोडसे
( पदार्थविज्ञान )



**श्री. एम्. एस्. खटकाळे**
बी. एस्सी. प्रथमश्रेणी
( रसायन )




**श्री. यू. एस्. आगरवाल**
बी. एस्सी. प्रथमश्रेणी
( रसायन )



**श्री. एस्. एन्. पाटील**
बी. एस्सी. प्रथमश्रेणी
( रसायन )




**कु. उषा केसकर**
पदवीपूर्व शास्त्र
महाविद्यालयात सर्वप्रथम



**श्री. एस्. पी. पटवर्धन**
प्रथम वर्ष शास्त्र
महाविद्यालयात सर्वप्रथम




**श्री. एस्. एन्. गोगटे**
बी. एस्सी. प्रथमश्रेणी
( रसायन )



**श्री. टी. एन्. बानखेले**
हुतात्मा वसंत दाते पारितोषिक
उत्कृष्ट मुष्टियोद्धा



**श्री. डब्ल्यू. एस्. कुलकर्णी**
All India Summer Training
Himachal–Pradesh
3 Air Sq. N. C. C.



**श्री. एस्. व्ही. लोंबर**
All India Advance
Leadership Course
Pahalgam 36 Bn. N. C. C.

with a heightened curiosity we read the whole story of Catherine's life.

Like a haughty queen she reigns over all persons who come into contact with her. As a child she was mischievous, wavered almost to the level of obstinacy. Even so, she never meant any harm. She was innocent, fresh and gay; handled only by nature.

But her stay in Thrushcross Grange shows her another way of life–a life more civilized, more cultured but less natural. She returns as a ' bright, graceful damsel.' But the small incident hid behind it a great potentiality of raising a powerful struggle in her mind, and the innate force realizes itself when she had to choose between the two; Heathcliff and Edgar Linton, between Wuthering Heights and Thrushcross Grange. Though she is a proud girl headstrong and haughty, she is shown to be having a wondrous constancy to old attachments. And she cannot decide between her love for Heathcliff and her fondness for Edgar. She accepts Edgar in a mood of sheer whimsicality. One does not know why,inspite of all the reasons she gives for her acceptance. Was she desperate ? Was it that she had no idea of the depth of her love for Heathcliff ? She is perfectly aware of her deep, almost fierce love for Heathcliff. But she seems completely unaware of the implications of a married life. She thinks life would be just the same. Heathcliff would be able to enjoy life with her just as before.

And it is an uncommon, almost unbelievable kind of love that we find in " Wuthering Heights ". There is nothing soft and delicate and dreamy about it. It is fierce, wild and fiery. It has no foolish airs around it. The feelings it expresses are never normal or human; they are fiendish. It never experiences joy or grief but agony and ecstasy. There is nothing mild about it. It is a love which does not give pleasure to the lovers but torments them. There is nothing divine or highly moral about it. Catharine knows Heathcliff to be a fierce, pitiess, wolfish man, and she is never shameful or cowardly to declare it; and yet she loves him.

" My love for Heathcliff resembles the eternal rocks beneath: a source of little visible delight, but necessary. Nelly, I am Heathcliff. He is always, always in my mind: not as a pleasure, any more than I am a pleasure to myself, but as my own being."

And with the same singularly fierce temperament of hers she says, " Well, if I cannot keep Heathcliff for my friend–if Edger will be mean and jealous, I'll try to break their hearts by breaking my own. That will be a prompt way of finishing all, when I am pushed to extremity."

Their love is far from being delicate; and yet it is not rude or rough. It is simply wild. Heathcliff surpasses her in his passionate ferocity. When Catherine is on death-bed, with all the bitterness of heart, she asks Heathcliff : " How strong you are ! How many years do you mean to live after I am gone ? " And in the torment of his soul he answers — " Do I want to live ? What kind of living it would be when you—oh God ! Would you like to live with your soul in the grave ? "

That night Catherine dies. And when her bodily presence passes out of the tale, she is more in it than ever. The book is haunted by her ghost as Heathcliff is haunted. Her disembodied spirit is the most real, the most passionate presence in it beside his vigorous, genuine presence.

The lover's reaction to the news of his beloved's death is the climax of the novel. We are awe-stricken at the reaction. It is the personification of all the wild passions, a humon soul can possess.

" May she wake in the other world in torment ! And I pray one prayer—I repeat it till my tongue stiffens—Catherine Earnshaw may you not rest as long as I am living! You said,I killed you.Haunt me, then. The murdered do haunt their murderers, I believe. I know that ghosts have wandered

सामाजिक शास्त्र विभाग

△ **उषा पांडव** तृतीय वर्ष साहित्य

# ▽ सत्तावनचे स्वातंत्र्य समर

( इतिहास चर्चामंडळात वाचला गेलेला निबंध )

ता.२९मार्च ! १८५७च्या सशस्त्र क्रांतियुद्धाची ठिणगी प्रथम या दिवशी पडली. काडतुसाला गाईची व डुकराची चरबी वापरलेली आहे व तिचा वापर भारतीय शिपाई न करतील तर त्यांना नोकरीवरून कमी करण्यात येईल व युरोपियन फौजांकडून त्यांना धडा दिला जाईल, असे फर्मान निघाले. या वार्तेबरोबरच आपल्या धार्मिक भावनांचा चक्काचूर होत आहे या कल्पनेने भारतीय व मुसल्मान सेनेचा स्वाभिमान नि आत्मविश्वास उफाळून आला. आणि म्हणूनच २९ मार्च रोजी मंगल पांडे या एका शिपायाने आपल्या राष्ट्रबंधूंत स्वाभिमान-संस्कृतीची ज्योत पेटवून, बराकपुरात इंग्रजांना चांगलाच हात दाखवला ! आणि आधीच तापलेल्या वातावरणात ठिणगी पडली.

पण पांडेच्या या धाडसाचे पर्यवसान त्याला फाशी देण्यात झाले ! परंतु पांडेच्या बलिदानाने क्रांतियुद्धाचा स्फुल्लिंग फुलविला. स्वाभिमान व आत्मविश्वास विसरलेल्या जीवनात नवचैतन्य रसरसविण्याचे काम त्याच्या मृत्यूने केले ! सरंजामशाहीच्या काळातील स्वाभिमानजागृतीचा, भारतीय स्वातंत्र्याच्या उषःकालातील पहिला स्फूर्तिकिरण फाकला गेला.

परंतु धार्मिक भावनांची अवहेलना हेच केवळ एक कारण ५७ च्या युद्धाला कारणीभूत नव्हते. ते केवळ निमित्तमात्र होते. १८५७ च्या सुमारास लष्करी सामाजिक, राजकीय इत्यादी अनेक क्षेत्रांत असंतोष धुमसत होता. तो पेटवण्याचे काम फक्त वरील घटनेने केले. त्यावेळी इंग्रजी राज्य आल्यामुळे, राजकीय जमान्यातील झालेल्या बदलाने कोणाचेच समाधान झाले नव्हते. भूतकालात त्यांनी जे हक्क व अधिकार उपभोगिले होते, ते त्यांना परत मिळविण्याची इच्छा होती. सामान्य जनताही असंतुष्ट होती आणि परकीय सत्तेचे जोखड मानेवर ठेवायला कोणी राजी नव्हता. तशातच ब्रिटिशांच्या भारतीय नकाशाला तांबडा रंग फासण्याच्या धोरणानेही हिंदू राजांची व पर्यायाने जनतेची मने खवळली होती. ब्रिटिशांनी धडाधड संस्थाने खालसा करण्याचा सपाटा चालवला होता. त्याला देशाच्या कानाकोपऱ्यातून विरोध होत होता.

अशा तऱ्हेने ईस्टइंडिया कंपनीने भारतात राजकीय सत्तेची पाऊलवाट पाडावयास सुरुवात केल्यापासूनच तिच्याबद्दल येथे असंतोष धुमसत होता. पण एकामागून एक मिळणाऱ्या विजयामुळे त्यांना याची जाणीव तीव्रतेने झाली नाही. परंतु १८५६ च्या जुलैनंतर मात्र वेगळेच वारे वाहू लागले. लॉर्ड कॅनिंग याने असे फर्मान काढले की, "ब्रिटिश सरकार जिथे पाठवील तिथे जाण्याची ज्याची तयारी नसेल, त्याची कोणत्याही कारणासाठी रंगरूट भरती होऊ नये." या फर्मानाबरोबरच सर्वत्र अशी भावना उफाळली की

राणीने कॅनिंगची नेमणूकच मुळी हिंदी सैनिकांना ख्रिस्ती बनवण्यासाठी केली आहे. या कल्पनेला त्यानंतर धर्मप्रसार करण्यासाठी आलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या हालचालीने बळकटी आली. या लोकांनी आपल्या धर्मांतराच्या हालचाली जोरात चालू केल्या, हे सारे प्रकार हिंदी प्रजेच्या छळाची नांदी ठरले.

अशातच पुनर्विवाहाचा कायदा करून सरकारने भारतीयांच्या सामाजिक, मानसिक व धार्मिक भावनांना धक्का दिला. देवा-ब्राह्मणांस साक्ष ठेवून आपणास लाभलेला पती काळाने ओढून नेला तर तो आपल्या पूर्व-जन्मीच्या पापाने नेला, असे समजून हिंदू विधवा आपल्या मृत पतीच्या नावासाठी सन्यस्त वृत्तीने जन्मच्या जन्म कंठीत. अशा तऱ्हेने हिंदुधर्मातील हिंदू स्त्रीची पतिनिष्ठा हा तिच्या धर्मनिष्ठेचा एक अविभाज्य भाग होता. त्यालाच पुनर्विवाहाच्या कायद्याने धक्का दिला. त्यामुळे ख्रिस्ती पाद्रीच काय पण सारी इंग्रजी राजवटच हिंदु-धर्मावर उठली आहे, अशी साऱ्या भारतवासीयांची कल्पना झाली. या सामाजिक विपर्यासास आळा घालण्यास कोणीही पुढे आला नाही. अशातच १८५६ मध्ये भारतात अनेक नद्यांना महापूर आले. कॉलऱ्याच्या साथीने साऱ्या देशभर धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. तेव्हा जणू आता इंग्रजांचे राज्य आचके देऊ लागले आहे, अशी सामान्य जनतेची समजूत झाली.

या वेळी खुद्द दिल्लीसही बादशाही घराण्यात ब्रिटिश राजवटीविरुद्ध धुसफूस सुरू होतीच. ब्रिटिशांचा अंमल हिंदुस्थानावर बसल्यावर दिल्लीच्या बादशहाने त्यांच्या हातांतले बाहुले होऊन राहावे ही गोष्ट त्याच्या राणीला-झिन्नतमहालला-रुचत नव्हती. तिच्या नसानसांतून नादिरशहाचे पराक्रमी रक्त सळसळत होते. तिच्या प्रदीप्त इच्छाशक्तीनेच बाबराच्या वंशातील पराक्रमी राजपुत्रांना दिल्लीची बादशाही प्रभावी ठरविण्याची प्रबळ इच्छा झाली व त्या दृष्टीने त्यांनी हालचालीही चालू केल्या.

अशा तऱ्हेने देशभर क्रांतियुद्धाची पार्श्वभूमी तयार होत असताना पेशवे, सातारकर मंडळी स्वस्थ बसली नव्हती. रावबाजीच्या पेन्शनबद्दल केलेली खटपट वाया गेल्याने नानासाहेब थोडे अस्वस्थ झाले होते. परंतु मुनीमाने आणलेल्या नव्या बातमीने मात्र त्यांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. क्रिमीयन युद्धात इंग्रजांची बाजू पडती आहे हे ऐकल्यावर पेशव्यांनी धीर एकवटला आणि त्यानुसार पावले टाकण्यास सुरुवात केली. अशातच साताऱ्च्या रंगो बापूजींनी तर १८५० पासूनच ब्रिटिशां-विरुद्ध कट उभारण्यास सुरुवात केली.

अशा रीतीने वातावरण तप्त होत, असतानाच फेब्रु-वारीच्या दुसऱ्या पंधरवड्यात लॉर्ड एल्फिन्स्टनच्या हाती ज्यात ब्रिटिशांविरुद्ध राजद्रोहाचा उघड उघड पुरस्कार केला आहे, असा कागद आला. त्यात भारतीय जनतेच्या असंतोषाची इतरही अनेक कारणे उघडपणे नमूद केली होती. जनतेची व गुप्त पुढाऱ्यांची जोरदार तयारी चालू होती. चपात्यांतून गावोगाव निरोप धाडून १२ जून ही उठावाची सार्वत्रिक तारीख ठरली. पण यापूर्वीच रणांगणावरील रायफलींत डुकराची व गाईची चरबी वापरली असून ती काडतुसे वापरण्याची सक्ती होत आहे या बातमीने कोंडलेल्या वाफेला बाहेर पडावयास जागा मिळाली! आणि मंगल पांडेच्या मंगल हस्ते २९ मार्चलाच क्रांतीचा वणवा देशभर भडकला.

परंतु अवघ्या २।४ दिवसांतच क्रांतिदेवतेने या आपल्या सुपुत्राचा घास घेतला. त्यानंतर मीरत येथील शिपायांनी गाईची चरबी लावलेली काडतुसे वापरण्याचे नाकारले. सरकारने त्यांना कैद केले. परंतु १० मे रोजी सर्व शिपायांनी तुरुंगावर एकदम हल्ला केला व कैदी शिपायांची सुटका केली. आता जो कोणी गोरा दिसेल त्याला ठार करून ते दिल्लीच्या रोखाने निघाले. तिथे त्यांनी दारुगोळा मिळविण्यासाठी निकराचा प्रयत्न करून अखेर बराचसा दारुगोळा ताब्यात घेतला व त्याच्याच जोरावर दिल्ली काबीज केली. क्रांतिकारकांचा हा पहि-लाच विजय होता! दिल्ली ही हिंदुस्थानीय इतिहासाची मध्यवर्ती कळ असल्याने या विजयाने ब्रिटिशांच्या इभ्रतीस बराच मोठा धक्का बसल्यास नवल ते काय!

त्यानंतर लवकरच या वणव्याच्या ज्वाला जूनच्या मध्यापर्यंत मध्य हिंदुस्थान, रोहिलखंड, बुंदेलखंड, बिहार, लखनौ, कानपूर, बनारस, झाशी व नसराबाद इत्यादी ठिकाणी अत्यंत वेगाने पसरल्या. परंतु दुर्दैवाने बिहारमधील बंडाचा बीमोड विल्यम टेलरने तर बनारस-मधील उठावाचा बंदोबस्त कर्नल नील याने केला. लॉरेन्सने रजपुतांना भडकू दिले नाही. त्यामुळे लखनौ, झाशी व कानपूर येथील सैनिक सोडून बाकीचे सर्वजण दिल्लीकडे तातडीने रवाना झाले. कारण त्यावेळी दिल्ली क्रांतिकारकांकडून पुन्हा काबीज करण्यासाठी इंग्रजांची ५००० सैनिकांची एक तुकडी पंजाबमधून दिल्ली

शहराकडे चाल करून येत होती. त्यासरशी दिल्लीतील युद्धाला पुन्हा तोंड लागले. सप्टेंबरच्या १४ तारखेस घनघोर युद्ध झाले. केवळ सहा दिवसांत बेफाम पराक्रम व अचाट अत्याचार करून ब्रिटिशांनी हिंदूंना त्रास तर दिलाच पण शहराची लूट करून, लाखो निरपराध लोकांची कत्तल करून अखेर दिल्ली काबीज केली !

दिल्ली येथे युद्ध चालू असतानाच कानपूर येथे नानासाहेब पेशव्यांनी तेथील रेसिडेन्सीवर हल्ला चढवला. जूनच्या ६ तारखेपासून २५ तारखेपर्यंत इंग्रजांनी कशी तरी तग धरली. त्यानंतर मात्र तेथील ४०० लोक शस्त्रे खाली ठेवून नानासाहेबांना शरण आले. नानासाहेब हे १८५७ च्या क्रांतियुद्धाचे एक अग्रगण्य पुढारी होते. ब्रिटिश अधिकाऱ्यांना त्यांचा दरारा वाटत असे. परंतु नानासाहेबांचा हा विजय अल्पायुषी ठरला. कारण ७ जुलै रोजी हॅवॅलॉक कानपूरच्या पराभवाचा सूड घेण्यासाठी निघाला. तो २५ जुलै रोजी कानपुरात दाखल झाला. या युद्धात नानासाहेबांनी पराक्रमाची शर्थ केली. पण शेवटी हॅवॅलॉकने कानपूर सर केले.

दिल्ली व कानपूरचा बचपा काढल्यावर हॅवॅलॉक लखनौकडे वळला. लखनौचा वेढा २६ जुलै पासून २ महिने चालू होता. परंतु शेवटी हॅवॅलॉकने कॅम्पबेलच्या मदतीने, क्रांतिकारकांचा पुरता बीमोड केला. त्यानंतर तो पुन्हा कानपूरकडे वळला. कारण तेथे नानासाहेबांचे बालमित्र व शिष्य, तसेच १८५७ चे पराक्रमी क्रांतिवीर तात्या टोपे हे २०००० सैन्यानिशी सज्ज झाले होते. हॅवॅलॉकने तात्यांचा पराभव केला खरा. पण पराभवानंतरही तात्यांची कीर्ती निष्कलंक ठरली.

तात्या टोपे हे नानासाहेबांप्रमाणेच १८५७ च्या क्रांतीचे दुसरे सूत्रधार होते. इंग्रजांना तर ते खवीसाप्रमाणे वाटत. त्यांच्या नसानसांतून स्वातंत्र्याचे, धूर्तपणाचे व स्वाभिमानाचे रक्त सळसळत होते. क्रांतियुद्ध चालू असताना धूर्तपणाने व शौर्याने त्यांनी इंग्रज सेनापतीचा यापूर्वी दोनदा पराभव केला होता. सर ह्यू रोजने तर तात्यांची इतकी धास्ती घेतली होती की, "कहा है तात्या टोपे ?" असे तो भीतीने झोपेत बरळत असे.

तात्यांची एवढी दहशत बसण्याचे कारणही तितकेच स्फूर्तिदायक होते. ते म्हणजे इंग्रजांच्या कवायती सैन्याला तोंड देण्यासारखा शिस्तीचा व शिकलेला फौजफाटा नसतानाही त्यांनी इंग्रजांना अनेक ठिकाणी नकोसे करून सोडले होते. त्यांचे रणकौशल्य विशेषतः ग्वाल्हेरच्या लढतीत दिसून आले. त्या वेळी विजयाची अजिबात आशा नसतानाही केवळ तात्यांच्या धैर्यशाली वृत्तीनेच क्रांतीकारक तेथील खजिना व प्रमुख किल्ला लढवू शकले. परंतु शेवटी लढणे अशक्य झाल्यावर; त्यांनी वाऱ्याच्या वेगाने पळून जाऊन इंग्रजांना ३०० मैलपर्यंत आपला पाठलाग करण्यास भाग पाडले आणि अखेर इंग्रजांच्या ताब्यात पडले, तेही आयत्या वेळी महाराष्ट्राच्या पाचवीला पुजलेल्या फितुरीने दगा दिल्यामुळेच !

इंग्रजांनी लावलेल्या बक्षिसाला भुलून एका देशद्रोह्याने फितुरी केली व १८५९ मध्ये १८ एप्रिलला भारतमातेच्या कंठ्यातील आणखी एक हिरा ओघळला ! टोपकरांना टोप्या घालणारे तात्या देशासाठी मरण पत्करूनही अमर झाले ! मरतामरताही त्याच धैर्यशाली वृत्तीने "मला बंडखोर म्हणायला मी काय त्यांचे खाल्ले आहे ?" असा सवाल त्यांनी केला. त्यांच्या या अमर वाणीने व त्यांनी आयुष्यभर केलेल्या कर्तृत्वाने हजारो लाखो क्रांतिकारकांच्या हृदयांत पेटलेल्या वणव्यात तेल पडले आणि त्यांनी तात्यांच्या बलिदानातून दुप्पट स्फूर्ती घेऊन आपले कार्य पुढे चालू ठेवले.

अशा तऱ्हेने दिल्ली, कानपूर, लखनौ यांचा काटा काढल्यावर बुंदेलखंडातील बंदोबस्ताचे काम तेवढे शिल्लक राहिले. पण ते काम सोपे नव्हते. त्या कामगिरीवर ह्यू रोज याची नेमणूक झाली. हे काम करीत तो झाशीला आला. झाशीची राणी ही युद्धात यापूर्वीच सामील झाली होती. २३ मार्च १८५८ ला युद्धाला सुरुवात झाली. काही दिवस मातब्बर युद्ध झाले. राणीने किल्ला मोठ्या शौर्याने लढवला. पण दुर्दैवाने किल्ल्यात फितुरीने दगा दिला. इंग्रजांनी शहरात व किल्ल्यात धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. तरीही राणीसाहेबांनी निकराचा लढा दिला. पण शेवटी ब्रिटिशांच्या वेढ्यातून त्यांना पळून जाणे भाग पडले. वाऱ्याच्या वेगाने धावत सुटलेल्या राणीसाहेबांना पकडण्यासाठी ब्रिटिशांनी जीवाचे रान केले. पण राणीसाहेब सुखरूप काल्पीला पोहोचल्या. तिथे पेशव्यांनी व राणीसाहेबांनी एकत्र बेत करण्याचे ठरवले. परंतु राणीसाहेबांच्या पलायनाचा सूड घेण्यासाठी रोज स्वतः काल्पीच्या रणमैदानावर हजर झाला.

या युद्धात राणीचे रणकौशल्य पाहून शत्रू व मित्र दोघेही थक्क झाले ! परंतु पेशव्यांच्या सैन्यातील गाफीलपणाचा फायदा घेऊन रोजने त्यांचा पराभव केला.

तरीही या पराभवाने खचून न जाता तात्या टोपे व राणीने ग्वाल्हेरचा किल्ला काबीज केला. पण पुन्हा फितुरीने दगा दिला. पेशव्यांचा मांडलिक इंग्रजांना जाऊन मिळाला ! युद्ध सुरू झाले. राणीसाहेबांवर ग्वाल्हेरच्या बाजूचे रक्षण करण्याची बिकट कामगिरी पडली. रोजने त्यांच्यावरच हल्ला केला. मानाने मरेन पण शरणागतीने सुख पाहणार नाही या ईर्षेने त्या लढल्या. प्रतिकूल परिस्थितीतही पराक्रमाची त्यांनी शर्थ केली. परंतु दुर्दैवाने राणीसाहेबांना अखेर आपला देह ठेवावा लागला !

या क्रांतियुद्धात रावांबरोबर रंकांनी, राजेरजवाड्यांबरोबर महार, चांभार, कोळी यांसारख्या सामान्य जनतेनेही परकीय सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न शर्थीने केला. युद्धात जातिभेद आड आले नाहीत. ब्राह्मणांपासून ते बेरडांपर्यंत सर्व जातींच्या लोकांनी खांद्याला खांदा भिडवून आपले क्षात्रतेज प्रकट केले. पण दुर्दैवाने, परकीय सत्ता झुगारून देण्याचा भारतीयांचा प्रयत्न अयशस्वी ठरला.

याला अनेक गोष्टी कारणीभूत झाल्या. या उठावात दाखवलेले शौर्य वैयक्तिक व विस्कळीत स्वरूपाचे ठरले. याशिवाय हिंदूंपेक्षा ब्रिटिशांना दैवाने हात दिला. नुकतेच क्रिमीयन युद्ध झाल्याने ब्रिटिश सैन्याजवळ अनुभवाची भरपूर शिदोरी होती. त्यांना आधुनिक शस्त्रांचा पुरवठा भरपूर होत होता. तसेच त्यांचे सैन्य संख्येने थोडे असले तरी शिस्तबद्ध होते. त्यांची संघटना भक्कम होती. याउलट हिंदू सैन्याला युद्धाचा तसा विशेष अनुभव नव्हता. त्यांचे शौर्य विस्कळीत व वैयक्तिक स्वरूपाचे होते. त्यांत संघटक वृत्ती नव्हती. आणि याशिवाय असफलतेचे प्रमुख कारण म्हणजे हिंदूंना ठिकठिकाणी फितुरीने दिलेला दगा !

या पराजयाचे प्रमुख कारण म्हणजे उत्तरेच्या मानाने दक्षिणेने दाखवलेली शिथिलता ! उत्तर हिंदुस्थानातील उठावणी ज्या ऐक्याने, धडाडीने व कृतनिश्चयाने झाली तोच निश्चय, तीच धडाडी जर दक्षिणेत दिसली असती तर हिंदुस्थानशी लढण्यास सारे इंग्लंड जरी एक होऊन आले असते तरी मराठ्यांच्या जरीपटक्याला कधीच खाली पाहावे लागले नसते. अशी खात्री मोठ्या अभिमानाने पण दुःखित अतःकरणाने स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी दिली आहे. उत्तर उठल्याबरोबर दक्षिणेने उठण्याचे आश्वासन दिले. त्याप्रमाणे ती उठली देखील. पण उत्तरेबरोबर लगेच उठण्याचे भान तिला राहिले नाही. उत्तरेत क्रांतीचा प्रसार कल्पनासुद्धा करता येणार नाही इतक्या वेगाने झाला व तो देखील "मारू किंवा मरू" या ईर्षेनेच ! पण इकडे दक्षिणपाठोपाठ न उठता केवळ उत्तरेतील क्रांतीच्या प्रगतीवर दृष्टी ठेवून स्वस्थ बसली !

क्रांतीसारख्या आणीबाणीच्या काळात एकएक क्षण असा महत्त्वाचा असतो, की त्यावर राष्ट्राच्या जीवनमरणाचा प्रश्न अवलंबून असतो. घाईने उठावणी करणे किंवा ती करण्यासाठी रेंगाळत बसणे, या दोनही पक्षी, त्या त्या परीने राष्ट्राची हानी होतेच. परंतु अशा कठीण परिस्थितीतही जो कुशल नेता असतो तो अशीच वेळ निवडतो की त्यावेळी धाडसाने पुढे घुसले असता त्याचा जास्तीत जास्त लाभ होतो.

गणितातील सिद्धान्तांनुसार क्रांत्या कधीच घडून येत नाहीत. ध्येयवादी माणसांच्या अंतःकरणांत पेटलेल्या प्रक्षोभांच्या प्रचंड शक्तीवरच क्रांतीचे यश अवलंबून असते. नाकर्तेपणाच्या सुस्तीमुळेच क्रांतीचा जोर थंडावतो नि कर्तृत्वाच्या आचेनेच ती तग धरते. संयम, आकडेमोड, दिनांक इ. गोष्टी उठावणी होईपर्यंत ठीक असतात. मग मात्र प्राणाचीही पर्वा न करता तात्काळ कठोर रणासाठी सिद्ध होऊन उठावे लागते ! आणि यावेळी उडी घेण्यास जो डगमगतो तो चांगलाच मार खातो. क्रांती दाराशी आली असता आता उठावे की मग उठावे असा निर्णय घेण्यातच जो निष्कारण कालव्यय करतो त्याचा सत्यानाश हा ठरलेलाच असतो. क्रांतीची जुळणी करताना शांतता नि संयम, पण उठावणी करताना जास्तीत जास्त साहस नी वीरता हेच प्रमुख सूत्र असावे लागते. कारण एकदा युद्ध सुरू झाल्यावर क्रांतीमध्ये यश मिळवण्याचा एकच मार्ग म्हणजे स्वस्थ न बसता चढाई करून जाणे हा होय !

परंतु दुर्दैवाने क्रांतीच्या या अनमोल तत्त्वाचा दक्षिणेला विसर पडला. उत्तरेच्या पाठोपाठ न उठता, हळूहळू दबकत दबकत तिने कामास प्रारंभ केला. यशाविषयी वाटणारी धाकधूक आणि त्याचाच परिणाम म्हणून तुरळक दोन चार ठिकाणी उत्साहाच्या भरात उसळी खाऊन झालेल्या नि नंतर शमलेल्या उठावण्या. यामुळेच १८५७ चा सशस्त्र प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही व साऱ्या देशभर उसळलेला डोंब शांत झाला !

१८५७ ची क्रांती लौकिक अर्थाने जरी अयशस्वी झाली असली तरी ती खऱ्या अर्थाने कधीच अयशस्वी ठरली असे मानता येणार नाही. कारण क्रांती मग ती कोणत्याही प्रकारची असो, अपयशी ठरली तरी तिच्यामागची तत्त्वनिष्ठा कधीच कायमची मरून जात नाही. तत्त्वे अमरच असतात. केवळ परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळे त्या विशिष्ट काळात क्रांतीला अपयश येते. पुढे अनुकूल परिस्थिती सापडताच जनतेच्या मनात अतृप्त राहिलेल्या तीव्र भावना पुन्हा वर डोके काढतात व परिस्थितीवर मात करून त्या आपले अमरत्व सिद्ध करतात.

क्रांतीचे हे अजरामर तत्त्व १८५७ च्या क्रांतीसही लागू पडते. ५७ सालची परिस्थिती अनेक दृष्टया प्रतिकूल होती. म्हणून दुर्दैवाने ही क्रांती अपयशी ठरली. पण याचा अर्थ असा होत नाही की त्यामुळे भारतीयांच्या मनांतील स्वातंत्र्यप्रेमाचा अंकुरच मुळीं नष्ट झाला! मुळीच नाही! एवढेच काय, पण या अपयशी प्रयत्नांतूनच, क्रांतीच्या रक्तरंजित बलिदानातूनच या अंकुराला चांगले खतपाणी मिळाले आणि तो अंकुर चांगला पोसला गेला. व पुढे १९४७ पर्यंत अविरत प्रयत्न करून, याच अनुभवाच्या जोरावर, भारतीयांनी आपल्या यशाचे शिखर गाठले!

हेच विचार सम्राट बहादुरशहासारख्या थोर कवींनी आपल्या एका गझलमध्ये मांडले आहेत. १८५७ चा प्रयत्न अयशस्वी झाल्यावर कोणीतरी त्यांना विनंती केली,

" दमदमेमें दम नहीं, अब खैर माँगी जान की,
ऐ, जफर ठंडी हुई समशेर हिंदुस्थानकी "

" हे बादशहा, दिवसेंदिवस तू अतिक्षीण होत चालला आहेस. तेव्हा आता इंग्रजांपुढे पदर पसरून त्यांना विनंती कर. कारण हिंदुस्थानची तलवार आता कायमचीच बोथट नी थंड होऊन बसली आहे."

पण अखेर बादशहाने दिलेले उत्तर ऐकून मात्र कुठल्याही भारतीयाची मान स्वाभिमानाने ताठ राहील. तो म्हणतो,

" गझियोमें बू रहेगी, जबतलक ईमानकी
तख्ते लंडनतक चलेगी तेज हिंदुस्थानकी "


" आमच्या देशबांधवांच्या अंतःकरणांत स्वत्वाविषयीच्या प्रेमाचा अखेरचा बिंदू असेपर्यंत हिंदुस्थानचे खड्ग कधीच बोथटणार नाही. एवढेच काय पण एक दिवस ते लंडनच्या सिंहासनावरही प्रहार करताना दिसेल!"

## भारत आणि अण्वस्त्रे

अण्वस्त्र हे आजच्या युगात राजकारणावर स्वामित्व गाजवीत आहे. ज्या राष्ट्राजवळ अण्वस्त्रे आहेत तेच आज आंतरराष्ट्रीय राजकारणात इतरांपेक्षा वरचढ होत आहे. सामर्थ्यवान शेजारी हा फार मोठा शत्रू असतो. आज कम्युनिस्ट चीनजवळ अणुबाँब आहे व त्याला सबंध आशियावर साम्राज्य गाजविण्याची आकांक्षा आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा अलिप्ततावादी देश आहे. परंतु अलिप्त राहूनही स्वसंरक्षणासाठी आपण आपले शस्त्रागार वाढवू शकतो. स्वित्झरलंड हे जगातील एक जुने अलिप्त ( neutral ) राष्ट्र आहे. परंतु नेपोलियनची चढाई त्याने शस्त्रबळावरच परतविली.

भारतीय संस्कृती ही युध्यमान राष्ट्राची संस्कृती नाही हे विधान तितकेसे बरोबर नाही. भारतीयांनी मानवजातीच्या संरक्षणासाठी नेहमी खड्ग उचललेले आहे. जगात शांतता टिकवावयाची असेल तर त्यापाठीमागे प्रबळ शस्त्रसामर्थ्य असावे लागते. क्यूबाचेच उदाहरण घ्या. १९६२ सालच्या चीनच्या आक्रमणाने मित्र राष्ट्रांवर आम्ही किती अवलंबून राहावे याचा आपणास धडा दिला आहे. जागतिक राजकारणात मित्रत्वाची आणि हितसंबंधांची फार गुंतागुंत आहे. राष्ट्राचे स्वसंरक्षण हा जीवन मरणाचा प्रश्न आहे व त्याची शक्यता निर्माण झाल्याखेरीज राष्ट्र प्रगती करू शकत नाही. आशियातील सत्तासमतोलासाठी भारताने अणुबाँब तयार करणे हेच वास्तववादी आणि व्यवहार्य आहे.

[ श्री. **विष्णू भालेराव**, द्वि. व. साहित्य यांनी दादर येथे ' नवयुग ढाल स्पर्धेसाठी ' केलेल्या भाषणाचे सूत्र ]



**Subhash Thakur** Second Year B. A.

# Economics and Art

As a rule, economics and aesthetics are thought to be poles apart. A proverbial economist is pictured as a frigid and insipid robot, a philistine who deromanticizes life. The pre-emption of the pecuniary motivation seals him as a begetter of banality. But this slipshod polarization is only superficial.

Subjectivity is common to both-the creation of beauty and how to fight inflation. Still another point which rules out this alienation is the accepted generalization that economic stability promotes aesthetic response. Though in earlier history, artists were invariably impoverished, the Renaissance artists earned handsome incomes. In modern times, Van Gough, Toulouse-Lautrec courted a vagrant and riotous life, but that was a part of their departure from the bourgeois morality. Affluence was the unmistakable companion of a hightened artistic response, because it weakened the pull of the pecuniary motivation.


The intensity of this motivation was determined by the model of the economic society. The competitive model with its inherent tickleness of prices, profits and wages, the shifts in consumer tastes generated instability. The businessman had to divert more attention to pecuniary interests as it touched his primary need – survival.

The modern model of corporations gave a higher degree of security and provided an opportunity to entertain artistic predilections. But the myth of hard enterprise remained. Anything less than hard striving competition was unacceptable. It is this persistent myth that is frustrating the efforts to reach harmony between the economist and the artist. The communist attempt to mobilise art to glorify and assert economic goals is a graver peril.

The interference of the state can restore the artist's freedom in choosing the aesthetic environment. Advertisement, by distorting beauty, alienates the artist from the industry, but this drawback can be eliminated. Design, one of the important dimensions of quality, should be looked upon from an artistic viewpoint, as industrialization proceeds with fantastic pace.

Economic life has suffered a serious loss because of the misconceived relation between art and economics. The destruction of the myth is not an open sesame, but it will bring nearer the harmony. The more direct pecuniary motives are to be reconciled with the indirect but essentiadly human motives of art. At the end of the economic spiral, we may hope to see the businessman in whom art and economics are inextricably blended together.

( Reference : 'The Liberal Hour' by John Kenneth Galbraith )



વિજ્ઞાન વિભાગ


▲ **Vijaykumar Gosavi** Third Year B. Sc.

# ▼ The Air We Live In

*" We cannot see it; yet we connot live without it. "*

**1. If air is absent!**

Living on the earth is rather like being at the bottom of a sea, hundreds of miles deep.




TEMPERATURE VARIATION OF SKY

Without the atmosphere there would be no people or animals; birds or fishes; trees or plants. There would be no weather, no wind or no rain. And there would be no blue sky and no rosy sunsets and dawns. Fire would be impossible without air.

**2. How cold is the sky ?**

It is not true that air gets gradually colder the higher up we go. It becomes colder upto the height of about seven miles; for the lower layers of atmosphere are warmed by heat radiated from the ground. In the " Stratosphere "–that is in the next layer up–the temperature remains almost the same, but it drops to 40°F. at about eighteen miles. Then the temperature begins to rise, because of certain gases that absorb heat directly from the sun. When these gases disappear at about fifty miles the temperature drops down to 117° F. After that it rises steadily, reaching to 4118° F. at about 250 miles.

Even if we could live in these amazing temperatures, we could not feel them. We feel warmth on summer's day. It is because

our skin is being bombarded by countless air particles. Our sensations of heat or cold depend on how fast these particles travel. But in the thin upper air, there are not enough particles for the skin to feel them. From fifty miles upwards, any living creature that found itself in space, without the atmosphere to protect it, would be *grilled* to death on one side–the side facing the sun and frozen on the other.

### 3. What is Weather ?

The thing we notice about the air is its movement, which we call wind. The great wind systems of the earth are caused by two forces, the heat of the sun and the spinning of the planet on its axis. Were the sun alone at work, all the large-scale wind would blow from a point directly under the sun and spread high up in all directions.

The atmosphere is not a calm ocean of air, but a rough tossing sea, surrounded by tremendous waves. And these waves make a difference in our weather. Whenever the air above us humps itself into a great wave crest, there is likely to be fine weather on the earth below.

We have heard the weather forecasters talk about ridges of high pressure. A "high" is like a hill or mountain of air. Because it contains more air than the other masses round it, wind spiral outwards from it. Then the upper air sinks to fill the gap, warming as it compresses. So the weather in high pressure area is usually sunny and dry.

A " low " on the other hand, is like a valley or a depression in the atmosphere. Wind blows into low–pressure areas and the air, then rising to cool heights, condenses into fog or rain. It is a zone of low pressure, where warm and cool air meet; and the tempests of the earth are born.

Probably we have also heard of warm and cold " fronts ". As their name suggests, they are the forward boundaries of moving masses of air. A cold front occurs when a cool, swift-moving air mass overtakes warm air and thursts it suddenly. It often means violent winds and thunder storms, but the bad weather is usually in small area and passes fairly quickly.

A warm front happens when a warm air mass slowly overtakes and slides over a cooler one. Then large areas may be covered with dreamy, rainy weather that goes on for days.

### 4. What are clouds made of ?


From the *frowning* thunder clouds to the billowing white " *Cumulus* " we see in the sky on summer day, all clouds are made of the same thing i. e. water–vapour.

On clear, dry days water–vapour is invisible. But when warm air is cooled, water vapour could be seen. It may fall as rain, hail or snow or it may coat the ground as dew or frost. And when it condenses into tiny droplets [5000,000,000 would go into a tea-spoon] we call it fog–or riding aloft a cloud!

If air currents were visible we might look across the fields on a warm July after-noon and see endless columns of warm air rising from the ground. Each column would be supporting a white column of clouds. As the air rises it gets cooler until, at a certain temperature, the invisible water-vapour is condensed into visible droplets. The height of the cloud shows us the level of temperature in the sky.

### 5. Why is the sky blue ?

Most of the beautiful things around us are caused, in one way or another, by the atmosphere. The blue sky and the blue sea,




white clouds, *pearly autumn mists,* colourful rainbows, the flash of lightning—all these come from the surrounding air.

The sky is blue, for example, because the air particles catch the short blue-waves of light and spread them across the sky. But blue sky is only about twelve miles high. Beyond that it darkens to violet. Above twenty miles it becomes black and stars appear.

The rosy colour of dawn and sun-set are made in a similar way. In the morning and evening the sun lies low on the horizon, so its rays must travel many more miles of earth's atmosphere than at mid-day. Air particles filter out most of the shorter wavelengths like the blue ones. The longer reddish wave lengths then show up in the slanting beams.


So if you feel like blaming the atmosphere for a rainy day, remember that it gives the earth its light and warmth and colour and provides the breath of all living things ! !




## माजी विद्यार्थी गौरव




**श्री. डी. ए. भागवत**
एम्. एस्सी. प्रथमश्रेणी
( रसायन )



**श्री. आर्. जी. महाजन**
एम्. एस्सी. प्रथमश्रेणी
( रसायन )



**श्री. ए. एस्. भात्रे**
एम्. एस्सी. प्रथमश्रेणी
( रसायन )



**श्री. जी. एन्. नातू**
एम्. एस्सी. प्रथमश्रेणी
( रसायन )



**कु. रजनी दुर्वे**
मुंबई महिला पोलिस अधिकारी
म्हणून निवड




**श्री. वसंत जोशी**
एम् एस्सी. प्रथमश्रेणी
( रसायन )




**कु. प्रमिला लाटकर**
एम्. ए. प्रथमश्रेणी



**कु. सौदामिनी बहुलीकर**
एम्. ए. प्रथमश्रेणी



पदवीपूर्व शास्त्र परीक्षा एप्रिल १९६५ : प्रथमश्रेणीचे मानकरी



व्यवसायपूर्व / प्रथम वर्ष शास्त्र परीक्षा एप्रिल १९६५ : प्रथमश्रेणीचे मानकरी

वरील दोन्ही फोटोतील व्यक्तींची नावे उजवीकडील पानावर पाहावीत.

## पदवीपूर्व शास्त्र परीक्षा : मार्च १९६५ (छायाचित्रातील व्यक्ती)

**बसलेले**

(१) व्ही. एस्. देशमुख (२) ए. एम्. जोशी (३) वाय. जी. पटवर्धन (४) मीना. एन्. भाटे (५) प्रेमा एल्. वैद्य (६) उपप्राचार्य मा. कृ. परांजपे (७) प्राचार्य रा. रा. मालेगावकर (८) उपप्राचार्य रं. ना. गायधनी (९) कुंदा डी. मराठे (१०) भारती बी. जोशी (११) ए. जी. थत्ते (१२) आर. एम्. सिन्नरकर (१३) ए. ए. ठोंबरे.

**उभे रांग पहिली**

(१) नीला व्ही. देवधर (२) नीलिमा बी. जोशी (३) शोभा डी. देवरस (४) मीना ए. भातखंडे (५) विदुला एच. जोशी (६) वीणा एस्. मराठे (७) मंगला व्ही. सहस्रबुद्धे (८) वीणा एस्. साठे (९) भारती एम्. कुलकर्णी (१०) लता एस्. जोगळेकर (११) शुभा बी. गलगली (१२) सुधा व्ही. कुलकर्णी (१३) शशिकला आर. जोशी (१४) शैलजा एस्. पराडकर.

**उभे रांग दुसरी**

(१) जे. एन्. शिंदोरे (२) पी. आर. कानडे (३) ए. ए. मेहता (४) के. आर. कुलकर्णी (५) आर. एस्. ताविलदार (६) एस्. वाय्. कुलकर्णी (७) सी. जी. देशपांडे (८) व्ही. व्ही. जोशी (९) जी. टी. गोडबोले (१०) एस्. व्ही. जांभळे (११) ए. एन्. काळे (१२) एम्. एन्. सुभेदार (१३) एस्. जी. महाजन (१४) एम्. आर. दीक्षित (१५) एस्. एस्. मरकळे (१६) एस्. वाय. कुलकर्णी (१७) एस्. आर. कारले (१८) ए. बी. पठारे.

**उभे रांग तिसरी**

(१) पी. के. पोरवाल (२) ए. व्ही. रायरीकर (३) आर. एन्. जाईल (४) डी. ओ. कुंडलकर (५) जे. के. जोशी (६) व्ही. एम्. पटवर्धन (७) व्ही. एस्. दात्ये (८) पी. जी. भोवे (९) एम्. व्ही. पराडकर (१०) एस्. जी. टोळे (११) के. व्ही. पटवर्धन (१२) एस्. एस्. गडकरी (१३) पी. डी. उतेकर (१४) ए. एल्. कुदळे (१५) एस्. एन्. कुलकर्णी (१६) एस्. टी. अग्रवाल (१७) एम्. एम्. पालकर (१८) ए. व्ही. बाम.

---

## व्यवसायपूर्व । प्रथम वर्ष शास्त्र परीक्षा : मार्च १९६५ (छायाचित्रातील व्यक्ती)

**बसलेले**

(१) मीनाक्षी व्ही. दीक्षित (२) विजया एस्. काळे (३) ए. एस्. घोषराय (४) डी. आर. पोफळे (५) एस्. पी. पटवर्धन (६) उपप्राचार्य मा. कृ. परांजपे (७) प्राचार्य रा. रा. मालेगावकर (८) उपप्राचार्य रं. ना. गायधनी (९) आर. बी. शहा (१०) डी. एम्. बोरकर (११) ए. एम्. साठये (१२) मंगला व्ही. देशपांडे (१३) नलिनी व्ही. बहुलीकर.

**उभे रांग पहिली**

(१) माणिक एस्. कुलकर्णी (२) डोरोथी सी. गोखले (३) पुष्पा व्ही. परांजपे (४) पार्वती एल्. कोळी (५) रेखा आर. प्रधान (६) शशीरेखा एन्. चार (७) मीना आर. पुराणिक (८) विनोदिनी कुलकर्णी (९) प्रतिभा के. मराठे (१०) शकुंतला बी. जोशी (११) कु. पी. एस्. लिमये (१२) कांचनमाला एम्. वनारसे (१३) शीला व्ही. अभ्यंकर (१४) मीना एम्. खासनीस (१५) मंगला एन्. दामले.

**उभे रांग दुसरी**

(१) मोहन आगाशे (२) व्ही. एम्. घोडके (३) एस्. पी. कुलकर्णी (४) अशोक घोषराय (५) व्ही. डी. चितळे (६) पी. एम्. पेंढरकर (७) पी. आर. रेढासाणी (८) ए. एल्. रानडे (९) ए. एस्. देशमुख (१०) डी. एन्. वाकडे (११) के. व्ही. देशपांडे (१२) सी. एस्. काळे (१३) ए. टी. बंगाळे (१४) डी. के. दिवाकर (१५) डी. एस्. देशपांडे (१६) एस्. एम्. पाथरकर (१७) एस्. जी. क्षीरसागर.

**उभे रांग तिसरी**

(१) पी. आर. खळदकर (२) जे. एस्. दामले (३) डी. एस. जोशी (४) पी. व्ही. देव (५) एस्. एस्. कुलकर्णी (६) एम्. जी. परांजपे (७) एस्. वाय. काटदरे.

## पदवीपूर्व शास्त्र परीक्षा
### मार्च १९६५

**छाया चित्रात नसलेले विद्यार्थी**

(१) पी. डब्ल्यू. अत्रे (२) व्ही. बी. पोतदार (३) के. डी. शिंदे (४) ए. व्ही. वैद्य (५) डी. डी. दांडेकर (६) एम्. व्ही. सहस्रबुद्धे (७) वीणादेवी एस. सातपुते (८) व्ही. ए. भैरवकर (९) ए. डी. इंगळे (१०) उषा व्ही. केसकर (११) एस्. व्ही. चोळकर (१२) जयश्री एन्. कुलकर्णी (१३) पी. आर. जोशी (१४) एस्. आर. देशमुख.

## व्यवसायपूर्व । प्रथम वर्ष शास्त्र परीक्षा
### मार्च १९६५

**छाया चित्रात नसलेले विद्यार्थी**

(१) जे. आर. लड्ढा (२) ललिता आर. बापट (३) सुषमा एम्. चक्रदेव (४) लता एच्. धारवाडकर (५) प्रभा एस्. गोडबोले (६) हेमलता एल्. जाजू (७) एस्. एन्. केळकर (८) ए. डी. पेंडसे (९) जे. पी. पिंगळे (१०) एस्. आर. शहा (११) व्ही. डी. उपाध्ये (१२) ए. एम्. वैद्य

# इतर विद्यापीठ-परीक्षांतील प्रथम श्रेणीचे मानकरी

**पदवीपूर्व साहित्य परीक्षा १९६५**

कु. पद्मा मेढेकर
श्री. अशोक निरफराके

**बी. ए. परीक्षा १९६५**

| | | |
|---|---|---|
| श्री. एस्. सी. देशमुख | | भूगोल |
| कु. सुधा जोगळेकर | | गणित |
| कु. आशा भट | सर्वप्रथम | गणित |
| श्री. व्ही. डी. देशमुख | | संख्याशास्त्र |
| कु. पद्मजा गोडबोले | सर्वप्रथम | गणित |

**बी. एस्सी. परीक्षा १९६५**

| | | |
|---|---|---|
| श्री. एम्. एस्. खटकाळे | | रसायन |
| श्री. एस्. एन्. पाटील | | रसायन |
| श्री. वाय. एस्. आगरवाल | | रसायन |
| सौ. नीलिमा जाईल | | रसायन |
| सौ. प्रज्ञा शहा | | रसायन |
| श्री. व्ही. ए. अवचट | | रसायन |
| श्री. एम्. ए. कुलकर्णी | | रसायन |
| श्री. व्ही. व्ही पेंडसे | | रसायन |
| श्री. एस्. के. सवदी | | रसायन |
| श्री. एस्. एन्. गोगटे | | रसायन |
| श्री. एस्. व्ही. पराडकर | | रसायन |
| श्री. आर. एन्. वर्मा | | रसायन |
| सौ. रजनी सोमण (पंडित) | | रसायन |
| कु. पुष्पा मोहोनी | | रसायन |
| कु. श्यामला जाईल | | रसायन |
| श्री. व्ही. एन्. पेंडसे | | रसायन |
| श्री. सी. एन्. नावलेकर | | पदार्थविज्ञान |
| श्री. यू. एम्. गोडसे | | पदार्थविज्ञान |
| श्री. व्ही. एस्. जोशी | | पदार्थविज्ञान |
| कु. नीलकांती पेंढरकर | | वनस्पतीशास्त्र |
| कु. हेमलता पेंढारकर | सर्वप्रथम | वनस्पतीशास्त्र |
| कु. प्रतिभा शाह | | वनस्पतीशास्त्र |

# ▽ महाविद्यालयीन वार्ता

चालू शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्राबद्दलची महाविद्यालयीन वार्ता सादर करीत आहोत.

## पन्नासाव्या वर्षात पदार्पण

आपल्या महाविद्यालयाची स्थापना दि. १४ जून १९१६ रोजी झाली. दि. १४ जून १९६५ रोजी आपल्या महाविद्यालयाने पन्नासाव्या वर्षात, **सुवर्ण महोत्सवी** वर्षात पदार्पण केले. ही आनंदाची आणि भाग्याची गोष्ट होय. हे वर्ष म्हणजे महाविद्यालयाच्या शैक्षणिक सेवेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली. त्या स्थित्यंतरांचे पडसाद साहजिकपणे महाविद्यालयाच्या जीवनात उमटले. बदलत्या परिस्थितीला निर्धाराने तोंड देत आपल्या महाविद्यालयाने ही अर्धशतकाची वाटचाल केली. पन्नासाव्या वर्षात पाऊल टाकताना ज्यांच्या कर्तृत्वामुळे व ध्येयनिष्ठेमुळे आपले महाविद्यालय स्थिरपद झाले, वर्धिष्णू झाले, प्रतिष्ठा पावले त्यांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण होणे स्वाभाविक आहे.

दि. १४ जून १९६५ रोजी आपल्या महाविद्यालयाचा **एकोणपन्नासावा वर्धापनदिन** साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने आयोजित केलेल्या अध्यापकांच्या सभेत प्राचार्य **मालेगावकर** यांनी महाविद्यालयाने आजवर केलेल्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेतला. डॉ. **रामकृष्ण गोपाळ भांडारकर,** श्री. **हरि नारायण आपटे,** लोकमान्य **बाळ गंगाधर टिळक,** पहिले प्राचार्य **विनायक गणेश आपटे** यांनी महाविद्यालयाच्या उभारणीसाठी जे थोर कार्य केले त्याबद्दल प्राचार्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. महाविद्यालयाचे स्थैर्य आणि वाढ या बाबतीत ज्या प्रशासकांनी, अध्यापकांनी व सन्मान्य माजी विद्यार्थ्यांनी स्नेहपूर्ण कर्तव्य केले त्यांच्याविषयी प्राचार्यांनी आदर व्यक्त केला.

नंतर प्राचार्यांनी महाविद्यालयाच्या आजच्या स्वरूपाचे व समस्यांचे चित्र रेखाटले; महाविद्यालयाच्या संकल्पित विकासयोजनेचा आराखडा त्यांनी अध्यापकांसमोर मांडला आणि या योजनेच्या कार्यवाहीसाठी शक्य त्या सर्व प्रकारांनी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन केले. पुढील वर्षी व्हावयाच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने सुवर्णमहोत्सवनिधीसाठी देणग्या गोळा करण्याच्या कार्याला आरंभ करण्यात आला. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व सध्या महाविद्यालयात अध्यापक म्हणून काम करीत असलेले **प्रा. द. वि. कुलकर्णी** व **प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर** यांनी सुवर्णमहोत्सवनिधीसाठी प्रत्येकी रुपये शंभरची देणगी दिली. धन्यवाद !

## शैक्षणिक वर्षारंभ

या वर्षी शैक्षणिक वर्षाचा आरंभ सोमवार दि. २१ जून १९६५ रोजी झाला. त्या दिवशी दुपारी बारा वाजता देवी रमाबाई सभागृहात प्राचार्य **मालेगावकर** यांचे पदवीपूर्व वर्गातील विद्यार्थ्यांसाठी उद्घाटनाचे मार्गदर्शनपर भाषण झाले. महाविद्यालयातील उपलब्ध सोयींचा विद्यार्थ्यांनी आपल्या सर्वांगीण विकासासाठी भरपूर उपयोग करून घ्यावा आणि प्राध्यापकांशी वैयक्तिक संपर्क साधून त्याचा आपल्या विद्यार्जनाशी संबंध जोडावा असे नवागतांना प्राचार्यांनी आवाहन केले. उद्घाटनप्रसंगी बी. ए. परीक्षेत विद्यापीठात प्रथमश्रेणीत सर्वप्रथम आलेल्या कु. **आशा भट** व कु. **पद्मजा गोडबोले** या दोन विद्यार्थिनींचा श्रीफल देऊन प्रकट सत्कार करण्यात आला.

## विद्यापीठ परीक्षांतील सुयश

गेल्या शैक्षणिक वर्षी झालेल्या पुणे विद्यापीठाच्या विविध परीक्षांमध्ये ज्यांनी यश मिळविले त्यांचे आम्ही हार्दिक अभिनन्दन करतो ! पदवीपूर्व शास्त्र : त्र्याहत्तर, पदवीपूर्व साहित्य : दोन, व्यवसायपूर्व : एकसष्ट, बी. ए.: पाच व बी. एस्सी. : तेवीस–अशा एकूण **एकशे चौसष्ट** विद्यार्थ्यांनी प्रथमश्रेणी संपादून महाविद्यालयाच्या कीर्तीमध्ये भर घातली. त्यांना आमचे विशेष धन्यवाद ! !

## पारितोषिकांचे मानकरी

पुढे निर्देश केलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठीय पारितोषिके मिळविली :

श्री. **रा. ना. डिंबळे,** पदवीपूर्व साहित्य : विष्णू दाजी साने संस्कृत पारितोषिक व नारायणराव नगरकर शिष्यवृत्ती.

श्री. **अ. मा. निरफराके,** पदवीपूर्व साहित्य : सावित्रीबाई लक्ष्मण जोशी टोकेकर हिंदी पारितोषिक.

कु. **जयश्री गुणे,** प्रथम वर्ष साहित्य : लो. टिळक संस्कृत शिष्यवृत्ती ( विभागून )

कु. **हेमलता पेंढारकर,** बी. एस्सी. : प्राचार्य शि. वि. शेवडे पारितोषिक. वनस्पतीशास्त्रांत सर्वप्रथम.

कु. **आशा भट,** बी. ए. : प्रा. डी. डब्ल्यू. केरकर पारितोषिक, प्रा. गो. वा. भागवत पारितोषिक, व प्रथम श्रेणीत सर्वोच्च गुण मिळविल्याबद्दल श्री. ग. अ. गोडबोले पारितोषिक.

कु. **पद्मजा गोडबोले,** बी. ए. : प्रथमश्रेणीत सर्वोच्च गुण मिळविल्याबद्दल श्री. गोडबोले पारितोषिक.

श्री. **टी. आर्. सी. शर्मा,** बी. ए. : युद्धशास्त्र या विषयात सर्वप्रथम आल्याबद्दल स्वातंत्र्यवीर सावरकर पारितोषिक.

विद्यापीठीय पारितोषिके मिळवून या विद्यार्थीमित्रांनी स्पृहणीय यश मिळविले आहे. हार्दिक अभिनंदन ! त्यांचे हे यश पुढिलांना स्फूर्ती देवो ! ! कु. **आशा भट** व कु. **पद्मजा गोडबोले** यांनी बी. ए. परीक्षेत गणित विषय घेऊन प्रथमश्रेणीत प्रथम क्रमांकाने येण्याचा जो बहुमान मिळवला त्याचा मुद्दाम स्वतंत्रपणे उल्लेख करीत आहोत. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या अशा यशामुळेच शिक्षकांचे व महाविद्यालयाचे मन अभिमानाने भरून येते.

प्रथमश्रेणीत आलेल्या व पारितोषिके मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची छायाचित्रे या अंकात इतरत्र पाहावयास मिळतील.

## अन्नपूर्णा नारायण पारितोषिक

प्रा. रा. ना. गद्रे यांनी ठेवलेले रु. पंचवीसाचे ‘ अन्नपूर्णानारायण पारितोषिक ’ या वर्षी कु. **सुलभा पुरुषोत्तम घारे** या विद्यार्थिनीस देण्यात आले.

## प्राध्यापक वर्ग

### नवीन नेमणुका

पुढील व्यक्तींची अध्यापक म्हणून या वर्षी नेमणूक झाली :

प्रा. **व्ही. एम्. दाते,** रसायन विभाग. प्रा. **मा. शं. सोमण,** एम्. ए., एम्. कॉम., अर्थशास्त्र विभाग. प्रा. **ह. वि. शिंत्रे,** एम्. ए., एम्. एड., इंग्रजी विभाग. कु. **मोहना वाडेयार,** एम्. ए., इंग्रजी विभाग. प्रा. **मो. प्र. मराठे,** एम्. ए., तत्त्वज्ञान विभाग.

पुढील व्यक्तींची ट्यूटर म्हणून नेमणूक झाली : श्री. **सी. आर्. अरगडे,** बी. ए., इंग्रजी विभाग. श्री. **पी. एम्. टोंबरे,** बी एस्सी. व श्री. **एस्. जी. मराठे,** बी. एस्सी., गणित–संख्याशास्त्र विभाग. श्री. **डब्ल्यू. एन्. कुबेर,** एम्. ए., अर्थशास्त्र विभाग. श्री. **जी. ए. पोतनीस,** एम्. ए., जर्मन विभाग.

### नेमणुका चालू

पुढील अध्यापकांची नेमणूक यावर्षी चालू ठेवण्यात आली : प्रा. **ल. प्र. दाते** व प्रा. **श्री. श्या. सवदी,** इंग्रजी विभाग. प्रा. कु. **कुंदा सुळे,** तत्त्वज्ञान विभाग. प्रा. **वि. रा. शिरगुरकर,** अर्थशास्त्र विभाग. प्रा. **दा. रा. गोळे,** भूगोल विभाग. प्रा. **अ. रा. कुलकर्णी,** जीवशास्त्र विभाग, प्रा. **सी. डी. आगटे,** रसायन विभाग, प्रा. **चं. शं. बर्वे,** मराठी विभाग.

### नेमणूक कायम

प्रा. **दु. रा. भारद्वाज,** हिंदी विभाग; प्रा. **चं. गं. देशपांडे,** मानसशास्त्र विभाग; प्रा. **प्र. दि. केळकर,** गणित विभाग; आणि डॉ. **व. के. मांडके,** पदार्थविज्ञान विभाग यांच्या नेमणुका यावर्षी कायम करण्यात येऊन त्यांना शि. प्र. मंडळीच्या कायम सेवेमध्ये प्रविष्ट करून घेण्यात आले. या सर्वांचे हार्दिक अभिनंदन !

## रजा

इंग्रजी विभागातील व्याख्याते प्रा. **अ. अ. मुतालिक-देसाई** यांनी फुलब्राईट शिष्यवृत्ती मिळवून इंग्रजीच्या उच्च शिक्षणासाठी दि. ११ ऑगस्ट, १९६५ पासून एक वर्षाची रजा घेतली आहे. त्यांच्याविषयी नंतर स्वतंत्रपणे लिहिले आहे.

## प्रा. कृ. ना. पिले सेवानिवृत्त

आपल्या महाविद्यालयातील तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख व शि. प्र. मंडळीचे आजीव सभासद **प्रा. कृष्ण नारायण पिले** हे दि.१६ मे १९६५ रोजी सेवानिवृत्त झाले.

प्रा. कृ. ना. पिले हे आपल्याच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी. १९३० साली ते तत्त्वज्ञान हा प्रमुख विषय घेऊन बी. ए. झाले. त्यानंतर त्यांनी एम्. ए., एल्एल्. बी. व टी. डी. (लंडन) या पदव्या मिळविल्या. लंडन विद्यापीठात सर पर्सी नन् या प्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञाचे मार्गदर्शन त्यांना लाभले. ऑगस्ट १९३६ मध्ये नू. म. वि. प्रशालेमध्ये शिक्षक या नात्याने त्यांनी आपल्या सेवेस आरंभ केला. जुलै १९३९ मध्ये शिक्षणशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांची मुंबई येथील रामनारायण रुइया महाविद्यालयात बदली झाली. त्यानंतर जून १९४१ मध्ये प्रा. पिले यांची सोलापूर येथील हरिभाई देवकरण प्रशालेत मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली. तेथे ते मुख्याध्यापक म्हणून तेरा वर्षे काम करीत होते. एप्रिल १९५४ मध्ये मुंबई येथील पोदार व्यापार महाविद्यालयात उपप्राचार्य म्हणून त्यांची बदली झाली. तेथे त्यांनी तर्कशास्त्र आणि वैज्ञानिक पद्धतीचे अध्यापन केले. एप्रिल १९६० मध्ये शिक्षण प्रसारक मंडळीच्या चिटणीसपदी त्यांची नियुक्ती झाली व आपल्या महाविद्यालयात १९६० पासून सेवानिवृत्तीपर्यंत त्यांनी तर्कशास्त्र, मानसशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांचे अध्यापन केले.

अध्ययन, अध्यापन व प्रशासन अशा विविध नात्यांनी तीस वर्षांहून अधिक काळ प्रा. पिले यांचा शिक्षण प्रसारक मंडळीशी निकट संबंध येत गेला. एक कुशल अध्यापक व कर्तबगार प्रशासक म्हणून त्यांनी लौकिक संपादन केला. त्यांच्या शि. प्र. मंडळीच्या एकूण सेवेतील फारच थोडा काळ ते आपल्या महाविद्यालयात होते. तेही शि. प्र. मंडळीच्या चिटणीसपदाची प्रशासकीय जबाबदारी सांभाळीत असताना! तरीही आपल्या स्वतंत्र विचारसरणीने व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाने विद्यार्थ्यांना ते आकृष्ट करीत असत. कोणत्याही प्रश्नाचा सरळ, मूलगामी व सर्वांगीण विचार करण्यासाठी जी न्यायबुद्धी व निर्भय वृत्ती असावी लागते ती त्यांच्या ठिकाणी वसत असल्यामुळे त्यांच्या सर्वच विचारांत एक प्रकारचा विशिष्ट तोल सांभाळला जात असे. विद्यार्थी आणि सहकारी यांना त्यांच्याविषयी जो स्नेहादर वाटतो तो यामुळेच.

शिक्षणक्षेत्रात ज्या निष्ठेने प्रा. पिले यांनी कार्य केले ती निष्ठा निश्चितच भूषणावह आहे. प्रा. पिले यांना उदंड आयुष्य व निरामय आरोग्य लाभो ही शुभेच्छा! आपल्या सेवानिवृत्तीच्या काळातही त्यांच्या अनुभवाचा लाभ शि. प्र. मंडळीस व आपल्या महाविद्यालयास होत राहील अशी आशा आहे.

## प्रा. मंगळवेढेकर चिटणीस झाले

प्रा. कृ. ना. पिले यांच्या सेवानिवृत्तीनंतर आपले उपप्राचार्य इंग्रजीचे प्राध्यापक **के. पं. मंगळवेढेकर** यांची दि. १६ मे, १९६५ रोजी शिक्षण प्रसारक मंडळीच्या चिटणीसपदावर नियुक्ती झाली. प्रा. मंगळवेढेकर यांचा गेल्या सोळा सतरा वर्षांचा शि. प्र. मंडळीच्या प्रशासनाचा विविध प्रकारचा अनुभव लक्षात घेता चिटणीसपदाची वाढती जबाबदारी ते यशस्वी रीतीने पार पाडतील यात शंका नाही.

## प्रा. गायधनी उपप्राचार्य झाले

प्रा. मंगळवेढेकर यांच्यावर सोपविलेल्या नवीन जबाबदारीमुळे उपप्राचार्यपदाच्या जबाबदारीतून त्यांना मुक्त करण्यात आले. त्यांच्या जागी मुलांच्या वसतिगृहाचे प्रमुख व प्राचीन भारतीय संस्कृती आणि इतिहास या विषयाचे प्राध्यापक **रं. ना. गायधनी** यांची दि. १६ ऑगस्ट, १९६५ रोजी नेमणूक करण्यात आली. प्रा. गायधनी गेली दहा-अकरा वर्षे आपल्या महाविद्यालयाच्या प्रशासनाचे कामात सहभागी आहेत. या पूर्वानुभवाचा त्यांना आपल्या नव्या जबाबदारीत चांगला उपयोग होईल अशी खात्री आहे.

## सुस्वागतम्

### डॉ. लीला गोळे अमेरिकेहून परत

तत्त्वज्ञान-विभागातील उप-प्राध्यापिका डॉ. **लीला गोळे** अमेरिकेतील आपला एक वर्षाचा अध्ययन-अध्यापनाचा कार्यक्रम यशस्वी रीतीने संपवून जूनमध्ये भारतात परत आल्या. दि. १ जुलै, १९६५ पासून त्यांनी आपल्या अध्यापनास सुरुवात केली.

**स्मिथ कॉलेज**मध्ये भारतीय तत्त्वज्ञानाचे अध्यापन करीत असतानाच 'ख्रिश्चन धर्मशास्त्र', 'एक्झिस्टेन्शिॲलिझम्' इ. विषयांचा त्यांनी अभ्यास केला. अमेरिकन शिक्षणपद्धतीचा त्यांनी जवळून परिचय करून घेतला. निरनिराळ्या विद्यापीठांना व महाविद्यालयांना भेटी देऊन तेथे त्यांनी व्याख्याने दिली. तत्त्वज्ञान-विषयक परिषदांना त्या उपस्थित राहिल्या. जाता-येताना मध्यपूर्वेतील व यूरोपमधील काही देशांना त्यांनी भेटी दिल्या.

डॉ. गोळे यांनी संपादित केलेल्या या व्यापक अनुभवाचा आपल्या महाविद्यालयातील व पुणे विद्यापीठामधील विद्यार्थ्यांना लाभ होत राहील असा विश्वास वाटतो.

### प्रा. सौ. पोरे अमेरिकेहून परत

अर्थशास्त्र विभागातील उप-प्राध्यापिका प्रा. **सौ. कुमुद पोरे** जुलै अखेर भारतामध्ये परत आल्या. गेल्या वर्षी डॅनफोर्थ् इंडियन् फेलोशिप मिळवून त्या **क्लेरमाँट ग्रॅज्युएट स्कूल**, क्लेरमाँट, कॅलिफोर्निया येथे अर्थ-शास्त्रीय संशोधन करण्यासाठी गेल्या होत्या. आपल्या संशोधनविषयात उत्तम प्रगती करून त्यांनी स्पृहणीय यश मिळविले व अमेरिकन प्राध्यापकांकडून वाहवा मिळविली.

संशोधनाव्यतिरिक्त त्यांनी तेथे विविध संघटनांत व्याख्याने दिली व अनेकविध कार्यक्रमांत भाग घेतला. लॉस एंजलसमध्ये भरलेल्या वर्ल्ड अफेअर्स डेमध्ये 'अमेरिकन परराष्ट्रनीती व भारताच्या प्राथमिक गरजा' या विषयावर व्याख्यान दिले. 'तटस्थ देशांविषयीचे अमेरिकन परराष्ट्रीय धोरण' या विषयावरील परिसंवादात भाग घेतला. 'आग्नेय आशियातील अमेरिकन राजनीती' या विषयावर वार्ताहरपरिषदेत आपले विचार व्यक्त केले. क्लेरमाँट येथे झालेल्या ट्रेड अँड डेव्हलपमेंट कॉन्फरन्समध्ये चर्चाप्रवर्तक म्हणून त्यांचे प्रारंभिक भाषण झाले. आपल्या अमेरिकेतील वास्तव्याच्या अखेरीस प्रा. सौ. कुमुद पोरे यांनी विटन्बर्ग, स्प्रिंगफील्ड येथे अध्यापन केले व व्याख्याने दिली. भारतास परत येताना त्या जपानमार्गे आल्या. टोकिओ, हाँगकाँग, मनिला, बँकॉक इ. ठिकाणी त्यांनी डॉ. ओखाटा, डॉ. कातिमुसा इ. अर्थशास्त्रज्ञांच्या भेटी घेतल्या. मनिला येथील फिलिपाईन्स विद्यापीठात त्यांचे व्याख्यान झाले.

प्रा. सौ. कुमुद पोरे यांनी अमेरिकन विद्यापीठांतील विद्यार्थी हितसंवर्धक योजनांचे विशेष अवलोकन केले आहे. त्यांच्या अवलोकनाचा महाविद्यालयीन सामूहिक जीवनाच्या अभिवृद्धीसाठी उपयोग होईल यात शंका नाही.

डॉ. लीला गोळे व प्रा. सौ. कुमुद पोरे यांचे आम्ही स्नेहपूर्वक स्वागत करतो! शैक्षणिक पुनर्विचाराच्या सध्याच्या वातावरणात त्यांच्या अवलोकनाचे, अनुभवाचे, तौलनिक दृष्टीचे महाविद्यालयीन उपक्रमांच्या मूल्यमापनासाठी व पुनर्रचनेसाठी चांगले साहाय्य होत राहील असा भरवसा वाटतो. येत्या दशकात महाविद्यालयीन शिक्षणाच्या गरजा, प्रवृत्ती व समस्या यांचे स्वरूप काय असेल आणि त्यासाठी आपल्या महाविद्यालयाने कोणते विधायक उपक्रम हाती घेतले पाहिजेत याविषयीचे चिंतन आमच्या मते आज मौलिक महत्त्वाचे आहे. डॉ. गोळे व प्रा. पोरे यांनी त्या चिंतनाला चालना द्यावी अशी अपेक्षा बाळगणे चुकीचे ठरणार नाही.

## शुभास्ते पंथानः

### प्रा. मुतालिक–देसाई अमेरिकेस

इंग्रजी विभागातील उत्साही आणि विद्यार्थीप्रिय व्याख्याते प्रा. **अ. भ. मुतालिक–देसाई** यांनी फुलब्राईट शिष्यवृत्ती व स्मिथ-मुंड ट्रॅव्हल ग्रँट मिळविली, आणि दि. ११ ऑगस्ट १९६५ रोजी त्यांनी अमेरिकेस प्रयाण केले. प्रा. मुतालिक-देसाई इंडियाना विद्यापीठ, ब्लूमिंग्टन, इंडियाना येथे इंग्रजी साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करणार आहेत. प्रा. मुतालिक-देसाई यांच्या अध्ययनात आम्ही त्यांना सुयश इच्छितो! त्यांना मिळालेल्या या उत्तम संधीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन!

### श्री. गो. मा. दामले जर्मनीस

जर्मन विभागात गेली दोन वर्षे ट्यूटर म्हणून काम करीत असलेले श्री. **गोविंद माधव दामले** यांना पश्चिम जर्मन सरकारने जर्मन अॅकडेमिक एक्सचेंज सर्व्हिस तर्फे शिष्यवृत्ती दिली असून ते दि. २९ ऑगस्ट, १९६५ रोजी विमानाने जर्मनीस रवाना झाले. पश्चिम जर्मनीतील म्यूनिच विद्यापीठात त्यांचे चार वर्षे वास्तव्य होणार असून जर्मन साहित्यातील पीएच्.डी. साठी ते अभ्यास करणार आहेत. श्री. दामले यांना मिळालेल्या या उत्तम संधीबद्दल आम्ही त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो ! त्यांना आपल्या उच्च शिक्षणात सुयश लाभो ही शुभकामना ! !

### प्राध्यापकांचे ग्रंथलेखनादी कार्य

हाती आलेल्या माहितीच्या आधारे आपल्या प्राध्यापकांनी गेल्या सहा महिन्यांत केलेल्या ग्रंथलेखनादी विशेष कार्याचे संक्षिप्त वृत्त देत आहोत :

प्रा. **अरविंद मंगरूळकर** यांच्या ' मराठीच्या व्याकरणाचा पुनर्विचार ' या ग्रंथास महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेने रुपये शंभरचे पारितोषिक दिले आहे.

प्रा. **रा. म. गोखले** यांचे बी. ए. ( अर्थशास्त्र ) या वर्गासाठी **' आर्थिक इतिहास '** हे पाठ्य पुस्तक प्रसिद्ध झाले. अहमदनगर कॉलेजच्या नियोजन मंडळाचे त्यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. त्या वेळी त्यांनी ' थिअरी ऑफ प्लॅनिंग ' या विषयावर व्याख्यान दिले. पुणे विद्यापीठातर्फे कडूस येथे भरलेल्या बहिःशाल शिक्षण शिबिरात ' ग्रामीण भारताचे आर्थिक प्रश्न ' या विषयावर त्यांनी बारा व्याख्याने दिली.

डॉ. **श्री. र. कावळे** यांची पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली : ( १ ) ' Two Concepts of Liberty ' पूना फिलॉसफी युनियन ५-८-६५. ( २ ) ' Pragmatism of John Dewey ' श्री शाहूमंदिर महाविद्यालय. २०-८-६५. ( ३ ) Dewey's Contextualism. ' डी नोबिली कॉलेज. २४-८-६५.

प्रा. **ए. जी. वझे** यांनी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी लिहिलेले ' A Course in Analytical Geometry ' हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध झाले.

प्रा. **प्र. र. करमरकर** यांनी द्वितीयवर्षसाहित्याच्या भूगोलाच्या विद्यार्थ्यांसाठी लिहिलेले **' आशिया '** हे पाठ्यपुस्तक प्रसिद्ध झाले. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या चिटणीसपदी पुढील दोन वर्षांकरिता त्यांची निवड झाली.

डॉ. **लीला गोळे** यांची अमेरिकेहून परत आल्यानंतर पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली : ( १ ) ' Philosophy and Religion in American Universities ' पूना फिलॉसफी युनियन. १५-८-१९६५. ( २ ) ' Freedom and Responsibility ' नौ. वाडिया महाविद्यालय तत्त्वज्ञान-मंडळाच्या उद्‌घाटनाच्या वेळी दिलेले व्याख्यान. २०-७-१९६५. ( ३ ) ' University Education in America. ' स. प. म. प्राध्यापक वादसभा. २२-७-१९६५.

प्रा. सौ. **कुमुद पोरे** यांची अमेरिकेहून परत आल्यानंतर पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली : ( १ ) ' The Development of Human Resources ' श्री छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील नियोजन-मंडळाच्या उद्‌घाटनाच्या वेळी दिलेले व्याख्यान. (२) ' American Life : Myth and Reality ' स. प. म. प्राध्यापक वादसभा.

प्रा. **भीमराव कुलकर्णी** यांची खालील पुस्तके प्रसिद्ध झाली : (१) **भाऊसाहेबांची बखर.** नव्या ऐतिहासिक संशोधनाधारे नवी पाठसंशोधित आवृत्ती. (२) श्री. दामले यांचे **शास्त्रीय मराठी व्याकरण.** नवी संक्षिप्त आवृत्ती. ( ३ ) **' बाळू, शेतकरी आणि भूत '** कुमारांसाठी कथासंग्रह. पुणे विद्यापीठ बहिःशाल मंडळातर्फे त्यांची उरण येथे ' स्वामी विवेकानंद ' या विषयावर तीन व्याख्याने झाली.

प्रा. **चंद्रशेखर बर्वे** यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सप्तखंडात्मक वाङ्मयेतिहासयोजनेतील चौथ्या खंडाचे संपादक प्रा. रा. श्री. जोग यांचे साहाय्यक म्हणून गेली चार वर्षे काम केले. वाङ्मयेतिहासाचा हा चौथा खंड नुकताच प्रसिद्ध झाला आहे. प्रा. बर्वे यांचे प्रसिद्ध झालेले **लेख** : ( १ ) सवाई माधवराव : खाडिलकरांनी रंगवलेला व न रंगवलेला. कथालक्ष्मी, मार्च १९६५. ( २ ) चातक और मयूर राष्ट्रवाणी, मार्च १९६५. या लेखाचे मराठी भाषांतर ' सह्याद्री 'च्या मे १९६५ च्या अंकात प्रसिद्ध झाले. ( ३ ) अव्वल इंग्रजीतील अद्‌भुत उत्थान. कथालक्ष्मी, जून १९६५. ( ४ ) बाळशास्त्री जांभेकर : आधुनिकतेचे

अग्रदूत. साहित्यसहकार, जून १९६५. प्रा. बर्वे यांनी दिलेली **व्याख्याने** : ( १ ) बाळशास्त्री जांभेकर : आधुनिकतेचे अग्रदूत. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय २२-६-१९६५. ( २ ) साहित्यिका अमरत्व. महाराष्ट्र राष्ट्रभाषा अभ्यासमंडळ. ३-७-१९६५. ( ३ ) नाटककार शिरवाडकर. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय. २२-८-१९६५.

### प्रा. केळकर एम्. एस्सी. त सर्व प्रथम

गणित विभागातील उप-प्राध्यापक **म. कृ. केळकर** हे पूर्वी एम्. एस्सी. झालेले असून पुणे विद्यापीठाच्या **एम्. एससी.** परीक्षेस यंदा **शुद्ध गणित** हा विषय घेऊन बाहेरून बसले होते. या परीक्षेत त्यांनी ७७ टक्के गुण मिळविले व या परीक्षेस बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांत त्यांनी उच्चांक मिळविला. प्रा. म. कृ. केळकर यांनी मिळविलेले हे उज्ज्वल यश त्यांच्या आजवरच्या विद्याव्यासंगास साजेसेच आहे. प्रा. केळकर यांचे मनःपूर्वक अभिनन्दन ! प्रा. केळकर यांचे हे यश आपल्या विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासाची प्रेरणा देईल यात शंका नाही.

### रसायनविषयक वासंतिक शिबिर

विद्यापीठ अनुदान मंडळ व यू. एस्. एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट यांनी पुणे विद्यापीठामध्ये दि. ७ जून ते १६ जुलै ६५ या कालावधीत सहा आठवड्यांचे एक **रसायनविषयक वासंतिक शिबिर** आयोजित केले होते. महाराष्ट्र व गुजराथ राज्यांतील रसायनशास्त्राच्या महाविद्यालयीन अध्यापकांसाठी हे शिबिर होते. विज्ञानाच्या अध्यापनाची पुनर्रचना घडवून आणण्यासाठी अध्यापकांना प्रशिक्षण देणे या शिबिराचा उद्देश होता. अमेरिकेतील मिनेसोटा विद्यापीठाचे रसायनशास्त्राचे प्राध्यापक डॉ. **रॉबर्ट ब्रेस्टेड** हे या शिबिराचे सल्लागार होते व पुणे विद्यापीठ रसायनविभाग प्रमुख डॉ. **अर्णीकर** यांनी शिबिराचे संयोजन केले. एकूण तीस प्राध्यापक या शिबिरात सहभागी झाले होते. आपल्या महाविद्यालयातर्फे रसायनशास्त्राचे **प्रा. वि. द. सरलष्कर** यांची या शिबिरासाठी नियुक्ती करण्यात आली होती. या शिबिरातील प्रशिक्षणाचा प्रा. सरलष्कर यांना चांगला फायदा झालेला असून संपादित केलेल्या प्रशिक्षणाचा उपयोग ते आपल्या अध्यापनात करू लागले आहेत.

वैज्ञानिक प्रगती करून इतर राष्ट्रांबरोबर येण्यासाठी आपल्या विज्ञान शिक्षणक्रमांत व शिक्षण पद्धतींत तातडीने बदल करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने ही शिबिरे निःसंशय महत्त्वाची आहेत.

## दिन विशेष

### लो. टिळक पुण्यतिथि दिन

लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीच्या दिवशी दि. १ ऑगस्ट १९६५ रोजी लो. टिळक स्मारक ग्रंथालय व वादसभा यांच्या चालू वर्षातील कार्याचे उद्घाटन आपल्या महाविद्यालयाचे सन्मान्य माजी विद्यार्थी, महाराष्ट्रातील व्यासंगी टीकाकार व समाजचिंतक प्राध्यापक **गं. बा. सरदार** यांच्या शुभहस्ते झाले. त्याचवेळी ' एस्. पी. रिव्ह्यू ' या विद्यार्थीसंपादित पाक्षिकाच्या चालूवर्षीच्या पहिल्या अंकाचे त्यांनी प्रकाशन केले.

प्रा. सरदार यांनी आपल्या भाषणात लोकमान्यांच्या प्रभावी नेतृत्वाचे रहस्य विशद करून सांगितले. भारतीय जनतेच्या स्वातंत्र्यलढ्यात लोकमान्यांनी जे लोकोत्तर कार्य केले त्याची ऐतिहासिक व तात्त्विक मीमांसा त्यांनी आपल्या भाषणात केली. नेता आणि जनता यांच्यातील संबंधाचे प्रबोधन व स्वातंत्र्यसंपादन यांच्या संदर्भात निर्माण झालेले गुंतागुंतीचे नाते, त्याची ऐतिहासिक प्रक्रिया यांचे प्रा. सरदार यांनी आपल्या भाषणात विवरण केले. अनेक प्रकारच्या मर्यादा न् अडचणी यांना न जुमानता लोकमान्यांनी जनताजागृतीचे, लोकसंघटनेचे व स्वातंत्र्यलढ्याचे जे कुशल नेतृत्व केले त्यात अभिव्यक्त झालेली लोकमान्यांची धीरोदात्त, प्रसन्नगंभीर प्रतिमा प्रा. सरदार यांनी आपल्या भाषणात नेहमीच्या ओघवती वाणीने साकार केली.

वादसभेचे चिटणीस श्री. हेमंत साने यांनी अहवालवाचन केले. प्राचार्य मालेगावकर यांनी सन्मान्य पाहुण्यांचा परिचय करून दिला. वादसभेचे कार्याध्यक्ष प्रा. द. वि. कुलकर्णी यांनी पाहुण्यांचे आभार मानले.


### स्वातंत्र्य दिन

दि. १५ ऑगस्ट १९६५ रोजी सकाळी ७–३० वाजता महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण व ध्वजवंदन झाले. उपस्थितांनी स्वातंत्र्यरक्षणाची प्रतिज्ञा घेतली. प्राचार्य मालेगावकर यांनी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक यांना उद्देशून



महाराष्ट्रीय कलोपासक मंडळाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन नाट्यस्पर्धेतील
अभिनयनैपुण्य – प्रशस्तिपत्रकाचे मानकरी


**कु. शरयू गोगटे, श्री. धनंजय गोळे, कु. जया जोगळेकर**



दि. २४ ऑगस्ट १९६५ रोजी अमेरिकन विद्यार्थ्यांनी दिलेल्या भेटीचे प्रसंगी

बसलेले : कु. **जयश्री गुणे**, प्रा. सौ. **कुमुद पोरे**, श्री. **आर्थर सस्किन**, कु. **एलिझाबेथ झिकरशेल**, श्री. **ब्रूस बोमन**, श्री. **जोनाथन रीस**, कु. **विमल परांजपे.**

उभे : श्री. **हेमंत साने**, वादसभा चिटणीस; श्री. **जयंत देव**, श्री. **सुरेश महाजन.**



लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीच्या दिवशी वादसभेच्या उद्घाटनप्रसंगी
मुख्य पाहुणे प्रा. **गं. बा. सरदार** भाषण करीत असताना



स्वातंत्र्यदिनी क्रीडांगणावर ध्वजारोहणानंतर प्राचार्य **मालेगावकर** आणि उपस्थित व्यक्ती
स्वातंत्र्यरक्षणाची प्रतिज्ञा घेत असताना

भाषण केले. आपल्या भाषणात प्राचार्यांनी देशापुढील परकीय आक्रमणाच्या गंभीर समस्येची सर्वांना जाणीव करून दिली आणि स्वातंत्र्यरक्षणाच्या प्रयत्नाला कधी नव्हते एवढे महत्त्व कसे आले आहे ते स्पष्ट केले. मातृभूमीच्या रक्षणासाठी विद्यार्थ्यांनी बलसंपन्न, चारित्र्य-संपन्न, ज्ञानसंपन्न झाले पाहिजे; देशसेवेचे असिधाराव्रत स्वातंत्र्यकाळाइतकेच स्वातंत्र्योत्तर काळातही नितांत आवश्यक असून आपल्या विद्यार्थ्यांनी या व्रताची अखंड उपासना करण्यात कृतार्थता मानावी असे कळकळीचे आवाहन त्यांनी केले.

## हुतात्मा वसंत दाते स्मृतिदिन

वादसभेतर्फे दि. १० सप्टेंबर, १९६५ रोजी हुतात्मा वसंत दाते स्मृतिदिन साजरा करण्यात आला. फर्गसन महाविद्यालयातील इंग्रजीचे प्राध्यापक व प्रसिद्ध युवकनेते **प्रा. ग. प्र. प्रधान** यांचे मुख्य पाहुणे म्हणून भाषण झाले. आपल्या भाषणात प्रा. प्रधान यांनी भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील बेचाळीसच्या पर्वाचे स्वत: अनुभवलेले चित्र रेखाटले आणि हुतात्मा दाते यांच्या वीरगाथेतून मिळणारा संदेश आजही कसा प्रेरक ठरेल हे सांगितले. मुष्टियुद्धात प्रावीण्य मिळविणारे श्री. **टी. एन्. बानखेले** व प्रथमवर्ष साहित्यवर्गात गणित विषयात सर्वप्रथम आलेल्या कु. **सुशीला कुलकर्णी** यांना पाहुण्यांच्या हस्ते **हुतात्मा दाते पारितोषिक व शिष्यवृत्ती** देण्यात आली.

## शस्त्रपूजन समारंभ

विजयादशमीच्या दिवशी दि. ४ ऑक्टोबर, १९६५ रोजी एन्. सी. सी. च्या वतीने शस्त्रपूजन समारंभ आयोजित करण्यात आला होता. पुणे विद्यापीठातील युद्धशास्त्रविषयाचे प्रमुख मेजर जनरल **य. श्री. परांजपे** हे समारंभाचे मुख्य पाहुणे होते.

छात्रसैनिकांना उद्देशून भाषण करताना मेजर जनरल परांजपे म्हणाले, " सध्याच्या युद्धात आपल्याला विजय मिळालेला असला तरी गाफील राहून चालणार नाही. युद्धाचे राजकीय उद्दिष्ट अद्यापि साध्य झालेले नाही. शत्रूचा बीमोड झालेला नाही किंवा तो नामोहरमही झालेला नाही. दीर्घकालीन युद्धासाठी आपण आपली परिणामकारक मानसिक व सामाजिक तयारी केली पाहिजे. युद्धास आनुषंगिक असलेल्या सर्व क्षेत्रांत आपण अभ्यास व संशोधन करून युद्धामुळे येणारी जबाबदारी पार पाडण्यास सिद्ध व समर्थ झाले पाहिजे."

मेजर **रेगे** यांनी प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत केले व मेजर **गायधनी** यांनी आभार मानले. या समारंभाच्या शेवटी तीन इंच उखळी तोफांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

## कुलपतींना मानवंदना

पुणे विद्यापीठाच्या सप्टेंबरमध्ये झालेल्या पदवीदान-समारंभप्रसंगी कुलपतींना एन्. सी. सी. च्या वतीने मानवंदना देण्याचा मान आपल्या महाविद्यालयातील एन्. सी. सी. च्या विभागास मिळाला. पन्नास कॅडेट्सनी या मानवंदनेच्या परेडमध्ये भाग घेतला होता. परेडचे नेतृत्व आपल्या महाविद्यालयातील एन्. सी. सी. मधील कॅप्टन प्रा. **द. वि. कुलकर्णी** यांच्याकडे होते.

## नव्या रूपात 'एस्. पी. रिव्ह्यू'

गेल्या वर्षी प्रा. **ल. प्र. दाते** यांच्या मार्गदर्शनाने सुरू झालेल्या 'एस्. पी. रिव्ह्यू' या इंग्रजी पाक्षिकाने यंदा दुसऱ्या वर्षात पदार्पण केले. एस्. पी. रिव्ह्यूने यावर्षी नवे रूप धारण केले आहे. इंग्रजीबरोबरच मराठी भाषेतूनही एस्. पी. रिव्ह्यूने साहित्य प्रसिद्ध करण्याचे यावर्षी ठरविले. त्यामुळे एस्. पी. रिव्ह्यू विद्यार्थीप्रिय होऊ लागले आहे. त्याचा वाचक वर्ग वाढू लागला आहे. वार्तासंकलन, वृत्तनिवेदन इ. पासून तो संपादकीय स्फुटलेखनापर्यंतची सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांनी उचललेली आहे. महाविद्यालयीन उपक्रम व कार्यक्रम याबद्दलच्या प्रतिक्रिया विद्यार्थीमित्र मोकळेपणाने, खुल्या दिलाने एस्. पी. रिव्ह्यूत प्रकट करीत आहेत. प्रा. **श्री. श्या. सवदी** यांच्या मार्गदर्शनाखाली या पाक्षिकाचे अंक नियमितपणे प्रकाशित होत आहेत. 'एस्. पी. रिव्ह्यू' हे खऱ्या अर्थाने **विद्यार्थ्यांचे मुखपत्र** होण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची, सततोद्योगाची गरज आहे. निस्पृह परंतु संयमी, रोचक परंतु विवेकी पत्रलेखनाचे शिक्षण विद्यार्थ्यांना या पाक्षिकाद्वारे मिळत राहील अशी आशा आहे.

## अभिनय नैपुण्य

महाराष्ट्रीय कलोपासक, पुणे या संस्थेने ऑगस्टमध्ये 'पुरुषोत्तम करंडका'साठी आयोजित केलेल्या आंतर-

महाविद्यालयीन नाट्यस्पर्धेत आपल्या नाट्यमंडळाने प्रा. **भुपटकर** लिखित '**शूरां मी वंदिले**' व प्रा. **शं. रा. देशपांडे** लिखित 'पितृदेवोभव' या दोन एकांकिका सादर केल्या. श्री. **धनंजय गोळे**, कु. **शरयू गोगटे** व कु. **जया जोगळेकर** यांना वैयक्तिक अभिनय-नैपुण्याबद्दल प्रशस्तिपत्रके मिळाली. या एकांकिकांचे दिग्दर्शन श्री. **श्रीराम खरे** यांनी केले होते. नाट्य-मंडळातील संयोजकांचे व यशस्वी कलाकारांचे हार्दिक अभिनंदन !

### वक्तृत्व साधना

सॉक्रेटिक असोसिएशन, फर्गसन् महाविद्यालय, पुणे या संघटनेने आपल्या सुवर्णमहोत्सवाच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून दि. २५ सप्टेंबर १९६५ रोजी पुण्यातील विद्यार्थ्यांचा एक **परिसंवाद** आयोजित केला होता. परिसंवादाचा विषय होता : 'पंचशील तत्त्वज्ञान व्यवहार्य आहे काय ?' या परिसंवादात आपल्या महाविद्यालयातील श्री. **वि. ह. भालेराव** व श्री. **विजयकुमार कारेकर** यांनी भाग घेतला होता. श्री. **वि. ह. भालेराव** यांना पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. वक्तृत्वपटू श्री. भालेराव यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

कै. प्राचार्य रा. प. **सबनीस वक्तृत्वस्पर्धेत** कु. **अंजली फडके** व श्री. **अशोक निरफराके** यांनी अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाची पारितोषिके मिळविली. अभिनंदन. कु. अंजली फडके यांनी आपल्या पारितोषिकाची रक्कम संरक्षणनिधीसाठी दिली. धन्यवाद.

### गरीब विद्यार्थी निधीस देणगी

डॉ. पु. ग. **सहस्रबुद्धे सत्कार समितीने** दि. ४ ऑगस्ट १९६५ रोजी आपल्या महाविद्यालयाच्या गरीब विद्यार्थी निधीस **तीनशे रुपयांची देणगी** दिली. समितीच्या आर्थिक व्यवहारातून उरलेली शिल्लक गरीब विद्यार्थी निधीस देण्याचा जो निर्णय समितीने केला त्याबद्दल समितीस धन्यवाद !

### डॉ. वाटवे यांची ग्रंथरूप देणगी

आपल्या महाविद्यालयातील संस्कृताचे निवृत्त प्राध्यापक डॉ. **के. ना. वाटवे** यांनी आपल्या वैयक्तिक संग्रहातील एकेचाळीस ग्रंथ ग्रंथालयाला देणगी म्हणून दिले आहेत. संस्कृत विषयाशी संबंधित असे हे सर्व मौलिक ग्रंथ महत्त्वाचे आहेत. डॉ. वाटवे यांच्या या स्नेहपूर्ण देणगीबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

### श्री. श्रोत्रीय यांची ग्रंथरूप देणगी

आपले माजी विद्यार्थी व सोलापूरच्या ह. दे. प्रशाळेत बरीच वर्षे इंग्रजी भाषेचे उत्तम अध्यापन केलेले **कै. व्ही. जी. श्रोत्रीय** यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव श्री. एम्. व्ही. श्रोत्रीय यांनी आपल्या वडिलांच्या संग्रहातील एकशे सत्तावीस दुर्मिळ ग्रंथ आपल्या ग्रंथालयास देणगी म्हणून दिले आहेत. हे सर्व ग्रंथ इंग्रजी साहित्यातील आहेत. या उदार देणगीबद्दल आम्ही श्री. एम्. व्ही. श्रोत्रीय यांचे ऋणी आहेत.

### म. म. पोतदार अभीष्टचिंतन

आपल्या महाविद्यालयातील मराठीचे निवृत्त प्राध्यापक व शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष महामहोपाध्याय द. वा. पोतदार यांनी दि. १७ ऑगस्ट १९६५ रोजी शहात्तराव्या वर्षात पदार्पण केले. या निमित्ताने आम्ही म. म. **द. वा. पोतदार** यांचे आदरपूर्वक अभीष्टचिंतन करीत आहोत. म. म. पोतदार यांना उदंड आयुष्य व उत्तम आरोग्य लाभावे ही प्रभुचरणी प्रार्थना. मराठी भाषा, इतिहास, संस्कृती, शिक्षण, सार्वजनिक जीवन या सर्वांवर प्रा. द. वा. पोतदार यांनी आपल्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविला आहे. आपल्या सध्याच्या वाटचालीत त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनाने प्रगतीचे पुढले टप्पे अधिक स्पष्ट दिसू लागतील यात संदेह नाही.

## पाहुण्यांच्या भेटी

### डॉ. जयंत नारळीकर

विश्वविख्यात संशोधक डॉ. **जयंत नारळीकर** यांनी दि. २७ मार्च १९६५ रोजी आपल्या महाविद्यालयाला भेट दिली. त्यांच्या स्वागतासाठी ग्रंथालयात चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता. डॉ. जयंतरावांनी आपल्या मितभाषी, नम्र व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाने सर्व वातावरण लीलया प्रभावित केले. महाविद्यालयाच्या हिरवळीवर डॉ. न. वि. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेने डॉ. नारळीकर यांचे '**द लाइटर साईड ऑफ ग्रॅव्हिटी**' या विषयावर भाषण झाले. पदार्थविज्ञानातील

प्रमेयांचे डॉ. नारळीकरांनी केलेले सुगम व सुरस विवेचन ऐकण्यासाठी पाच हजार श्रोते उपस्थित होते. प्राचार्य मालेगावकर यांनी आभारप्रदर्शन करताना डॉ. नारळीकर यांच्या विनम्र वृत्तीचा आवर्जून उल्लेख केला आणि त्यांच्यासारख्या मौलिक संशोधन करणाऱ्या पदार्थवैज्ञानिकाच्या या भेटीमुळे असंख्य विद्यार्थ्यांना स्वतंत्र अभ्यासाची प्रेरणा मिळेल अशी आशा व्यक्त केली. भव्यतेचे दर्शन सर्वांसच उन्नत करते!

पद्मश्री डॉ. **बी. एस्. केशवन्**, डायरेक्टर, इंडियन नॅशनल सायंटिफिक डॉक्युमेंटेशन सेंटर, नवी दिल्ली यांचे येथील ग्रंथालयसंघाच्या विद्यमाने दि. २३ रोजी आपल्या ग्रंथालयात 'ग्रंथपालनव्यवसाय' या विषयावर व्याख्यान झाले. त्यावेळी आपल्या ग्रंथालयाच्या व्यवस्थेबद्दल त्यांनी प्रकटपणे समाधान व्यक्त केले.

अमेरिकेतील मिनेसोटा विद्यापीठातील रसायनशास्त्राचे प्राध्यापक डॉ. **रॉबर्ट ब्रेस्टेड** यांनी दि. १२ जुलै १९६५ रोजी आपल्या महाविद्यालयास भेट दिली. 'Geometry of Molecules and Chemical Bonding' या विषयावर त्यांनी सप्रयोग व सुगम व्याख्यान दिले. व्याख्यानानंतर महाविद्यालयातील अधिकाऱ्यांशी त्यांनी शैक्षणिक प्रश्नांविषयी चर्चा केली. विद्यापीठ अनुदान मंडळाने पुणे विद्यापीठात आयोजित केलेल्या रसायनविषयक वासंतिक शिबिरासाठी डॉ. ब्रेस्टेड हे सल्लागार म्हणून आले होते.

दि. २३ जुलै १९६५ रोजी आपले निवृत्त प्राचार्य **सोनोपंत दांडेकर** यांच्या हस्ते तत्त्वज्ञानमंडळाच्या चालू वर्षीच्या कार्याचे उद्घाटन झाले. त्याप्रसंगी अमेरिकेहून यशस्वी होऊन परत आलेल्या डॉ. **लीला गोळे** यांचे स्वागत करण्यात आले. प्राचार्य **श्री. गो. हुल्याळकर**, प्रा. **कु. ना. पिले** यांनी याप्रसंगी डॉ. गोळे यांच्याविषयी गौरवपर भाषणे केली.

दि. २७ जुलै १९६५ रोजी संस्कृत मंडल व संस्कृत संघटना यांचे उद्घाटन आपले माजी विद्यार्थी प्रा. **अशोक अकलूजकर** यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थान प्राचार्य **न. गो. सुरु** यांनी विभूषित केले होते. प्रा. अकलूजकरांनी त्यावेळी 'वाल्मीकि रामायण' या विषयावर व्याख्यान दिले.

यंदा हिंदी वर्गसंघटनेचे उद्घाटन '**प्रेमचंद जयंती**'ने साजरे करण्यात आले. हा कार्यक्रम दि. ३० जुलै १९६५ रोजी पुणे विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागातील **डॉ. मांडे** यांच्या अध्यक्षतेने झाला. या कार्यक्रमाची आकाशवाणी वार्ता प्रसारित करण्यात आली होती.

नियोजन चर्चा मंडळाचे उद्घाटन कागदनिर्मिती व्यवसायातील कल्पक व साहसी संयोजक श्री. **मो. स. पारखे** यांच्या हस्ते दि. ११ ऑगस्ट १९६५ रोजी झाले. भारतातील उद्योगपतींना उद्योगाची उभारणी व संयोजन यामध्ये कोणत्या अडचणींशी मुकाबला करावा लागतो याचे त्यांनी आपल्या भाषणात सुंदर विवेचन केले.

## बहिर्गामी युवक मंडळ

तरुणांमध्ये गिर्यारोहण, समुद्रपर्यटन, जंगल पार करणे यासारख्या विविध उपक्रमांद्वारे साहस व धैर्य या गुणांचे संवर्धन करण्याच्या हेतूने पुण्यामध्ये '**बहिर्गामी युवक मंडळ**' (Outward Bound Pioneers' Club) नावाची संस्था नुकतीच स्थापना झाली असून ती काम करू लागली आहे. या संस्थेच्या कामात आपल्या महाविद्यालयातील प्रा. **दा. रा. गोळे** व मे-जूनमध्ये गिर्यारोहणाच्या कार्यक्रमात सहभागी झालेल्या कु. **ज्योती मोडक**, द्वि. व. साहित्य विशेष लक्ष घालीत आहेत. ह्या मंडळाचे कार्य महत्त्वाचे असून आपल्या विद्यार्थ्यांनी त्याच्या विविध उपक्रमांत अवश्य सहभागी व्हावे.

## कुलगुरु डॉ. गाडगीळ यांचे आवाहन

एक सप्टेंबर पासष्ट रोजी पाकिस्तानने भारतावर सशस्त्र आक्रमण केल्यानंतर स्वसंरक्षणासाठी भारताने लष्करी कारवाईस प्रारंभ केला. देशातील वातावरण एकदम बदलले. युद्धमान् परिस्थितीत लष्करी प्रयत्नांस पाठिंबा देण्यासाठी नागरी संरक्षण आघाडी बळकट करण्याचे वारे देशात जोराने वाहू लागले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये संरक्षणविषयक जागृती घडविण्यासाठी व विद्याथप्रयत्नांना प्रेरणा देण्यासाठी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. **न. वि. गाडगीळ** यांनी सप्टेंबर महिन्यात विविध महाविद्यालयांना भेटी दिल्या.

दि. ११ सप्टेंबर १९६५ रोजी डॉ. काकासाहेब गाडगीळ यांनी आपल्या महाविद्यालयास भेट दिली. देवी रमाबाई सभागृहात त्यांचे विद्यार्थ्यांना उद्देशून भाषण झाले. आपल्या भाषणात त्यानी काश्मीर प्रश्नाची ऐति-

हासिक पार्श्वभूमी सांगून भारत-पाक संबंधाचा आढावा घेतला. 'शांततामय सहजीवन, धर्मातीत लोकशाही जीवननिष्ठा, तटस्थतेचे आंतरराष्ट्रीय राजनैतिक धोरण या दिशेने आपली पावले पडत असताना पाकिस्तानने शेजारधर्म सोडला, धर्मांध लष्करी हुकूमशाहीने आपल्या जनतेची गांजणूक केली. पाकिस्तानशी लढा हा भूमीच्या तुकड्यासाठी नसून तो तत्त्वांसाठी आहे. आशियातील स्वातंत्र्याच्या दीपाचे रक्षण करण्यासाठी आहे. म्हणून विद्यार्थ्यांनी भांबावून न जाता लांब पल्ल्याचा विचार करून आपले कर्तव्य करण्यास सिद्ध झाले पाहिजे.' असे कळकळीने आवाहन डॉ. गाडगीळ यांनी विद्यार्थीमित्रांना केले.

## संरक्षण विषयक प्रयत्न

दि. १७ सप्टेंबर १९६५ रोजी कुलगुरु डॉ. काकासाहेब गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली पुण्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची एक प्रचंड **प्रतिज्ञा मिरवणूक** निघाली होती. या मिरवणुकीत आपल्या महाविद्यालयातील बऱ्याच विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संरक्षणविषयक प्रेरणा व कार्यशक्ती विधायक रीतीने संघटित करण्याच्या उद्देशाने प्राचार्य मालेगावकर यांनी महाविद्यालयातील **नागरी संरक्षण योजना** कार्यान्वित करण्यासाठी पुढीलप्रमाणे पाच समित्या स्थापना केल्या : **रक्तदान समिती, प्रथमोपचार समिती, संरक्षणनिधी समिती, समाजकल्याण समिती** आणि **संरक्षण अभ्यास-मंडळ.** या समित्यांवर अध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांची नियुक्ती करण्यात आली. या समित्यांच्या संयोजनांसाठी उपप्राचार्य **रं. ना. गायधनी** यांच्या मार्गदर्शनाखाली जनरल सेक्रेटरी या नात्याने श्री. **राजेश सासवडकर**, श्री. **शिवाजी जगताप** व कु. **लीला नानल** यांनी काम करावयाचे असे ठरविण्यात आले.

वर निर्दिष्ट केलेल्या समित्यांच्या प्रत्यक्ष कार्यास आरंभ झालेला आहे. संरक्षण अभ्यास मंडळाने सध्याच्या प्रश्नाशी संबंधित अशा राजनैतिक विषयांचा अभ्यास सुरू केला आहे. आघाडीवरील जवानांसाठी भेटीदाखल वस्तू गोळा करण्याचे काम निधीसमितीतर्फे सुरू झाले. गोळा झालेल्या वस्तूंचा पहिला हप्ता सौ. **अनुताई लिमये** यांच्यामार्फत जवानांकडे पाठविण्यात आला. याकामी ज्यांचे सहकार्य झाले त्यांना धन्यवाद !

दि. १३ ऑक्टोबर, १९६५ पासून आपल्या महाविद्यालयात नागरी संरक्षण संघटनेच्या वतीने प्रथमोपचार शिक्षणाचा वर्ग सुरू करण्यात आला. या वर्गात आपल्या महाविद्यालयाच्या **ऐंशी विद्यार्थ्यांनी** शिक्षण घेतले. या वर्गाची व्यवस्था श्री. **प्रथमवीर** व श्री. **अत्रे** यांनी उत्तम प्रकारे ठेवली होती. त्यांना धन्यवाद.

## माजी विद्यार्थी गौरव

आपले असंख्य माजी विद्यार्थी निरनिराळ्या क्षेत्रांत कर्तृत्व गाजवीत आहेत. यशस्वी होत आहेत. आपल्या विद्यामातेची प्रतिष्ठा वाढवीत आहेत. माजी विद्यार्थ्यांच्या यशगौरवाची जी माहिती हाती आली ती सादर करताना आनंद होत आहे.

### डॉ. अ. ग. जावडेकर यांना डी. लिट्.

डॉ. **अ. ग. जावडेकर** आपल्या महाविद्यालयातून १९४० साली तत्त्वज्ञान विषय घेऊन बी. ए. झाले. एम्. ए. झाल्यानंतर काही वर्षे आपल्या महाविद्यालयात तत्त्वज्ञानाचे त्यांनी अध्यापन केले. नंतर प्रा. न. ग. दामले यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून त्यांनी मुंबई विद्यापीठाची पीएच्. डी. मिळविली. सध्या ते म. स. बडोदे विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असून यंदा अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषदेचे कार्यवाह झाले आहेत. तत्त्वज्ञानातील अनेक विषयांवर आजवर त्यांनी निबंधलेखन केले आहे. **'एक्झिऑलॉजिक्स'** (मूल्यज्ञानमीमांसा) या विषयावरील त्यांच्या संशोधनास मान्यता देऊन मुंबई विद्यापीठाने त्यांना **डी. लिट्.** ही पदवी बहाल केली आहे. डॉ. जावडेकर यांचा मुंबई विद्यापीठाने हा जो बहुमान केला आहे त्याबद्दल आम्हाला संतोष वाटतो. डॉ. जावडेकर यांची आपल्या क्षेत्रात अशीच प्रगती होत राहो ही शुभेच्छा !

### प्रा. अकलूजकर अमेरिकेस

प्रा. **अशोक अकलूजकर** हे आपल्या महाविद्यालयातून १९६२ साली संस्कृत हा विषय घेऊन प्रथम श्रेणीत बी. ए. झाले. १९६४ साली एम्. ए. च्या परीक्षेतही त्यांनी प्रथमश्रेणी संपादन केली. गेल्या शैक्षणिक वर्षी त्यांनी फर्गसन् महाविद्यालयात संस्कृताचे अध्यापन केले. आता त्यांना अमेरिकेतील हार्वर्ड येंचिंग

इन्स्टिटयूटची फेलोशिप मिळाली असून ते जगप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापीठाच्या ग्रॅज्यूएट स्कूल ऑफ आर्ट मधील संस्कृत व भारतीय विद्याविभागात पीएच्. डी. साठी संशोधन करणार आहेत. त्यांचा प्रमुख विषय संस्कृत राहणार असून भाषाशास्त्र व युरोपीय भाषा हे संलग्न विषय राहणार आहेत. प्रा. अक्लूजकर यांच्या अमेरिकेतील हार्वर्डमधील संशोधनात त्यांना उज्ज्वल यश मिळावे हीच शुभेच्छा !

### कु. पुष्पा आगाशे अमेरिकेस

आपल्या माजी विद्यार्थिनी कु. **पुष्पा पुरुषोत्तम आगाशे** १९६२ साली गणित विषय घेऊन बी. ए. झाल्या. एम्. ए. लाही त्यांनी गणिताचा अभ्यास पुढे चालू ठेवला. त्यावेळी त्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाली होती. सप्टेंबर १९६५ मध्ये त्या अमेरिकेतील पिटस्‌बर्ग येथे रवाना झाल्या. अमेरिकेतील सुप्रसिद्ध कार्नेगी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीतर्फे गणिताचा पीएच्. डी. साठी अभ्यास करण्यासाठी त्यांना शिष्यवृत्ती मिळाली आहे. कु. पुष्पा आगाशे यांना आपल्या अभ्यासात सुयश लाभावे ही शुभकामना !

### एम्. ए. प्रथम श्रेणीचे मानकरी

कु. **प्रमिला लाटकर** ( बी. ए. प्रथमश्रेणी १९६३ ) यांनी एम्. ए. च्या परीक्षेत गणित विषय घेऊन प्रथमश्रेणीत प्रथमक्रमांक मिळविला. कु. **सौदामिनी बहुलीकर** ( बी. ए. प्रथमश्रेणी १९६३ ) यांनी संस्कृत विषय घेऊन एम्. ए. परीक्षेत प्रथमश्रेणी मिळविली. या यशस्वी विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनन्दन !

### एम्. एस्सी. प्रथम श्रेणीचे मानकरी

१९६३ साली आपल्या महाविद्यालयातून उत्तम रीतीने बी. एस्सी. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या पुढील विद्यार्थ्यांनी १९६५ च्या एम्. एस्सी. परीक्षेत प्रथमश्रेणी मिळविली आहे : श्री. **ए. एस्. भावे**; श्री. **एस्. व्ही. जोशी** ; श्री. **जी. एन्. नातू** ; श्री. **व्ही. वाय्. जोशी.** ; श्री. **डी. ए. भागवत** ; श्री. **आर्. जी. महाजन.** सर्वांचे मनःपूर्वक अभिनन्दन !

### डॉ. मंदाकिनी मराठे यांना पीएच्. डी.

जर्मन भाषेच्या व्यासंगासाठी सुमारे पाच वर्षे व्हिएन्ना, ऑस्ट्रिया येथे राहिलेल्या आपल्या माजी विद्यार्थिनी डॉ. **मंदाकिनी द. मराठे** भारतात नुकत्याच परतल्या आहेत. भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळवून मंदाकिनी मराठे यांनी व्हिएन्ना विद्यापीठात डॉ. रूप्रिक् यांच्या मार्गदर्शनाखाली जर्मन साहित्यातील पीएच. डी. साठी संशोधन करून डॉक्टरेट मिळविली. डॉ. मंदाकिनी मराठे यांनी मिळविलेल्या या उज्ज्वल यशाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन !

### डॉ. त्र्यं. रं. इंगळे अमेरिकेहून परत

आपले नामवंत माजी विद्यार्थी व रसायन विभागातील माजी प्राध्यापक डॉ. **त्र्यं. रं. इंगळे** सध्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेत आहेत. गेली तीन वर्षे ते अमेरिकेत होते. पडर्यू विद्यापीठात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्राध्यापक डॉ. व्हिसलर यांच्या संशोधनशाळेत त्यांनी कार्बोहायड्रेटवर विशेष संशोधन केले. डॉ. इंगळे भारतास नुकतेच परत आले आहेत. त्यांच्या कार्यात उत्तरोत्तर प्रगती व्हावी ही शुभेच्छा !

### अभिरूप लोकसभा

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे **अभिरूप लोकसभा पारितोषिका**साठी महाविद्यालयाच्या दुसऱ्या ज्ञानसत्रात एक स्पर्धा घेण्यात येईल. या स्पर्धेसाठी यावर्षी ' **आता भारताने राष्ट्रकुलातून बाहेर पडावे** ' अशा आशयाचा ठराव चर्चेसाठी ठेवण्यात येणार आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या दोन्ही पक्षांतील एक एक अशा दोन उत्कृष्ट वक्त्यांस प्रत्येकी रुपये चाळीसचे पारितोषिक देण्यात येईल. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी हिरीरीने व उत्साहाने या स्पर्धेत भाग घ्यावा, पारितोषिके मिळविण्याचा प्रयत्न करावा आणि आपल्या महाविद्यालयात नव्यानेच सुरू होत असलेला **अभिरूप लोकसभे**चा कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहन करून ही महाविद्यालयीन वार्ता संपवीत आहोत.

**श्री. र. कावळे**
संपादक

Phone : 24204 Est. 1918

## Modern Bakery

For the Best Bakery Products.

458 Nana Peth, Poona 2.

## Sadhana

SHORTHAND &
TYPEWRITING
INSTITUTE

Deccan Gymkhana, Poona 4.

( *RECOGNISED BY GOVT.* )

We Teach English & Marathi
Typewriting under
expert guidance.
All sort of Typing and
Cyclostyling work
will be executed promptly.

## Ramesh Furniture Mart

## रमेश फर्निचर मार्ट

प्रोप्रा. : पुरुषोत्तम गजाननशेठ व्हावळ

- नवीन व जुने फर्निचर
- विकत घेणार व विकणार

आणि

- स्प्रिंग कॉट्स् रिपेअर करणार

नवीन फर्निचरचा भरपूर स्टॉक
मिळण्याचे एकमेव ठिकाण

— रमेश फर्निचर मार्ट

४१७ नाना पेठ, क्वार्टर गेटजवळ, पुणे २.
सेल टॅक्स नं. २४ एफ १६६

*Give us once chance*

Dear Students
Remember ...

## S. S. & Sons
## Footwear

For Durable & Latest
Type of Shoes & Chappals

( 1 ) Budhwar Peth, POONA 2
( 2 ) Deccan Gymkhana, POONA 4

॥ श्री ॥

फोन : { पुणे : ५६४२८
श्रीपूर : पी. सी. ओ.

तारेचा पत्ता : श्री { पुणे
श्रीपूर

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस : १८० सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे २
फॅक्टरी : श्रीपूर, व्हाया अकलूज, जि. सोलापूर

## शुभ्र दाणेदार साखरेचे
## आणि
## रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरिटचे उत्पादक

**बृहन्महाराष्ट्रातील मध्यमवर्गाने गुंतविलेल्या भांडवलावर यशस्वी रीतीने चालू असलेला हा साखर कारखाना मध्यमवर्गीयांचे भूषण होय !**

—: संचालक मंडळ :—

श्री. शं. ल. लिमये, B. Sc., LL. B., वकील, अध्यक्ष

श्री. भ. ग. भादुले, B. Sc., LL. B. वकील
श्री. रामराव मा. देशमुख, M. A., LL. B. (Cant.) Bar at Law
श्री. वि. कृ. साठे, B. A. (टिळक) माजी पुरवठा मंत्री, मुंबई राज्य

श्री. ग. ह. सबनीस,
श्री. श्री. र. केसकर, (ॲडव्होकेट)
श्री. ज. चं. आगाशे,
श्री. गो. न. जोशी, B. Sc.
श्री. रा. ह. केळकर, B. Com., F. C. A.

श्री. गो. श्री. वाळिंबे, B. Com.
ऑफिशिएटिंग मॅनेजर

*For*

**Personality & Perfectness**

*Visit*

**Span**

*It is a popular house of all Fashion Loving Collegians*

For

Woollen, Terylene & Tery Cotton etc

with

*Efficient & Prompt Tailoring Service*

**SPAN**

*Laxmi Road, Poona 2*

Phone : 56030 Grams : RAMSEVA

**THE RAM AGENCY**

**458/2 Sadashiv Peth, Tilak Road, Poona 9.**

◆

-: DISTRIBUTORS :-

Lambretta Scooters, Scooterettes and 3--Wheelers, Standard Batteries, DODGE Trucks.

*Servicing a Speciality.*

◆

● विविध भारती–

● क्रिकेट मॅच–

● बातम्या–

सर्व भारतीय स्टेशने येणारा

रु. १५०/– [ स्थानीय कर वेगळे ]

ट्रान्झीस्टर खरेदी करा

●

**अनंत रेडिओ इलेक्ट्रिकल्स**

गोखले हॉलजवळ, लक्ष्मीरोड, पुणे २

●

सर्व प्रकारचे ट्रान्झीस्टर किटचे स्पेशालिस्ट

*With best compliments from :*



*A. L. Mijar*

The Most Popular Restaurant in POONA

●

**ANAND VILAS**

9, Budhwar Peth, POONA 2

●

*for*

*Delicious, fresh & hot Dishes*

सरकारमान्य —

प्रोफिशियण्ट शॉर्टहॅण्ड अॅण्ड टाईपरायटिंग इन्स्टिटयूट

६८६ बुधवार पेठ, पुणे २

पुण्यातील अल्पावधीत नावाजलेली संस्था !
अॅडहॉक बोर्डाने तयार केलेल्या पद्धतीवर
मराठी लघुलेखनाचा स्वतंत्र विभाग !!
त्वरित नावे नोंदवा !!!

य. दा. मोंढे
— प्राचार्य

फोन : ५७३७६

Whenever you think of
Books

VISIT
MODERN
BOOK
DEPOT

Booksellers and Publishers
Bajirao Rood, Opp. 'Prabhat Talkies'
POONA 2.

Telephone : 54456

* सर्व प्रकारची घड्याळे *
विकत व दुरुस्त करून मिळण्याचे
खात्रीलायक एकमेव ठिकाण —

वसंत वॉच कंपनी

शनिपार, कॉर्पोरेशन बिल्डिंग,
पुणे २.

COLOUR
HALF-TONE
OR
LINE

Blocks, Stereos and Matrices
of High Quality

New Addition ★ Printed Circuits

KALA BHUVAN

66 Sadashiv Peth, Poona 2.

Phone : 55118

☎ : 57391
[PBX with 3 Lines]

*For*

- *Various Types of Wedding & Invitation Cards*
- *Office Stationery*
- *Account Books*
- *Quality Printing*

★ *Patwa Bros* ★

634 Budhwar Peth,
156 Budhwar Peth, POONA 2



*Step In*

NEW POONA BOOK DEPOT

APPA BALWANT CHOWK,
POONA 2

*For*

*All College Books*





## Poona University Employment Bureau

The University of Poona maintains on its campus an employment bureau at which graduates seeking posts are invited to register their names immediately after declaration of their degree examination results. A registration fee of Rs. 5/- is charged. While no guarantee of employment can be given, every effort will be made on a registree's behalf. Candidates wishing to register their names should remit to the Registrar direct a sum of Rs. 5/- and send the receipt to the Secretary, University Employment Bureau within one month of declaration of their degree examination results. Applicants should be below 28 years of age.

खास एस्. पी. कॉलेजच्या विद्यार्थ्यांची सोय !

भरपूर पुस्तकसंग्रह, नवनवीन पुस्तकांची विपुल उपलब्धता व आदर्श ग्रंथालयीन व्यवस्था
यामुळे विद्यार्थ्यांचे ' आधुनिक शैक्षणिक तीर्थक्षेत्र ' ठरलेले ...

★ कलाभारती ग्रंथालय ★

' उद्यान ' कार्यालयाच्या भव्य आलिशान इमारतीमधील नवीन शाखा
दसऱ्याच्या सुमुहूर्तावर सुरू झाली आहे ! ! !

००० संबंधित अभ्यासक्रमांची क्रमिक पुस्तके, संदर्भासाठी परदेशीय लेखकांचे प्रचंड ग्रंथभांडार, शैक्षणिक मासिके, जुने प्रश्नसंच अभ्यासण्यासाठी घरी मिळण्याची सोय ! ०००

—: उपलब्ध अभ्यासक्रम :—

* एस्. एस्. सी. * प्री-डिग्री * बी. ए. * बी. एस्सी. * बी. कॉम्. * इंजिनियरिंग-डिग्री / डिप्लोमा * एस्. टी. सी. * टी. डी. * ट्रेनिंग * जी. सी. डी. * त्रिभुवन-इंटर

दुसऱ्या सहामाहीची सभासद नोंद सुरू झाली ! !

—: तुम्हींही आजच सभासद व्हा ! :—

[ मुख्य कार्यालय : भाऊमहाराज बोळ, तुळशीबागेसमोर, पुणे २ : शाखा : डेक्कन जिमखाना, पुणे ४ ]

## आमच्या हितचिंतकांस विनंती

★ शिक्षण प्रसारक मंडळी गेली ऐंशी वर्षे पश्चिम भारताच्या खासगी शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करीत आहे. शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या विविध संस्थांस देणगी दिल्यास अशा देणगीवर प्राप्तीकर माफ आहे. प्राप्तीकर सेक्शन क्र. १५ बी अन्वये घ्यावे लागते ते सर्टिफिकेट शिक्षण प्रसारक मंडळी व तिच्या संस्थांकरिता मिळविण्यात आले आहे. शिक्षण प्रसारक मंडळीच्या हितचिंतकांनी उदार मनाने देणग्या देऊन तिच्या शैक्षणिक कार्यात सक्रिय सहभागी व्हावे ही विनंती. संस्थेस देणगी देणाऱ्यांना प्राप्तीकर माफीचे सर्टिफिकेट देण्यात येते. ★

* सूटकेसेस् * होल्डॉल्स

व

* विविध प्रकारच्या * आधुनिक बॅग्जकरिता

● ●

★ दिनशा आणि कंपनी ★

कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणे २

SECO

# पोस्ट ऑफिस बचत बँक

# ४ टक्के करमुक्त व्याज

SMALL SAVINGS SERVE THE STATE & YOUR FAMILY

- आता अधिक आकर्षक सवलती
- वैयक्तिक खात्यात २५,००० रु. व संयुक्त खात्यात ५०,००० रुपयांपर्यंत ४ टक्के करमुक्त व्याज मिळते.
- संस्थांच्या खात्यात ३½ टक्के करमुक्त व्याज मिळते व त्याकरिता कमाल मर्यादेचे बंधन नाही.
- चेकने पैसे काढण्याची सोय आहे.
- कितीही वेळा पैसे काढता येतात.
- पैसे घरी ठेवण्यापेक्षा पोस्टाच्या बचत बँकेत ठेवा.

महाराष्ट्र शासनाच्या अल्पबचत संचालनालयाद्वारे प्रकाशित.

## शिक्षण प्रसारक मंडळीच्या विविध शिक्षण संस्था

नू. म. वि. मराठी शाळा, पुणे ( १८८३ ) ● नू. म. वि. प्रशाळा, पुणे ( १८८३ )
स. प. महाविद्यालय, पुणे ( १९१६ ) ● ह. दे. प्रशाळा, सोलापूर ( १९१८ )
मीमांसा विद्यालय, पुणे ( १९२४ ) ● रामनारायण रुइया महाविद्यालय, मुंबई ( १९३७ )
टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे ( १९४१ ) ● रा. आ. पोदार व्यापार महाविद्यालय, मुंबई ( १९४१ )
शा. शि. विद्यालय, पुणे ( १९५० ) ● एस्. टी. सी. इन्स्टिट्यूट, पुणे ( १९५२ )
रुइया मूकबधिर विद्यालय, पुणे ( १९५६ ) ● नू. म. वि. शिशुशाळा, पुणे ( १९५६ )
नू. म. वि. मराठी शाळा, सोलापूर ( १९५९ ) ● नू. म. वि. मुलींची प्रशाळा, पुणे ( १९६० )
श्री चंद्रशेखर विद्यालय प्रशाळा, श्रीपूर ● श्री चंद्रशेखर विद्यालय प्राथमिक शाळा, श्रीपूर

□ परशुरामीय
वर्ष पन्नासावे ● अंक पहिला ● ऑक्टोबर १९६५

## माजी विद्यार्थ्यांस आवाहन

पुढील वर्षी आपल्या महाविद्यालयाच्या स्थापनेस पन्नास वर्षे पूर्ण होतील. त्यानिमित्त व्हावयाच्या सुवर्णमहोत्सवाची योजना आखली जात आहे. या कार्यात आपल्या महाविद्यालयाच्या बहुसंख्य माजी विद्यार्थ्यांना सहभागी होता यावे म्हणून त्यांची एक विस्तृत सूची करण्याचे काम सुरू झाले आहे. तरी सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपले पूर्ण नाव, पत्रव्यवहाराचा पत्ता, व्यवसाय, ते कोणत्या वर्षी महाविद्यालयात होते इत्यादी बद्दलची माहिती

**प्राचार्य मालेगावकर, स. प. महाविद्यालय, पुणे ९**

यांच्याकडे अगत्य पाठवावी असे आवाहन करीत आहोत.

□ प्रकाशक
श्री. र. कावळे, स. प. महाविद्यालय, पुणे ९

□ मुद्रक
य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव पेठ, पुणे २